१९४८०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्रमांक ४७२



REFBK-0006833

# अग्निनृत्य

शिवराम परांजपे

वा.नि. १०५४

२८/१२/०८

निरंजन

नि. २५

शालेय प्रकाशन : ४

# अग्निनृत्य

( शि. म. परांजपे यांच्या निवडक निबंधांचा संग्रह )

क्र. ६६१८ 6833

संपादक

वि. स. खांडेकर

REFBK-0006833

किंमत सव्वा रुपया

प्रकाशक
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी
१९१ शनिवार, पुणें २

१ सर्व हक्क सुरक्षित.
२ मुखपृष्ठावरील चित्र दिनानाथ दलाल यांचें आहे.

१९४७

मुद्रक
विठ्ठल हरि बर्वे,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४

## अनुक्रम


१. दिल्लीचें तख्त आणि
भाऊसाहेबांचा घण २१

२. डेक्कन कॉलेज पाहून केशवरावांच्या
मनांत आलेले विचार ३४

३. एक नवीन कारखाना ४६

४. गरिबांची उपासमार ५८

५. स्वातंत्र्यवीर विल्यम टेल ७०

६. एका खडी फोडणाराची गोष्ट ८९

७. लायकर्गसचे कायदे १०६

८. रॉबर्ट एमिट याचा
शतसांवत्सरिक उत्सव १२१

## १ काव्यज्योति

नामांकित कवींच्या एकूण सत्ताविस कविता या संग्रहांत आहेत. कविता निवडतांना हें पुस्तक शालेय व्हावें आणि प्रत्येक कवीची चांगली कविता त्यांत यावी अशी दक्षता घेतलेली आहे. प्रत्येक कवितेला श्री. वि. स. खांडेकर यांनीं परिचय लिहिलेला आहे. किंमत सव्वा रुपया

## २ नवे किरण

काणेकरांच्या वीस निवडक लघु-निबंधांचा हा संग्रह वि. स. खांडेकरांनीं संपादित केला असून तो दुय्यम शाळांतल्या वरच्या वर्गांतल्या विद्यार्थ्यांना स्थूल वाचनाला उपयुक्त व्हावा म्हणून त्यांनीं प्रत्येक निबंधाला परिचय व अभ्यास जोडला आहे. शिवाय खांडेकरांची सोळा पृष्ठांची प्रस्तावना. किंमत सव्वा रुपया.

## ३ मुक्या कळ्या

कवठेकरांच्या सात गोष्टींचा संग्रह. संपादक वि. स. खांडेकर. ‘ नवे किरण ’ प्रमाणें हा संग्रहही अभ्यास, परिचय व प्रस्तावना यांची जोड देऊन विद्यार्थ्यांना उपयुक्त व्हावा अशा रीतीनें खांडेकरांनीं संपादित केला आहे. किंमत सव्वा रुपया.

# प्रास्ताविक

शिवराम महादेव परांजपे हें नांव मीं प्रथम वाचलें तेव्हां मी नऊ दहा वर्षांचा असेन! नाटककार म्हणून या नांवाची आणि माझी पहिली ओळख झाली. लायब्ररींतून दररोज नवें पुस्तक आणून चोवीस तासांत त्याचा फडशा पाडायचा छंद तेव्हां मला जडला होता! त्यांतल्या त्यांत नाटकांवर माझी प्रीति अधिक होती. लायब्ररींतलें एकूण एक नाटक आपण वाचलें आहे, असा विक्रम करण्याच्या ईर्ष्येनेंच कीं काय, त्या वेळीं झाडून सर्व नाटकें वाचण्याचा सपाटा मीं सुरू केला होता. या मोहिमेंत एके दिवशीं शिवरामपंतांचें 'मानाजीराव' हें नाटक माझ्या हाताला लागलें. त्यांतले कांहीं प्रसंग मला मोठे रोमांचकारक वाटले; पण एकंदरींत तें नाटक कांहीं मला फारसें आवडलें नाहीं. मानाजीराव हें शेक्सपीअरच्या मॅक्बेथचें रूपांतर आहे. पण शेक्सपीअरपेक्षां माधवराव पाटणकर हें नांवच त्या वेळीं मला अधिक परिचित होतें. एक लेखक एकदां वाचायला घेतला कीं तो संपवून टाकायचा असा माझा शिरस्ता असल्यामुळें दुसरे दिवशीं मी परांजप्यांचें दुसरें नाटक लायब्ररींत शोधूं लागलों. 'भीमराव' हें पुस्तक माझ्या हाताला लागलें. भीमराव हा मानाजीरावाचाच भाऊ असणार, अशा कल्पनेनें तें नाटक न वाचतांच परत करावें अशा विचारांत मी होतों. पण त्या नाटकांत दरोडेखोराचा संबंध असल्यामुळें व बालमनाला आवडणाऱ्या त्यांतल्या आणखी कांहीं अद्‌भुत घटनांमुळें मी तें शेवटपर्यंत वाचूं शकलों. देवलांची 'शारदा,' कोल्हटकरांचें 'मूकनायक,' खाडिलकरांची 'कांचनगडची मोहना,' इत्यादि नाटकांनीं मला

त्या वेळीं वेड लावलें होतें. माझ्या आवडत्या नाटकांशीं मीं या दोन्ही नाटकांची जेव्हां तुलना करून पाहिली, तेव्हां हीं फार फिक्कीं आहेत असें मला वाटूं लागलें. बर्फी खाल्ल्यावर सपक बत्ताशाची चव लागूं नये तसें कांहीं तरी त्या वेळीं मला झालें. शिवराम महादेव परांजपे हे गृहस्थ पहिल्या दर्जाचे लेखक नाहींत, असें मनांत निश्चित ठरवून मी त्यांचें नांव विसरून गेलों.

शिवरामपंतांच्या प्रतिभेचा स्वैर विलास ज्या 'काळ' पत्रांतून झाला, तें त्या वेळीं महाराष्ट्रांत अत्यंत लोकप्रिय होतें. पण सांगलीसारख्या संस्थानी अंमलांतल्या छोट्या गांवांत बालमनापर्यंत राजकारणाचे जे साद-पडसाद त्या काळांत पोंचत असत, त्यांवरून 'केसरी' व 'ज्ञानप्रकाश' हींच मराठींतलीं दोन प्रमुख पत्रें आहेत असा त्याचा ग्रह होत असे. टिळकांना सहा वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा झाली त्या दिवशीं शाळेंत न गेल्याबद्दल ज्या मुलांनीं छड्या खाल्ल्या त्यांच्यांत मी होतों. टिळक, बिपिनचंद्र पाल व लजपतराय या तीन मोठ्या पुढाऱ्यांचा लाल, बाल, पाल, या नांवाखालीं दत्तासारखीं तीन तोंडें असलेला जो एक छोटा फोटो त्या वेळीं मिळत असे, तोही मीं गुपचुप पैदा करून माझ्या पुस्तकांत ठेवला होता. 'वंदे मातरम्' हे शब्द उघडपणें म्हणण्याची त्या वेळीं चोरी असल्यामुळें रस्त्यानें जातांना कोंपऱ्यावरला पोलीस आपल्याकडे पहात नाहीं अशी खात्री करून घेऊन जोरानें वंदे मातरम् म्हणून ओरडावें आणि शेजारच्या गल्लींत झटकन् पळून जावें, असे देशभक्तीचे विचारही तेव्हां मधून मधून माझ्या मनांत येत असत. 'आस्थापाल्या खोखो गेले! लॉनटेनिस तेथें आले' वगैरे चरण असलेलीं मेळ्यांतलीं पदेंही त्या वेळीं मला तोंडपाठ येत असत. परदेशी साखरेंत गाईच्या हाडांची भुकटी मिसळलेली असते म्हणून तिच्यावर बहिष्कार घालण्याची चळवळ त्या वेळीं सर्वत्र जोरांत सुरू होती. त्या चळवळींत यथाशक्ति भाग घेण्याचाही मीं चार दोनदां प्रयत्न केला. रात्रीं झोंपतांना उद्यांपासून परदेशी साखर खायची नाहीं, अशी प्रतिज्ञा मी मनांतल्या मनांत करीत असें. तब्बल आठ दहा तास त्या प्रतिज्ञेचें पालन माझ्या हातून होई; पण सकाळीं चहाची वेळ झाली कीं माझें मन डळमळूं लागे. चहा पिऊन झाल्यावर मी पश्चात्तापानें पुनीत झालेल्या मनानें उद्यांपासून या मोहाला बळी पडायचें नाहीं, असा पुन्हां निश्चय करीत असें. सांगलींतल्या वातावरणांत माझ्या देशभक्तीची मजल यापेक्षां पलीकडे जाणें शक्य नसल्यामुळेंच कीं काय, त्या वेळीं शिवरामपंतांचें 'काळां'तलें लेखन कधींही वाचल्याचें मला आठवत नाहीं.

पुढें सहा वर्षांनीं मी कॉलेजांत गेलों. त्या वेळीं मी कोल्हटकर आणि गडकरी यांचा परम भक्त झालों होतों. मासिक मनोरंजन हें तेव्हां काव्यात्म आणि वाङ्मय-प्रेमी विद्यार्थ्यांचें सर्वांत आवडतें मासिक होतें. काव्य आणि विनोद यांचे नवे नवे उन्मेष त्या वेळीं मनोरंजनांतूनच प्रगट होत असत. ज्याला ललित वाङ्मय वाचायचें आहे त्यानें 'मनोरंजन' वाचावें, ज्याला राजकारणाची, महायुद्धाची, अगर नसल्याच रुक्ष विषयांची थोडीफार जाडजूड चर्चा हवी असेल त्यानें 'चित्रमय जगत्' कडे वळावें, अशीच जणुं कांहीं त्या वेळीं आम्हां तरुण वाचकांची विभागणी झाली होती. 'मनोरंजन' हें सामाजिक सुधारणेचा पुरस्कार करणारें पण राजकीय-दृष्ट्या मवाळ असें मासिक होतें. उलट 'चित्रमय जगत्' हें जहाल पक्षाच्या राज-कारणाचा पुरस्कार करणारें, टिळकांच्या प्रमुख सहकाऱ्यांच्या लेखांनीं सजविलेलें आणि सामाजिक सुधारणेविषयीं उदासीन, किंबहुना किंचित् विरोधीच वाटणारें असें मासिक होतें. त्यामुळें मी वाचनाच्या बाबतीत स्वभावत: अधाशी असूनही 'चित्रमय जगत्' कडे थोडें फार दुर्लक्षच करीत असें. पण 'चित्रमय जगत्'चा अंक दर महिन्याला नियमितपणें पाहिला पाहिजे, असें पुढें पुढें मला वाटूं लागलें. माझ्या दृष्टीनें त्याच्यांत एक नवीनच आकर्षण उत्पन्न झालें होतें. तें आकर्षण म्हणजे शिवरामपंतांचें लेखन हें होय. त्यांतले त्यांचे लेख वाचतांना माझ्या काव्य-लोलुप मनाला जो आनंद झाला, तो अवर्णनीय होता. 'भासाची भवितव्यता', 'मदनदहन', 'मनाची मीमांसा', इत्यादि त्यांच्या त्या वेळच्या लेखांतले कांहीं भाग मला अजूनही फार सरस वाटतात. शंकरानें मदनाला जाळल्यावर पृथ्वीतलावर जे फरक घडून आले, त्यांचें वर्णन शिवरामपंतांनीं असें केलें आहे :

*नवीन जुळत असलेलीं लग्नें मोडूं लागलीं. जुनीं झालेलीं लग्नेंच टिक-ण्याची जेथें मारामार झाली, तेथें नवीन लग्नें कोठून जुळून येणार? जीं गुप्त गांधर्व विवाहाचीं जोडपीं एका क्षणापूर्वीं एकमेकांच्या हातांच्या बोटांत प्रेमाच्या आंगठ्या घालण्याला उत्सुक झालीं होतीं, तीं आतां एकमेकांकडे पाठ करून उभीं राहिलीं. प्रियकरांचीं अर्धीं काढून झालेलीं चित्रें तशींच अर्धवट पडून राहिलीं व लिहून पुरीं झालेलीं पत्रेंहि दूतींच्या हातीं देण्यांत आलीं नाहींत! विरहिणीची उत्सुकता उतरून गेली. जी कलहांतरिता रुसून बसली होती ती तशीच रुसून बसली; तिला सम-*

*जावण्याकरितां येतो आहे कोण? वासकसज्जांनीं आपल्या अंगावरचे अलंकार जड झाल्यामुळें काढून टाकले. अभिसारिकांनीं अभिसरणाचे बेत बंद केले. मुग्धा, मध्यमा व प्रौढा यांच्यांतील भेदांमधील गोडी नाहींशी झाली. पुष्पहार शुष्क होत चालले. सुगंधी अत्तरांतील सुवास उडून गेला. विडे वाळून गेले. शरीर–प्रसाधनाच्या सर्व क्रिया संपुष्टांत आल्या. वेलींनीं वृक्षांना घातलेले विळखे ढिले पडले. चक्रवाक आणि चक्रवाकी यांचा रात्रीं विरह झाला, तरी त्यांचा नेहमींचा तो आक्रोश सुरू होईना. मयूर आणि मयूरी यांच्या नृत्यांतील ताल जमेनासा झाला. उत्सुकता नाहींशी झाली. विलास विलयाला गेला. प्रेमरसाचा समुद्र आटून गेला.*

विद्यार्थिदशेंत हा परिच्छेद वाचल्याबरोबर मला कोल्हटकर व गडकरी यांच्या साम्य-विरोध सहज शोधून काढणाऱ्या कल्पकतेची आणि तिच्या बळावर काव्य-विनोद फुलविणाऱ्या प्रतिभेची आठवण झाल्यावांचून राहिली नाहीं. शिवरामपंत फार मोठे गद्यकवि आहेत, अशी त्या वेळीं माझी खात्री होऊन चुकली. पुढें त्यांची 'गोविंदाची गोष्ट' आणि 'विंध्याचल' या कादंबऱ्या मीं मोठ्या उत्सुकतेनें वाचल्या. हरिभाऊ आपट्यांची 'पण लक्षांत कोण घेतो!' आणि वामनराव जोश्यांची 'रागिणी' यांच्यावर लुब्ध असलेल्या माझ्या मनाला या कादंबऱ्यांतल्या कथा-वस्तूंनीं विशेष चटका लावला नाहीं. त्यांच्या गुंफणींत जातिवंत कथाकाराचें कौशल्य नाहीं, ही गोष्टही त्या वेळीं मला अंधुकपणें जाणवली. पण या कादंबऱ्यांतले दोन विशेष मात्र माझ्या मनावर संस्कार करून गेले. ते म्हणजे कथेंतही दिसून येणारा शिवरामपंतांच्या कल्पकतेचा स्वच्छंद विलास आणि पानापानांतून व्यक्त होणारी त्यांची उत्कट स्वातंत्र्यभक्ति.

## २

या दोन विशेषांनीं मोहून गेलेल्या माझ्या मनाला शिवरामपंतांचे 'काळांतले निवडक लेख' वाचण्याची तीव्र इच्छा उत्पन्न झाली नसती तरच नवल! पण तें सारें वाङ्मय जप्त झालेलें होतें. प्रयत्न करूनही मला तें कुठें वाचायला मिळालें

नाहीं. मात्र त्या वेळीं राहून राहून माझ्या मनांत एक कल्पना येई. मला वाटे, जुन्या बाजारांतले गळाठे शोधतांना किंवा पुण्याच्याच पिढीजाद रहिवाशी असलेल्या एखाद्या मित्राच्या घरीं जुनेपाने ग्रंथ धुंडाळतांना शिवरामपंतांचा हा गुप्त जामदारखाना कधीं तरी आपल्या हातीं लागेल. चोरांनीं गुहेंत लपवून ठेवलेल्या अफाट संपत्तीचा पत्ता रानांत गाढवें चरायला घेऊन गेलेल्या अल्लीबाबाला जसा लागला, तशी शिवरामपंतांचीं वाङ्मयीन रत्नें अचानक एक दिवस आपल्या पदरांत पडतील ! पन्नाशी उलटलेल्या माणसांच्या शिळोप्याच्या गप्पांत शिवरामपंतांच्या गाजलेल्या लेखांचा अनेकदां उल्लेख होई. अशा वेळीं 'दिल्लीचें तक्त आणि भाऊसाहेबांचा घण,' 'कानपूरची विहीर,' 'शिवाजीचें पुण्याहवाचन,' 'एका खडी फोडणाराची गोष्ट,' 'विषासाठीं कंठशोष,' इत्यादि नांवें कानावर पडलीं म्हणजे माझें मन बेचैन होऊन जाई. त्या प्रत्येक लेखांत काय सौंदर्य भरलें असेल आणि हृदय हलविण्याची कला त्यांत कशी आविष्कृत झाली असेल, याचा मी मनाशीं उगीचच विचार करीत राही. प्रौढ पिढींतल्या लोकांच्या त्या भाग्याचा मला हेवा वाटूं लागे. कुणीतरी मनुष्यानें स्वर्गांत फेरफटका करून पृथ्वी-तलावर परत यावें आणि तिथला कल्पवृक्ष असा सुंदर आहे, उर्वशीचें नृत्य तसें मोहक आहे, नंदनवनांतली पारिजातपुष्पांची शय्या इतकी कोमल आहे, इत्यादि गोष्टी मिटक्या मारीत सांगाव्यात आणि त्या गोष्टी ऐकणाऱ्या पृथ्वीवरल्या मनुष्याला स्वर्गाला पोंचणारी शिडी आसपास कुठेंच दिसूं नये, तशी माझी स्थिति होई त्या वेळीं ! खाडिलकरांचें 'कीचकवध' नाटक, शिवरामपंतांच्या लेखसंग्रहाप्रमाणेंच, सरकारच्या रोषाला बळी पडलें होतें. पण 'भाऊबंदकी', 'सत्त्वपरीक्षा', 'विद्याहरण', वगैरे त्यांचीं इतर नाटकें आम्ही रंगभूमीवर पाहूं शकत होतों. त्या नाटकांतून होणारें राष्ट्रीय भावनांचें परिपोषण, पौराणिक आवरणाखालीं त्या वेळच्या परिस्थितीवर विदारक प्रकाश टाकणारें त्यांतलें उग्र पण उदात्त तत्त्वज्ञान, आणि त्यांत प्रगट झालेलें रसपूर्ण नाट्य व ओजस्वी भाषाशैली, ह्यांचा साक्षात्कार आम्हांला पदोपदीं होत होता. पण शिवरामपंतांच्या निबंधांतून प्रगट झालेली कल्पकता खाडिलकरांच्याहून अधिक तरल आणि पल्लेदार होती, लोकांच्या भावनांना आवाहन करण्याचें त्यांचें सामर्थ्य लोकविलक्षण होतें, असें वारंवार ऐकूनही त्यांच्या 'काळ'तल्या उत्कृष्ट निबंधांपैकीं एकही मला कधीं वाचा-यला मिळाला नाहीं. या अतृप्तीमुळें माझ्या वाङ्मयप्रेमी मनाला एक विचित्र प्रकार-

चें असमाधान नेहमीं वाटे. मोहरांनीं भरलेला हंडा आपल्या घरांत कुठें तरी पुरून ठेवला आहे एवढें नक्की ठाऊक असावें आणि शोधशोधूनही मालकाला त्याचा पत्ता लागूं नये, तशी महाराष्ट्राच्या तरुण पिढीची शिवरामपंतांच्या 'काळा'तल्या निबंधांच्या वाचनांत तीन तपें स्थिति झाली होती.

तीन चार वर्षांपूर्वी हैद्राबाद संस्थानांत ह्या पुस्तकांचे भाग मिळण्यासारखे आहेत असें मला कळलें. मोठ्या उत्सुकतेनें ते पैदा करण्याची मी व्यवस्था केली. माझ्या हातांत पुस्तकें आलीं तीं जवळ जवळ म्हातारीं झालेलींच ! एक दोन भागांचीं शेवटचीं कांहीं पानें हरवलीं होतीं. कांहीं कांहीं भागांतल्या कागदांचा रंग पिवळसर होत चालला होता आणि मधलीं मधलीं पानें केवळ वार्धक्यामुळें सुरकुतलीं होतीं. अशा स्थितींत तीं पुस्तकें माझ्या हातांत पडलीं. पण त्यानंतरचे चार पांच दिवस मीं कसे घालविले, तें माझें मला सांगतां येणार नाहीं. माझ्या दृष्टीनें कालचक्राची गति थांबली होती. मी निबंधामागून निबंध वाचीत होतों. अंधारांत जशी वीज लखूकन् चमकावी, तशी कुठलाही विषय फुलवितांना प्रगट होणारी शिवरामपंतांची कल्पकता, गनिमी काव्यानें शत्रूला जेर करण्याचें मराठ्यांचें युद्धतंत्र वाङ्मयांत तितक्याच कुशलतेनें वापरतां येतें, हें सिद्ध करणारा त्यांचा दाहक उपरोध, एखाद्या कारंजांतून उडणाऱ्या जलधारांप्रमाणें त्यांच्या लेखनांतून उचंबळून येणारें त्यांचें स्वातंत्र्यप्रेम, इत्यादि गोष्टींनीं मी इतका मुग्ध होऊन गेलों कीं सांगून सोय नाहीं. १९२९ सालीं शिवरामपंतांच्या मृत्यूनंतर अच्युतराव कोल्हटकरांनीं त्यांच्याविषयीं जे उद्गार काढले होते, त्यांचें स्वारस्य तेव्हां कुठें मला समजलें. त्या मृत्युलेखांत अच्युतरावांनीं लिहिलें होतें :

*शिवरामपंत ही एक व्यक्ति नव्हती. शिवरामपंत ही स्फूर्ति होती. शिवरामपंत ही शक्ति होती. शिवरामपंत ही चेतना होती. शिवरामपंत ही विचारांची सुवर्णखाणी होती. शिवरामपंतांची मोठी मर्दुमकी म्हणजे सर्व महाराष्ट्रभर त्यांनी उत्पन्न केलेली स्वातंत्र्याची प्रीति होय ! शिवरामपंतांच्यापूर्वी राजकारण सत्तेशीं संगनमत करणारें होतें. शिवरामपंतांच्या पूर्वी स्वातंत्र्य हा शब्द महाराष्ट्राला नवखा होता. जें निर्भेळ आणि निर्मिश्र असेल तेंच खरें स्वातंत्र्य! स्वातंत्र्याची कल्पना प्रथम*

*शिवरामपंतांनीं पुढें मांडली. त्यांनी सर्व लोकांचीं अंतःकरणें या स्वातंत्र्याकडे वळविली. स्वातंत्र्याचा जप त्यांनीं प्रत्येकाच्या हृदयास शिकविला. प्रत्येकाच्या रसनेस त्यांनीं स्वातंत्र्याची चटक लावली. त्याचेपुढें सोमळ, कोमट, अर्धेमुर्धे व हिणकस स्वातंत्र्य लोकांना नकोसें करून टाकलें. आणि हें कार्य करण्यास त्यांनी आपल्या सर्व शक्ती उपयोगांत आणल्या. त्यांचें वक्तृत्व अपूर्व होतें. त्यांचें भाषा–प्रभुत्व लोकोत्तर होतें. त्यांचें वक्रोक्तिलेखन बिनतोडीचें होतें. व्याजोक्तीच्या विनोदांत त्यांचा हात धरणारा कुणी नव्हताच! ह्या व्याजोक्तीवर रकानेच्या रकाने त्यांनीं एका टाकानें लिहिले. ह्या व्याजोक्तीच्या बळावर दोन दोन, तीन तीन तास अस्खलित वक्तृत्व त्यांनीं चालविलें. त्या वेळीं मोहिनी पडल्याप्रमाणें लोक स्तब्ध होत. एक टांचणी पडली तरी ती ऐकूं येई! तरुण बेभान होत. त्यांचीं डोकीं भणाणून जात! विचारांच्या काहुरांत राष्ट्रासाठीं वाटेल तो अविचार करायला माणसें तयार होत. शिवरामपंतांच्या जवळ लेखणीप्रमाणें कृति असती तर मॅझिनी, डी व्हॅलेरा किंवा महेंद्र प्रताप ह्यांच्या मालिकेंत त्यांचें नांव पडलें असतें. त्यांच्याजवळ कृतिप्रमाणें शक्ति किंवा युक्ति असती तर लेनिन, जॉर्ज वॉशिंग्टन किंवा केमाल पाशा यांचे यश ते मिळवूं शकले असते; पण त्यांची गति लेखणीजवळच थांबली. मात्र या लेखणीची बहादुरी इतकी जाज्वल्य आहे कीं ती कोणत्याही काळांत जॉर्ज वॉशिंग्टन उत्पन्न करील, केमाल पाशाला जन्म देईल, हिंदुस्थानांत लेनिन उत्पन्न करून त्याचे मस्तकावर स्वातंत्र्याचा मुगुट चढवील.*

## ३

'काळां'तील निवडक निबंधांचे सर्व संग्रह आतां उपलब्ध झाले आहेत. आजच्या दृष्टीनें ते वाचणाऱ्या अनेक लोकांना अत्युतगवांचें हें वर्णन अतिरंजित वाटण्याचा संभव आहे; पण त्यांनीं एक गोष्ट अवश्यमेव लक्षांत ठेवली पाहिजे. कांहीं कांहीं वेळां कालचक्र अतिशय वेगानें फिरत राहतें. त्यामुळें आपल्याला पूर्वीच्या काळाचीं आणि त्यांतल्या कर्तृत्वाची यथार्थ कल्पना करणें कठिण होऊन बसतें. शिवरामपंतांच्या

प्रतिभेचें योग्य मूल्यमापन व्हायला १८९८ ते १९०८ या दशकांतली महाराष्ट्रांतली किंबहुना हिंदुस्थानांतली राजकीय परिस्थिति संपूर्णपणें लक्षांत घ्यायला हवी. त्या वेळीं काँग्रेसचीं अधिवेशनें भरत होतीं; नाहीं असें नाहीं! पण त्या अधिवेशनांतून सरकारच्या निषेध-विरोधापेक्षां त्याच्याकडे पाठवायच्या अर्ज-विनंत्यांचेच ठराव अधिक प्रमाणांत पास केले जात होते. घराचा कबजा बळकावणाऱ्या हडेलहप्प्याचा हात धरून त्याला घराबाहेर हांकलून देण्याचें सामर्थ्य नसलें म्हणजे दुबळा घरमालक त्याचे पाय धरून ओसरीवरल्या कोंपऱ्यांत पथारी टाकून झोंपण्याची परवानगी जशी त्याच्याकडून मिळवितो, तशी राष्ट्रीय सभेची त्या काळांतली राजकीय चळवळ होती. जनता जागृत झाली नव्हती. एकीकडे टिळकांसारख्या निर्भय देशभक्तावर स्पष्टोक्तीबद्दल राजद्रोहाचे खटले भरून त्यांना सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली जात होती, तर दुसरीकडे मोठमोठे पुढारी प्रामाणिकपणानें असो वा मुत्सद्दीपणानें असो, इंग्रजी राज्य हा या देशाला मिळालेला एक प्रकारचा वर आहे, असे उद्गार काढीत होते. सुशिक्षित समाजसुद्धां स्वप्नाळु बनला होता. आपल्या पायांतल्या गुलामगिरीच्या शृंखला हे मोठे सुंदर अलंकार आहेत, असा त्याला भास होत होता. जो तो आपल्या पायापुरतें पहात होता. पुढारलेला पांढरपेशा वर्ग मुन्सफ-मामलेदार होण्याचें मनोराज्य करण्यांत आणि मुलाला इंग्लंडला पाठविलें किंवा मुलगी आय्. सी. एस्. ला दिली म्हणजे घोडे गंगेला न्हाले असें मानण्यांत दंग होऊन गेला होता. साऱ्या समाजपुरुषाला जणुं कांहीं कुंभकर्णाची झोंप लागली होती. त्याला पारतंत्र्याचीं शल्यें टोंचीत नव्हतीं. गुलामगिरीच्या पोटीं येणारें भेसूर भवितव्य भेडसावीत नव्हतें. त्याला भूतकाळ दिसत नव्हता. भविष्यकाळ पाहण्याची इच्छा नव्हती! वर्तमानांत—अगदीं संकुचित अशा जीवनाच्या तुकड्यांत आणि चतकोर भाकरीच्या विवंचनेंत किंवा आनंदांत—जो तो गढून गेला होता. इंग्रजी राज्यांतल्या वरपांगी सुव्यवस्थेनें सर्वांचे डोळे दिपून गेले होते. परकीय सत्तेचें हें सोज्वळ स्वरूप म्हणजे साम्राज्यरूपी मायावी राक्षसानें धारण केलेला कांचनमृगाचा अवतार आहे, याची जाणीव बहुतेकांना नव्हती.

चिपळूणकर, आगरकर आणि टिळक यांनीं महाराष्ट्राची ही घोर निद्रा नाहींशी करण्याचा शिकस्तीचा प्रयत्न एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या चरणांत केला. तो थोडा फार यशस्वीही झाला. पण १८९८ सालीं शिवरामपंतांनीं ‘काळ’ सुरू

केला, तेव्हां टिळक व गोखले हे दोघेही धुरंधर नेते आपापल्या प्रवृत्तीप्रमाणें राजकारणाच्या आखाड्यांत उतरले असले आणि कांहीं झालें तरी जुलूम सोसायचा नाहीं, त्याचा बदला घेतल्याशिवाय राहायचें नाहीं, या तीव्र पण एकांगी भावनेनं वागणारी चाफेकरबंधूंच्या सारखीं माणसें मधून मधून प्रगट होत असलीं, तरी सुशिक्षित समाज अद्यापिही आपल्या गळ्यांतील गुलामगिरीच्या फांसालाच पुष्पहार समजून वागत आहे, हें कटु सत्य त्यांच्या लक्षांत आल्यावांचून राहिलें नाहीं. टिळक स्वभावानें वीरवृत्तीचे होते. पण ते नुसते वीर नव्हते. वीरत्वाला विवेकाची जोड मिळाली म्हणजे जो प्रभावी मुत्सद्दीपणा निर्माण होतो, त्याचे महाराष्ट्रांतले त्या वेळचे ते प्रतिनिधि होते. त्यामुळें इंग्रजांकडून गोडीगुलाबीनें राजकीय हक्क मिळविण्याच्या मवाळ पुढाऱ्यांच्या मार्गावर जसा त्यांचा विश्वास नव्हता, तशी अविचारी भावनांतून निर्माण होणाऱ्या साहसी अत्याचारांच्या कृत्यांवरही त्यांची श्रद्धा नव्हती. टिळक नेहमीं सडेतोडपणानें लिहीत. राज्यकर्त्यांशीं रोखठोक व्यवहार करायचा हा त्यांचा बाणा होता. सरकारच्या प्रत्येक अन्यायावर झगझगीत प्रकाश पाडून त्याचें हिडिस स्वरूप ते नेहमीं उघडें करून दाखवीत. वेळ आली तेव्हां 'सरकारचें डोकें ठिकाणावर आहे काय?' असा निर्भीड सवाल करायला ते कचरले नाहींत. पण निर्भयता आणि ओजस्वीपणा हे गुण अंगीं असूनही टिळकांच्या लेखांमध्यें भावनेपेक्षां बुद्धीलाच अधिक आवाहन असे. त्यांना भूतकालाचा जसा अभिमान होता, तशी वर्तमानकालाच्या मर्यादांची जाणीवही होती. बुद्धिप्रधान मध्यमवर्गाला जागृत व संघटित करण्याच्या दृष्टीनें त्यांचें लेखन अतिशय प्रभावी ठरलें. पण सर्वसामान्य जनता टिळकांचा 'केसरी' आवडीनें वाचीत अथवा ऐकत असली तरी अज्ञानानें, दारिद्र्यानें, आणि गुलामगिरीनें गारठून गेलेलें तिचें अंतः–करण पेटविण्याचें कार्य त्या लेखांच्या द्वारें होणें शक्य नव्हतें. त्याकरितां निराळ्या चटकदार आणि भावनाप्रधान लिखाणाची जरूरी होती. बहुजन-समाजाच्या मनांत राजकीय गुलामगिरीविषयीं विलक्षण चीड निर्माण व्हायला त्याला त्याच्या उज्ज्वल भूतकालाची आठवण करून द्यावी लागते. त्याच्या दुबळेपणाला रेशमी चिमटे घ्यावे लागतात, त्याच्यावर पदोपदीं होणाऱ्या जुलमाचें चित्र भडक रंगांनीं रंगवून त्याच्या डोळ्यांपुढें नाचत ठेवावें लागतें. हें काम विचारापेक्षां भावनेला आणि बुद्धीपेक्षां कल्पनेला अधिक सुलभतेनें साधतें. प्रतिभेच्या व स्वभावाच्या वैशिष्ट्यामुळें शिवरामपंतांनीं या कामीं अलौकिक यश मिळविलें. अशा लेखनाला आवश्यक असणा-

त्या सर्व शक्तीचा त्यांच्यामध्यें संगम झाला होता. ते जाडे संस्कृत पंडित असले तरी त्यांची वृत्ति सहज भावनावश होणाऱ्या कवीची होती. काव्यवृत्ति प्रबळ असलेलीं माणसें बहुधा एकेका विषयांत रंगून जाऊन भान विसरतात आणि आपल्या या उत्कट तन्मयतेनें इतरांना त्या विषयाशीं समरस करतात. बालकवि किंवा वर्ड्स्वर्थ यांचें निसर्गप्रेम इतकें मोठें होतें कीं सृष्टीला सखी मानून ते तिच्याशीं हंसत आणि खेळत, तिला गुरु मानून ते तिच्या पायांपाशीं जीवनाचे धडे घेत. मातृभूमि ही शिवरामपंतांच्या दृष्टीनें अशीच चालती बोलती मूर्ति होती. तिचें दुःख, तिचें दारिद्र्य, तिची गुलामगिरी, तिचें गतवैभव, इत्यादिकांपैकीं कुठलीही गोष्ट त्यांच्या प्रतिभेला चालना द्यायला पुरी होई. त्यामुळें 'काळ' पत्रांतल्या दहा वर्षांतल्या त्यांच्या सर्व निबंधांतून एकच रस अखंड वाहत राहिला. त्या रसाची उत्कटता मराठी वाङ्मयांत केवळ अपूर्व होती. पोवाडे आणि बखरी ह्यांच्यांतून पूर्व-कालीं प्रगट झालेल्या त्या रसाला शिवरामपंतांनीं कालमानाप्रमाणें नवें रूप दिलें आणि त्याचे पाट आपल्या लेखालेखांतून सतत दहा वर्षें खेळविले. त्या रसाचें नांव देशभक्ति.

## ४

शिवरामपंतांचा काळ या रसाच्या आविष्काराला अनुकूल असाच होता. इंग्रजी राज्याची पहिली मोहिनी हळूहळू ओसरूं लागली होती. विचारवंतांना त्या मोहक पारतंत्र्याचें दाहक स्वरूप कळूं लागलें होतें. ही गुलामगिरीची जाणीव महा-राष्ट्रांत निर्माण होतांच साहजिकच त्याचें लक्ष आपल्या उज्ज्वल भूतकालाकडे वळलें. त्याला आपल्या पूर्व पराक्रमाची आठवण झाली. अडीचशें वर्षांपूर्वी प्रबल मुसलमान सत्तेशीं टक्कर घेऊन स्वराज्य स्थापन करणाऱ्या शिवछत्रपतींची स्मृति त्याला स्फूर्ति देऊं लागली. त्या महापुरुषाच्या रायगडच्या समाधीचा जीर्णोद्धार झाला. महाराष्ट्रांत घरोघरीं शिवाजीउत्सव सुरू झाले. याच काळांत हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतून, खाडिलकरांच्या नाटकांतून, गोविंद, विनायक, आणि सावरकर ह्यांच्या काव्यांतून भूतकाळांतल्या पराक्रमाचे पोवाडे गायिले जायला सुरवात झाली. स्वातंत्र्याच्या या भावनेनें भारलेल्या विनायकासारख्या कवीला सर्कशींतल्या पिंजऱ्यांत कोंडलेला सिंह पाहून सुद्धां पारतंत्र्यांत खितपत पडलेल्या आपल्या अभागी देशाची आठवण होऊं लागली.

शिवरामपंतांच्या लेखांची पार्श्वभूमि अशी होती. देशभक्ति हा त्यांच्या प्रतिभेचा एकमेव आवडता रस होता. त्या प्रतिभेचें सामर्थ्य एवढें जबरदस्त होतें कीं, इतरांनीं ललित वाङ्मयाच्या आधारानें करून दाखविलेले चमत्कार शिवरामपंतांनीं ज्यांत काव्याला किंवा भावनेला फारशी जागा नाहीं असें मानण्याचा परंपरागत संकेत होता, त्या निबंधासारख्या वाङ्मयप्रकाराच्या साहाय्यानें लीलेनें केले. काव्य, नाटक, कादंबरी, इत्यादिकांचें लेखन, ललित लेखकाला आपल्या लहरीप्रमाणें करतां येतें. शिवरामपंतांना ही सवलत कधींच मिळाली नाहीं. दर आठवड्याला त्यांच्या प्रतिभेला हजारों वाचकांसमोर येऊन हजिरी द्यावी लागे. पण त्यांची कल्पकता इतकी लोकोत्तर होती कीं साध्या विषयांतूनही ती आपल्याला इष्ट असलेल्या गोष्टीचें अत्यंत परिणामकारक प्रतिपादन करी. त्यांचा आवडता रस वर्तमानपत्राच्या मोजक्या रकान्यांत अचुक प्रगट होई. रामजयंती-सारखा साधा विषय घेतला तरी प्रत्येक शब्द कौशल्यानें वापरून त्यांतूनही ते पारतंत्र्याचें जूं मानेवरून फेंकून देण्याची आपली शिकवण कशी देत असत हें पाहण्याजोगें आहे. त्या लेखांत ते म्हणतात :

*श्रीरामचंद्राची सर्वच कृत्यें लोकोत्तर होतीं. परंतु त्यांतल्या त्यांत त्यानें रावणाला मारलें हें कृत्य अतिशय लोकोत्तर होतें. सत्यभाषण कर-णारे आणि एकपत्नी व्रतानें चालणारे लोक जगांत थोडे आहेत असें नाहीं. पण त्या लोकांच्या ह्या गुणाबद्दल कुणी त्यांच्या जयंत्या केल्या नाहींत. किंवा त्यांना कुणी देव मानलें नाहीं. रामाच्या वेळेपासून आतांपर्यंत जो त्याचा जयघोष चालला आहे, तो रामानें बापाची आज्ञा पाळली किंवा राम एकपत्नीव्रतधारी होता म्हणून नव्हे; तर त्यानें रावणा-सारख्या बलाढ्य पण दुष्ट राजाला मारलें म्हणून ! राम हा Tyrant-killer म्हणजे जुलमी राजाला मारणारा होता. त्याच्या ह्याच कृत्यानें त्याची कीर्ति अजरामर झाली आहे. आणि त्याची मूर्ति देव्हाऱ्यामध्यें जाऊन बसली आहे. जो कोणी Tyrant-killer आहे, त्याला सर्व काळीं सर्व देशांतील लोक देवाप्रमाणें मान देत आले आहेत. व तीच स्थिति रामासंबंधानें आहे.*

अन्याय, जुलूम, गुलामगिरी, पारतंत्र्य, इत्यादिकांसंबंधानें समाजाच्या मनांत चीड उत्पन्न करण्याची त्यांची ही पद्धत सर्वत्र दिसून येते. कल्पनेला भावनेची

जोड देऊन वाचकांचें मन अंकित करण्याचें त्यांचें चातुर्य तर केवळ अनुपम आहे. 'कानपूरची विहीर' या निबंधांत ते लिहितात :

*या विहिरींत टाकलेलीं कत्तल केलेल्या युरोपियनांचीं प्रेतें अजूनपर्यंत जशींच्या तशीं नसतीलच! तेव्हां तीं तिथें दिसणार नाहींत हें उघडच आहे. परंतु पाहणाराला त्या विहिरींत आपला हिंदुस्थान देश दिसेल. सगळें उत्तर हिंदुस्थान एका हेतूनें एकत्र गोळा झालेलें त्या विहिरीच्या लहानशा जाग्यांत त्याच्या नजरेस पडेल. हिंदुस्थानांत जागृत असलेल्या धर्माभिमानाचा प्रकाश त्या विहिरीच्या तळाजवळील अंध:कारामध्येंही त्याला दृग्गोचर होईल. तेथें त्या विहिरीच्या आकुंचित परिघांतील विस्तीर्ण मैदानावर नानासाहेब आणि लक्ष्मीबाई ही जोडी आपले घोडे भरधांव फेंकीत असतांना दृष्टीस पडेल. तात्या टोपे आपल्या अव्यवस्थित सैन्याला व्यवस्थितपणानें उभें करीत असलेला त्याला तेथें आढळेल. लुटलेली गंगाजळी, तुटलेलें तारायंत्र, आणि फुटलेलीं डोकीं हीं त्याला त्यामध्यें दिसतील. त्याची आशा आणि निराशा हीं त्याला त्या विहिरीमध्यें दिसतील. वद्य चतुर्दशीच्या चंद्राप्रमाणें अंधुक तेजाचा हिंदुस्थानचा भाग्योत्कर्ष उगवतां उगवतांच मावळलेला त्याला त्या विहिरीमध्यें दिसेल.*

संपादकाला दर आठवड्याला आपल्या सभोंवतालच्या घडामोडींतून आपल्या लेखाचा विषय निवडून काढावा लागतो. त्या त्या वेळीं तो विषय वाचकांच्या दृष्टीनें ताजा असतो. पण आजचीं ताजीं फुलें जशीं उद्यां सुकून निर्माल्य होऊन जातात, तशी या विषयांची पुढें गत होते. शिवरामपंतांच्या निबंधांचे बहुतेक विषय आतां जुने झाले आहेत. हिंदुस्थानला राजकीय गुलामगिरींत डांबून ठेवणाऱ्या ज्या परक्या सरकारावर त्यांनीं अविरत शरसंधान केलें, त्याची सत्ता आतां संपुष्टांत आली आहे. आजचें वर्तमानपत्र हा उद्यांचा इतिहास असतो, या न्यायानें त्यांचें निबंधवाङ्मय आतां ऐतिहासिक झालें आहे. पण बकुळीचीं फुलें कितीही सुकलीं, बाह्यत: काळवंडलीं, तरी त्यांचा सुगंध जसा नाहींसा होत नाहीं, तशी त्यांच्या लेखनाची गोडी आहे. देशभक्तीच्या रसानें उत्फुल्ल झालेलीं आणि कल्पनेच्या सौंदर्यानें नटलेलीं त्यांच्या निबंधांतील अनेक मनोहर स्थळें महाराष्ट्रांत पिढ्यान् पिढ्या लोकांना आनंद देत राहतील, त्यांचें उद्बोधन करतील.

५

शिवरामपंतांच्या निबंधांतल्या उत्कट स्वातंत्र्यप्रेमानें महाराष्ट्रांतल्या मध्यम वर्गाच्या मनावर सांचलेली गुलामगिरीची राख उडवून आंतला स्फुलिंग फुलविला. त्यांच्या लेखनामुळें ज्या मनांत पूर्वी नुसते कोळसे दिसत होते, तिथें पेटूं लागलेल्या निखाऱ्याच्या ठिणग्या चमकूं लागल्या. त्यांच्या या प्रतिभासामर्थ्याचा आत्मा कल्पकता हा आहे. मराठी वाङ्मयांत ज्यांना कल्पकतेचें देणें विशेष प्रमाणांत लाभलें, अशा मुक्तेश्वर किंवा गडकरी यांच्यासारख्या कवींच्या पंक्तींतच शिवरामपंतांचें स्थान आहे. देशभक्तीखेरीज दुसऱ्या कुठल्याही भावनेचा उत्कट परिपोष त्यांच्या वाङ्मयांत सहसा आढळत नाहीं हें खरें. त्या दृष्टीनें त्यांचें कविमन एककल्ली होतें असें म्हणतां येईल. पण कल्पकतेची रम्य, रुद्र, भव्य, भीषण, करुण, उदात्त, अशीं विविध स्वरूपें त्यांच्या निबंधांत इतक्या विपुलतेनें आढळतात कीं त्यांची श्रेष्ठ कवींच्या मालिकेंत गणना न करणें केवळ अरसिकपणाचें ठरेल. 'प्रार्थना' हा त्यांचा एक उपरोधपर निबंध आहे. स्वार्थासाठीं माणसें मारणारे मुत्सद्दी परमेश्वराला आपापल्या सत्पक्षाला साहाय्य करण्याविषयीं जी विनंति करीत असतात तिचें विडंबन या लेखांत आहे. पण असल्या निबंधाचा प्रारंभ सुद्धां शिवरामपंतांनीं किती काव्यमय रीतीनें केला आहे तें पाहण्यासारखें आहे :

*नुकतीच एक अतिशय महत्त्वाची सभा भरली होती. या सभेच्या अधिवेशनासाठी आकाशरूपी भव्य मंडपाची योजना करण्यांत आली होती. चारी बाजूंनीं इंद्रधनुष्याच्या कमानी लावल्या असल्यामुळें त्या मंडपाला अतिशय शोभा आली होती. आकाशांतून उडत असतांना मध्येंच थकल्यामुळें विश्रांति घेण्याकरितां काळ्याभोर ढगांवर बसलेल्या पक्ष्यांनीं त्यांच्यावर चंचुप्रहार केल्यामुळें त्यांच्यामधून कारंज्यांसारख्या ज्या सहस्रावधि धारा मोठ्या सोसाट्यानें उंच उडत होत्या, त्यांच्या योगानें त्या मंडपाच्या सभोंवतालचा प्रदेश अतिशय थंडगार झाला होता. त्या मंडपाच्या सभोंवार व मधून मधून नक्षत्ररूपी मोत्यांच्या झालरी लटकावून दिल्या असल्यामुळें त्याला विशेषच प्रेक्षणीयता प्राप्त झालेली होती. विजेच्या प्रकाशानें तो सर्व मंडप प्रज्वलित*

*केलेला होता. अत्यंत मृदु अशा पांढऱ्या शुभ्र ढगांच्या गाद्या सर्व सभामंडपभर पसरलेल्या होत्या. मध्यभागीं गारांच्या लहान लहान तुकड्यांनीं एक उंच सिंहासन बनविलेलें होतें. त्याच्यावर विजेचें तेज प्रतिबिंबित झालें असल्यामुळें तें सिंहासन मोठमोठ्या हिऱ्यांचेंच केलें आहे कीं काय असा भास होत होता.*

त्यांच्या कल्पकतेचा विलास जितका विविध तितकाच प्रेक्षणीय असतो. त्यांची अदृश्य क्रांतिकारकांची परिषद् ज्या गुहेमध्यें भरते तिचें वर्णन त्यांनीं असें केलें आहे :

*त्या ठिकाणीं आणखी एक अपूर्व शोभा दिसत होती. भंगलेलीं सिंहासनें, तुकडे तुकडे केलेले मुगुट, फाडून टाकलेलीं छत्रचामरें, चिंध्या झालेलीं आजिंक्य निशाणें, भाल्यांच्या टोंकावरें नाचविलीं जाणारीं जुलमी राजांचीं मुंडकीं, असे अनेक पदार्थ तिथें जमिनीवर पसरलेले दिसत होते.*

'शिवाजीची एक रात्र' या लेखांत आकाशांतला व्याध पाहून त्यांची कल्पना अशी पल्लवित होते :

*अरे हे मृगशीर्ष नक्षत्रांतील व्याधा, मी तुला असा हा बाण मारतांना किती तरी दिवस पहात आहें. आतां हें तुझें शरसंधान पुरे. तो बिचारा मृग कधींच मरण पावलेला आहे. मेलेल्यांना मारण्यांत किंवा गरीब मृगांची मृगया करीत बसण्यांत व्यर्थ कालक्षेप करून कांहीं मोठा पुरुषार्थ साधतो असें नाहीं. अरे, तुझे हे सगळे इतके देशबांधव आपल्या देशाच्या स्वातंत्र्याकरितां गुप्त बेत करीत असतां तूं आपल्या भात्यांतील बाण या मृगयेमध्यें व्यर्थ दवडीत आहेस! काय म्हणावें तुला? तुझ्या हातांत परमेश्वरानें जे धनुष्यबाण दिले आहेत ते या गरीब मृगांना मारण्याकरितां नव्हेत. तर तुझ्या स्वतंत्रतेचे जे शत्रु असतील, त्यांना मारण्याकरितां ते आहेत.*

शिवरामपंतांची कल्पकता पौराणिक कल्पना मोठ्या सुंदर रीतीनें फलविते. ऐतिहासिक स्थळें आणि प्रसंग ती आपल्या कलमाच्या फटकार्‍यानें क्षणार्धांत सजीव आणि बोलके करते. स्वातंत्र्याकरितां झटणार्‍या, झगडणार्‍या, आणि प्राण देणार्‍या वीरांचीं चरित्रें ती मोठ्या रसाळपणानें वर्णन करते. सूर्यकिरणाच्या स्पर्शानें कमळकळी फुलून तिचें सौंदर्य जसें खुलावें, तसा शिवरामपंतांचा निबंध—मग त्याचा विषय कोणताही असो—त्यांच्या कल्पकतेमुळें आकर्षक बनतो. मात्र देशभक्तीशिवाय इतर भावनांना त्यांच्या कविमनांत फारशी जागा न मिळाल्यामुळें, प्रखर आणि तर्ककर्कश बुद्धीमुळें व आपल्या आत्म्याला बेचैन करून सोडणार्‍या पारतंत्र्याच्या शल्याविरुद्ध शस्त्र म्हणून या कल्पकतेचा त्यांनीं पदोपदीं उपयोग केल्यामुळें ते पहिल्या प्रतीचे गद्यकवि असूनही उत्कृष्ट काव्य कधीं लिहूं शकले नाहींत आणि विविध भावनांच्या कल्लोळांत आणि त्यांतून निर्माण होणार्‍या रसोत्कर्षांत त्यांचें मन कधींच रमलें नाहीं. या दृष्टीनें त्यांचें तत्कालीन इतर प्रतिभावंतांपेक्षां श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्याशींच अधिक साम्य आहे. शिवरामपंतांनीं राजकीय गुलामगिरीविरुद्ध निकराचे हल्ले चढविण्याकरितां आपल्या प्रतिभेचा उपयोग केला. श्रीपाद कृष्णांनीं वेडगळ आणि अमानुष सामाजिक रूढींवर तितक्याच तीव्रतेनें प्रहार केले. त्यामुळें दोघांच्याही कल्पकतेचा उपरोधाच्या स्वरूपांत विकास झाला. 'सुदाम्याच्या पोह्यां' प्रमाणेंच शिवरामपंतांचे निवडक उपरोधपूर्ण राजकीय लेख हें मराठी वाङ्मयाचें एक चिरंतन भूषण मानलं जाईल.

## ६

उपरोध हा चतुर व मार्मिक लेखकाच्या हातचा हुकमी पत्ता ठरतो. चिपळूणकर आणि आगरकर यांच्या निबंधांत उपरोध व उपहास यांचा क्वचित् आविष्कार झाला असला, तरी त्यांना जवळ जवळ रसाचें स्वरूप दिलें तें शिवरामपंतांनींच. हा नवा रस जसा त्यांच्या प्रतिभेच्या विशिष्ट प्रकृतींतून निर्माण झाला, तसा तत्कालीन राजकीय परिस्थितीमुळें त्याला अपूर्व रंग चढला. लवंगेनें उष्णता आणि वेलदोड्यानें थंडी होणार्‍या मनुष्याच्या प्रकृतीप्रमाणें त्या वेळच्या इंग्रजी राज्यकर्त्यांची मनःस्थिति होती. त्यांना देशांत सर्वत्र राजद्रोहाचा वास येत

होता. जनतेच्या पुढाऱ्यांची स्पष्टोक्ति ही बाँबइतकीच त्यांना भयंकर वाटत होती' दडपशाहीची आग ओतून लोकांच्या मनांत निर्माण झालेले स्वातंत्र्याचे कोवळे अंकुर सहज जाळून टाकतां येतात, अशी वेडी आशा सर्व सत्ताधाऱ्यांना सदैव अंध करून सोडीत असते. इंग्रज सरकार कांहीं या नियमाला अपवाद नव्हतें. देशांतला बहुजन-समाज निरक्षर! मूठभर सुशिक्षित लोक काय ते वर्तमानपत्रें वाचून राजकारणाचा विचार करणारे! तेव्हां कायद्याचें बुजगावणें दाखवून वर्तमानपत्रांच्या मुसक्या आवळल्या म्हणजे लोकांमध्यें स्वातंत्र्याची भावना प्रज्वलित होण्याचा फारसा संभव उरणार नाहीं, अशी त्या सरकारची कल्पना होती. हातांत राजद्रोहाचा बडगा घेऊन आणि डोळ्यांत तेल घालून देशी वर्तमानपत्रांवर कडक पहारा करणाऱ्या या सरकारवर शिवरामपंतांनीं मात केली, ती केवळ उपरोधाच्या साहाय्यानें. त्यांचे अनेक लेख वाचतांना आट्यापाट्याच्या खेळांत प्रतिस्पर्ध्यांना हुलकावण्या देत देत साऱ्या पाट्यांतून पसार होऊन मीठ आणणाऱ्या चपळ खेळाडूची आठवण होते. गुदगुल्या करण्याचें सोंग आणून ते सरकारला चिमटे काढतात. बाह्यतः त्यांच्या हातांत मखमली मोजे दिसत असले तरी त्या मोज्यांच्या आंत वाघनखें लपविलेलीं असतात. शब्दाशब्दांतून नाजुक पण मर्मभेदक टोमणे मारीत परक्या सरकारचें उलटें काळीज ते हां हां म्हणतां उघड करून दाखवितात. कल्पकतेचें साहाय्य नसतें तर सतत दहा वर्षे सरकारच्या डोळ्यांत धूळ फेंकून लोकांच्या अंतःकरणांत असंतोष निर्माण करणें त्यांना अशक्य झालें असतें. कुठें रूपकाचा आश्रय घ्यावा, कुठें गोष्ट सांगण्याचें मिष करावें, केव्हां प्रतिपादनावर एखाद्या ऐतिहासिक प्रसंगाचें आवरण घालावें, केव्हां 'दगडी कोळशा' सारख्या साध्या विषयावर लिहिण्याचें सोंग आणावें, अशीं विविध रूपें धारण करून त्यांचा उपरोध प्रगट झाला आहे. नवीन वर्षाचें स्वागत करण्याच्या निमित्तानें ते जातां जातां लिहितील, 'पोटाच्या मदतीवांचून मनाला आनंद मानतां येत नाहीं, ही इंग्रजांच्या वाटेंत देवानें मोठी अडचण घालून ठेविली आहे. पोटाला भरपूर अन्न मिळालें नाहीं म्हणजे तें जानेवारीच्या पहिल्या तारखेला मनाला आनंदित होऊं देत नाहीं, उड्या मारूं देत नाहीं, किंवा इंग्लिशांच्या औदार्याची तारीफ करूं देत नाहीं. राजनिष्ठा हा मनोविकार पोटांत पोटभर अन्न असेल त्या वेळींच उत्पन्न होतो.' बोअर युद्धाच्या वेळीं इंग्रजांना जय मिळावा म्हणून प्रार्थना करणाऱ्या ढोंगी राजनिष्ठांची टर उडवितांना ते परमात्म्याच्या तोंडून पुढील शब्द वदवितात :

*प्रार्थना करण्यासाठीं जमलेल्या या मेळाव्याकडे पहा. एकाच्या खिशांत चोरीचे पैसे आहेत, दुसऱ्याच्या जिभेवर असत्य भाषणाचे डाग पडले आहेत, तिसऱ्याच्या तोंडाला शराबाची दुर्गंधि येत आहे. त्या इसमाऱ्या हाताला निरपराधी माणसाच्या रक्ताचे डाग पडलेले आहेत आणि त्याच्या पलीकडील इसमाच्या अंगावर लांचाच्या पैशांनीं विकत घेतलेला दुपेटा आहे. पातकांच्या सर्व चिन्हांनीं नखशिखांत नटलेले जे लोक, त्यांची प्रार्थना कोण ऐकेल ? जगांतील मनुष्यांचें दुःख कसें कमी होईल, याविषयीं विचार करीत आपण सर्व देव आज बसलों असतांना येथें आपल्यापुढें बोअर लोक मरावे म्हणून हे लोक प्रार्थना करीत आहेत! ह्यांना काय म्हणावें ? लोकांना मारण्याचा धंदा देवानें पत्करला, असें यांना कोणी सांगितलें कोण जाणे !'*

## ७

शिवरामपंतांनीं आपलें हें उपरोधाचें हत्यार त्या वेळच्या सामाजिक सुधारणांवरही चालविलें आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या लेखांत वाङ्मयदृष्ट्या कांहीं चांगलीं स्थळें असलीं, तरी सामाजिक सुधारणेवरली त्यांची सर्व टीका तर्कशुद्ध अथवा विचारप्रेरित होती असें म्हणतां येणार नाहीं.

'आधीं राजकीय कीं आधीं सामाजिक ?' हा वाद प्रथम टिळक-आगरकरांनीं लढविला. आगरकरांच्या मृत्यूनंतरही तो महाराष्ट्रांत दीर्घकाल धुमसत राहिला. टिळकांनीं सामाजिक सुधारणेचा कधींच पुरस्कार केला नाहीं. पण त्यांच्या या वृत्तीच्या मागें एक निश्चित व्यावहारिक भूमिका होती. ज्या समाजाला त्यांना राजकीय दृष्ट्या जागृत, संघटित व लढाऊ करून राष्ट्रवादाच्या भूमिकेवर उभें करायचें होतें, त्याच्या भावना दुखवून आपला कार्यभाग होणार नाहीं हें ते जाणून होते. त्यांनीं सामाजिक सुधारणेच्या बाबतींत प्रथम प्रथम विरोधकाची, पण पुढें बहुशः उदासीन त्रयस्थाची भूमिका पत्करली. शिवरामपंतांची या बाबींतली विचारसरणी टिळकांच्याहून फारशी भिन्न नसावी. पण लहान मुलाला दांत येऊं लागले म्हणजे त्याला जसें कुणाला तरी चावल्याशिवाय चैन पडत नाहीं, त्याप्रमाणें शिवरामपंतांच्या उपरोधपूर्ण कल्पकतेलाही सुधारकांना जातां जातां

चिमटे काढण्याचा किंवा तसाच मोका मिळाला तर अस्वलाच्या गुदगुल्या करण्याचा मोह आवरतां आला नाहीं. त्यांचें मन भावनाशील असलें, तरी तें देशाच्या दुःखाप्रमाणें व्यक्तीच्या अथवा वर्गाच्या दुःखाशीं कधींच समरस होऊं शकलें नाहीं. जिथें राष्ट्रच पारतंत्र्यांत कुजत पडलें आहे, तिथें व्यक्तीच्या सुखदुःखाची काय किंमत आहे, असें देशभक्तीच्या एकमेव भावनेनें धुंद झालेल्या मनांना त्या वेळीं वाटत असावें. ही एकांगी भावना पुढें पक्षाभिनिवेशामुळें न कळत अंध होऊन जाई. केवळ भावनेवर अवलंबून असलेलें भूतकाळाचें आवाहन पारतंत्र्यांत पिचणाऱ्या सर्वसामान्य मनुष्याच्या मनाला सहज पोंचूं शकतें ! पण कुठल्याही राष्ट्राचा उज्ज्वल भविष्यकाळ केवळ भावनेंतून निर्माण होत नाहीं. त्या भावनेला शास्त्रशुद्ध तत्त्वज्ञानाचें आणि सर्वस्पर्शी सामाजिक प्रगतीचें अधिष्ठान असावें लागतें. तरच सामान्य मनुष्य आपल्या भाग्याचा शिल्पकार होऊं शकतो. पण शिवरामपंतांच्या लेखनांत ही दृष्टि सहसा दिसत नाहीं. राजकीय क्रांतीइतकीच सामाजिक क्रांति ही महत्त्वाची गोष्ट आहे, हें त्यांना कधींच पटलें नाहीं. जो राजकीय बाबतींत जहाल, तो सामाजिक बाबतींत सनातनी, आणि जो सामाजिक गोष्टींत सुधारक तो राजकारणांत मवाळ, अशी जणुं कांहीं तेव्हां महाराष्ट्रांतल्या विचारांची विचित्र विभागणी झाली होती. या एकांगीपणामुळें महाराष्ट्राच्या बौद्धिक विकासांत, जीवनविषयक तत्त्वज्ञानांत आणि व्यावहारिक प्रगतींत जे गोंधळ निर्माण झाले, ते अजूनही पुरे नाहींसे झालेले नाहींत. सावरकर हे शिवरामपंतांचे अनेक दृष्टींनीं शिष्योत्तम ठरतील. त्यांच्यामध्यें टिळकांच्या राजकारणांतला जहालपणा आणि आगरकरांच्या समाजकारणांतला तीव्रपणा यांचा संगम प्रथम आढळून आला. पण सावरकरांचें ऐन कर्तृत्वाचें सर्व आयुष्य अंदमानांत गेल्यामुळें त्यांच्या या दुहेरी श्रद्धेचा फायदा महाराष्ट्राला मिळूं शकला नाहीं. टिळकयुग संपून गांधीयुग सुरू झाल्यावर विचारांची ही कृत्रिम विभागणी हळु हळु मागें पडली. राजकीय क्रांति व सामाजिक क्रांति या तत्त्वतः जुळ्या बहिणी आहेत. किंबहुना जिला आपण प्रगति म्हणतों, तिचें स्वरूप जरासंधासारखें असतें. जरासंधाचें शरीर दोन शकलें एकत्रित करून निर्माण केलेलें होतें अशी कथा आहे. एका विशिष्ट तऱ्हेनें तीं शकलें जुळविलीं तरच त्यांत चतन्य निर्माण होत असे. राष्ट्रपुरुषही असाच असतो. राजकीय व सामाजिक अशा दोन्ही प्रकारच्या क्रांती जेव्हां त्याच्या जीवनांत एकजीव होतात, तेव्हांच त्याच्या विराट देहांत तेजाचा संचार

होऊन त्याचें भविष्य उजळून निघतें. पण ही गोष्ट शिवरामपंतांच्या वेळच्या महाराष्ट्राच्या पचनीं पडली नाहीं.

मात्र शिवरामपंतांनीं सामाजिक सुधारणेला स्थानीं अस्थानीं घेतलेल्या चिमट्यांचें आणि तिच्या अकारण केलेल्या विडंबनाचें आज मंडन होण्याजोगें नसलें, तरी भावनाशील मनुष्याच्या मनामध्यें दीनदलितांविषयीं जी एक स्वाभाविक सहानुभूति वास करीत असते, आर्थिक विषमतेचीं आणि मानवी अन्यायाचीं भेसूर चित्रें पाहून त्याच्या कविमनाची जी तडफड होते, ती शिवरामपंतांच्या लेखांत सुद्धां आढळते, हें त्यांच्या टीकाकारगलाही कबूल केलेंच पाहिजे. त्यांचा खालील उतारा वाचल्यावर ते समाजवादी होते, असें म्हणण्याचा आजच्या कुणाही वाचकाला मोह होईल. ' संपत्तीचा दुरुपयोग ' या लेखांत ते म्हणतात :

*आजच्या जगांत दहा जणांना पोटभर अन्न व वस्त्र मिळालें तर त्यांच्या दसपट लोकांना वेळेवर घांसभर अन्न मिळविण्यासाठीं दारोदार फिरावें लागतें व थंडीवाऱ्यांत उघडें पडावें लागतें. कांहीं लोकांनीं आपले कोट, झगे, पाटलोणी आणि टोप्या यांच्यासाठीं दरमहा शेंकडों रुपये खर्च करावे आणि कांहीं गरिबांना ॲडॅम आणि इव्ह यांच्या पातकामुळें जो शरीराचा भाग झांकणें अवश्य वाटूं लागलें, तो झांकण्यापुरत्या चिंध्या उभ्या वर्षांत मिळूं नयेत, इतकें खरोखर देवाचें अंतःकरण कठोर नाहीं. ही सारी मनुष्याची कर्तबगारी आहे. जनावरांत एक श्रीमंत जनावर व एक गरीब जनावर असा भेद नाहीं. पण माणसाकडे पाहिलें तर आपल्याला काय दिसतें ? एका पिढीला पुरण्यासारखें द्रव्य जवळ सांचलें तरी तृप्ति न होऊन तें सात पिढ्या कसें पुरेल या विवंचनेंत तो पडतो आणि खऱ्या खोट्या मार्गानें तो आपल्या सात पिढ्यांना पुरेल इतकी संपत्ति गोळा करून ठेवतो. परंतु याचा परिणाम असा होतो कीं या श्रीमंताचे अजून जन्मास न आलेले मुलगे, नातू, पणतू, खापर पणतू, आणि या खापर पणतूंचे नातू–पणतू यांना आजपासून पुढें शंभर वर्षांनीं मजा मारतां यावी आणि चैनबाजी करतां यावी म्हणून आतां जन्मास येऊन चुकलेल्या हजारों माणसांस उपाशी मरावें लागतें. श्रीमंतांच्या घरची एक मेजवानी आणि नाच किंवा बैठक म्हटली म्हणजे हजार गरीब शेतकऱ्यांच्या शेतां-*

*वर दहा वर्षें पाऊस न पडण्यासारखेंच आहे. काय हा खादाडपणा आणि काय हा राक्षसीपणा ! या श्रीमंतांच्या चैनबाजीनें लढाई नसतांनाही देश ओसाड पडतात. दुष्काळ नसतांनाही गरीब उपाशी राहतात. आणि रोग नसतांनाही माणसें मरतात. गरिबांच्या मुलाबाळांचा सणावाराच्या दिवशीचा देखील आनंद आपल्या खजिन्यांत श्रीमंतांनीं असा कोंडून ठेवणें चांगलें नाहीं. सर्वांला मर्यादा आहे. तशीच गरिबांच्या सोशिकपणालाही मर्यादा आहे, हें कोणी विसरतां कामा नये !*

## ८

भावनेच्या साहाय्यानें देशभक्ति चेतविण्याचा काळ आतां मागें पडला आहे. पुढचा काळ विवेकाचा आहे, कर्तृत्वाचा आहे. निद्रित जनतेचीं मनें जागृत कशीं होतील आणि तीं खडबडून परकीय सत्तेविरुद्ध दंड थोपटून बंड करायला कशीं प्रवृत्त होतील ही एकच चिंता शिवरामपंतांना होती. अमूर्त स्वातंत्र्यदेवतेचे ते निःसीम भक्त होते. पूजेकरतां ते तिचें ध्यान करूं लागले कीं त्यांच्यापुढें यज्ञ-कुंडांतून प्रगट होणाऱ्या द्रौपदीचीच मूर्ति उभी राही. लगेच एके काळीं स्वातंत्र्याच्या शिखरावर असलेल्या पण आतां गुलामगिरीच्या दरींत कपाळाला हात लावून बसलेल्या अभागी भरतभूमींत त्या द्रौपदीचें रूपांतर होई. शिवरामपंतांना तें चित्र पाहवत नसे. शत्रूंच्या रक्तानें माखलेल्या हातांनींच मी तुमच्याकडून वेणी बांधून घेईन, तोंपर्यंत मी मुक्तकेशाच राहीन, असें भीमाला बजावणारी पांचाली त्यांच्या डोळ्यांपुढें नाचूं लागे. त्या पांचालीच्या नेत्रांतील अग्निज्वालांच्या तालावर नृत्य करण्यांत त्यांच्या पांडित्यपूर्ण प्रतिभेनें सदैव धन्यता मानली. लेखणीचा भाला कसा करावा ही कला त्यांनींच मराठी लेखकांना शिकविली. मध्यम वर्गाला राजकीय दृष्ट्या केवळ जागृतच नव्हे तर बंडखोर करणारा टिळक-युगांतला तेजस्वी लेखक म्हणून लोक-मान्यांच्या जोडीनें त्यांच्या नांवाचा आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासांत सदैव उल्लेख होत राहील.

शिवरामपंतांनीं केवळ राजकीय स्वातंत्र्याची उपासना केली हें खरें; पण ती करतांना आपल्या आराध्यदेवतेचें पूजासाहित्य गोळा करण्यासाठीं ते साऱ्या

जगभर फिरले. ग्रीसचें स्वातंत्र्य असो, वुल्फ टोनचें चरित्र असो, स्वित्झर्लंडमधली बंडखोरांची उठावणी असो, अथवा आयर्लंडमधल्या रॉबर्ट एमेटचें भाषण असो, शिवरामपंत या सर्व स्वातंत्र्ययज्ञांच्या आणि त्या यज्ञांतल्या ऋत्विजांच्या वर्णनांत रंगून जात असत. निरनिराळ्या राष्ट्रांच्या राजकीय इतिहासांत जें जें दिव्य, भव्य, अथवा उदात्त आढळेल, त्याचें त्याचें स्वागत त्यांनीं मोठ्या हौसेनें केलें. त्यांनीं घालून दिलेला हा धडा यापुढेंही मराठी लेखकांनीं गिरविला पाहिजे.

आपण आतां स्वातंत्र्याचा उंबरठा ओलांडला आहे. आगामी काळांत केवळ राजकारणाच्याच नव्हे तर जीवनाच्या सर्व क्षेत्रांत जगांत जिथें जिथें मांगल्य, कर्तृत्व, प्रेरणा, आणि प्रगतिशीलता आढळेल, जिथें जिथें मानवधर्माचा निर्भय पुरस्कार होत असेल, तिथें तिथें भारतानें आपलें मस्तक नम्र केलें पाहिजे, तिथून स्फूर्ति घेतली पाहिजे, त्या स्फूर्तीला स्वतंत्र बुद्धीची आणि प्रामाणिक त्यागाची जोड देऊन आपलें भाग्य घडविलें पाहिजे. अंध भावनेनें उज्ज्वल गतकालाचे पोवाडे गाऊन किंवा सामाजिक प्रगति कुंठविणाऱ्या भारतीय संस्कृतींतल्या असंख्य दोषांकडे दुर्लक्ष करून यापुढें आपलें चालणार नाहीं. अर्धशतकापूर्वीच्या काळांत शिवरामपंतांना आपला इतिहास व आपली संस्कृति यांचा अभिनिवेशानें पुरस्कार करावा लागला असला आणि कल्पकता, उपरोध, वक्तृत्व, इत्यादि गुणांनीं नटलेल्या त्यांच्या शैलीमुळें तो लोकांना परिणामकारक वाटला असला तरी त्यांचा आत्मा आज आपल्याला जो संदेश देईल तो केवळ इतिहासाच्या अंध पूजेचा असणार नाहीं. उलट तो 'ब्लॅक होल' या आपल्या निबंधांतल्या खालील भागाकडे बोट दाखवील :

*भलभलत्या कल्पना, अनेक पिढ्यांपासून चालत आलेल्या राष्ट्रहित-विघातक रूढी, जगाच्या वस्तुस्थितीविषयीं अत्यंत अज्ञान, मूर्खपणाच्या धर्मकल्पना आणि सामाजिक आचारविचार यांचें जोखड, स्वहिता-बद्दलच्या कोत्या समजुती आणि सार्वजनिक हिताबद्दल अत्यंत अनास्था, हे गुण ज्या राष्ट्राच्या अंगीं पिढीजाद खिळलेले आहेत, तीं राष्ट्रें गुलाम-गिरीची स्थिति अनुभवण्याला परिपक्व झालीं म्हणून समजावें ! अशा राष्ट्रांवर इंग्लिशांनीं स्वारी केली म्हणून इंग्लिशांवर रागावण्याचें कांहीं कारण नाहीं. इंग्लिशांनी तो देश जिंकला नाहीं, तर दुसरे कोणीतरी तो*

जिंकणारच. ज्याच्या अंगांतील सद्गुणरूपी प्राण निघून गेला व जें प्रेत झालें, तें जाळलें काय किंवा पुरलें काय, किंवा कोणी गिधाडांनीं खाल्लें काय, सर्व सारखेंच ! तें गिधाडांनीं खाल्लें नाहीं, तर कुत्रीं त्याचे लचके तोडतील. परंतु त्याचें स्वतःचें नशीब काय तें ठरलें गेलें ! अज्ञान हा राष्ट्राचा भयंकर शत्रु होय. वस्तुस्थितीचा अपरिचय हे सर्व दुर्बळ राज्यांचे अपरिहार्य इंग्लिश होत. आपल्या मूर्खपणाची आणि आपसां-तील कलहाची तोफ आपल्याला जितकी मारते, तितका आपला संहार इंग्लिशांच्या कोणत्याही मशीनगननें केला नाहीं......................

इतर राष्ट्रांतील विचारप्रागल्भ्य जर पोक्त मनुष्यांचें आहे असें म्हटलें तर आपल्यामधील कित्येक अर्वाचीन कवी व चित्रकार यांची कृति म्हणजे निव्वळ अर्भकांची बडबड आहे असेंच म्हणावें लागेल. आपल्यांतील वैद्य काय करीत आहेत, आपल्यांतील वकील काय करीत आहेत, आपले इंजिनीअर्स काय करीत आहेत, आपले शिपाई काय कामें करीत आहेत, आणि आपले खलाशी कशांत व्यग्र आहेत, इकडे पाहिलें म्हणजे आपल्या राष्ट्राच्या फुटलेल्या कपाळावरील खोंक आपल्याला चांगली दिसूं लागते. आपल्या राष्ट्रांतील प्रत्येक जातीचे आणि धंद्याचे लोक या जीवनकलहाच्या जिन्याच्या अगदीं शेवटच्या पायरीवर धडपडत पडलेले आहेत. आपले बिनशिकलेले देशी वैद्य आपल्या कुलपरंपरागत आलेल्या आजोबांच्या बटव्याच्या पलीकडे कधींही न जातां सगळ्या जगांतील रसायनशास्त्राचें संपुटीकरण आपल्या एका बटव्यामध्यें करीत आहेत; आणि आपले शिकलेले डॉक्टर त्यांचीं विलायती औषधें आणून तीं खपविण्याचें एजन्सीचें काम करीत आहेत. दुसऱ्यांच्या कलहावर आपल्या कुटुंबांची एकी आणि दुसऱ्याच्या कर्जबाजारीपणावर आपली श्रीमंती अवलंबून ठेवून आपल्यांतील वकील स्वदेशबांधवांत अनीतीचा आणि कोर्टफीच्या तिकिटांचा फैलाव करण्याला झटत आहेत. पाहिल्याबरो-बर डोळे फिरून जावेत आणि हें काम कसें केलें असेल याच्याबद्दल बघणाराची अक्कल गुंग होऊन जावी, अशा प्रकारचीं प्रतिसृष्टितुल्य कामें करण्याच्या ऐवजीं खडी फोडणारांच्यावर देखरेखी करण्याचें अत्यंत जबाब-

*दारीचें काम आपले इंजिनीअर्स बजावीत आहेत ! आजचें आपल्या शिपायांचें काम म्हटलें म्हणजे शिरस्तेदारापुढचा कागद साहेबापुढें आणि साहेबापुढचा कागद शिरस्तेदारापुढें नेऊन ठेवण्यापलीकडे कांहीं एक नाहीं. आणि परदेशचे दर्यावर्दी अटलांटिक महासागरांतून, हिंदी महासागरांत आणि हिंदी महासागरांतून पॅसिफिक समुद्रांत तेथील लाटांशीं आणि वादळांशीं आपल्या आगबोटींनीं टकरा देत सगळ्या जगाचा व्यापार चालवीत असतां आमचे खलाशी हातभर रुंदीच्या होडग्यांत बसून किनाऱ्याजवळच्या ढोंपरभर पाण्यांत मासे मारीत किंवा त्यांच्या आगबोटीवरील तेलकट यंत्रें सुताच्या बोळ्यांनीं साफ करीत पोटाची खांच भरीत आहेत. असा जिकडे तिकडे अधःपात झालेला आहे.*

या अधःपातापासून राष्ट्राचें रक्षण करण्याला आवश्यक असलेलें राजकीय स्वातंत्र्य आतां आपल्याला मिळालें आहे. तरुण पिढीनें त्याचा उपयोग सर्वांगीण सामाजिक क्रांति यशस्वी करण्याकडे केला तरच ती शिवरामपंतांच्या वाङ्मय-ऋणांतून मुक्त होईल.

शाहुपुरी–कोल्हापूर
२७–११–४७

वि. स. खांडेकर

# दिल्लीचें तख्त आणि भाऊसाहेबांचा घण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 8633

## परिचय

शिवरामपंतांच्या तेजस्वी देशभक्तीचा आणि ओजस्वी भाषाशैलीचा एक उत्कृष्ट नमुना या निबंधांत आढळतो. इतिहास कल्पकतेनें रंगवून वाचकाचें स्वदेशप्रेम जागृत करण्याची त्यांची हातोटी केवळ अनुपम होती. 'शिवाजीची एक रात्र', 'शिवाजीचें पुण्याहवाचन', 'भारतभू ही माता नव्हे का ?', 'रामदासांच्या शब्दांत स्वराज्यासाठीं प्रार्थना', इत्यादि लेखांत त्यांच्या प्रतिभेच्या या शक्तीचें वाचकाला मोठें स्फूर्तिदायक दर्शन होतें. सदाशिवरावभाऊंनीं दिल्लीचें तख्त फोडलें, ही गोष्ट आपण इतिहासांत दोन ओळींत वाचतों. एवढेंच नव्हे, तर वाचल्यावर आपण ती विसरूनही जातों. पण या अपूर्व ऐतिहासिक प्रसंगांतलें काव्य, त्यांतलें नाट्य, त्यांतलें राजकारण, त्यांतली प्रेरकता, इत्यादि गोष्टी शिवरामपंतांच्या लेखणीचा त्याला स्पर्श होतांच आपल्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत नाचूं लागतात. ज्वालामुखीचा स्फोट होऊन तप्त लाव्हा वाहूं लागावा, तसें देशभक्तीनें रसरसलेलें त्यांचें लिखाण आहे. त्या लेखनाच्या ओघांत मधूनमधून ते जीं सूचक, अर्थपूर्ण व परिणामकारक वाक्यें लिहून जातात, त्यांत सुभाषितांचा गोडवा तर असतोच, पण सुभाषितांत सहसा न आढळणारा ज्वलंतपणाही त्यांत प्रगट होतो. हा निबंध वाचल्यावर खालील वाक्यांचें कुणाला तरी विस्मरण होणें शक्य आहे काय ? "लोकांच्या खिशांत जेव्हां पैसे येतात, तेव्हां ते घामानें भिजून येतात. परंतु ते बादशहाच्या खजिन्यांत जातात, तेव्हां रक्तानें ओले होऊन जातात." "लोखंडाचे घण, सोन्याचीं आणि हिऱ्यांचींही तख्तें फोडूं

शकतात, यांत कांहीं शंका नाहीं. आणि असले घणही नेहमीं तयारच असतात. ते धण उचलणारीं मनगटें मात्र पाहिजेत. तीं असलीं म्हणजे कोणतेंही तख्त असलें तरी तें फुटलेंच पाहिजे. "

शिवाजीच्या उदयापासून तों बाजीरावाच्या अस्तापर्यंत मराठ्यांचा प्रतापरूपी सूर्य सर्व महाराष्ट्रावर प्रकाशमान होत असतां त्या अवधीमध्यें मराठ्यांच्या हातून अचाट शौर्याच्या अशा अनेक गोष्टी झालेल्या आहेत. त्या सर्वच आपआपल्या परीनें मोठ्या आहेत. परंतु त्या सर्वांमध्यें एक गोष्ट इतकी भव्य, प्रचंड आणि अद्भुत आहे कीं, तिच्याबद्दल विचार करूं लागलें असतां मन अगदीं थक्क होऊन जातें. ती गोष्ट म्हटली म्हणजे सदाशिवरावभाऊंनीं दिल्लीचें बादशाही तक्त फोडिलें, ही होय. पानिपतच्या मोहिमेमध्यें बारिकसारिक गोष्टी पुष्कळ घडून आल्या असतील, पण ह्या वर नमूद केलेल्या गोष्टीनें ज्याचें मन आकर्षण करून घेतलें नसेल, असा मनुष्य सांपडणें फार कठिण आहे. पानिपतची मोहीम हा मराठ्यांच्या शौर्याचा कळस होता. पानिपतच्या समरांगणावर मराठ्यांच्या शस्त्रांना यश आलें असतें, तर त्यांच्या वैभवाला पारावारच नव्हता. परंतु जरी तेथें त्यांना यश आलें नाहीं, तरी पुण्यापासून अटकेपर्यंत मराठे सरदार अव्याहतपणें कूच करीत आणि खंडण्या घेत गेले, ही गोष्ट कांहीं लहानसहान नव्हे. पानपतच्या मैदानांत पराभव होईपर्यंत ज्या ज्या गोष्टी घडून येत होत्या त्या त्या सर्व मराठ्यांच्या उत्कर्षाच्याच सूचक होत्या. खुद्द ज्या दिवशीं पानिपतास मराठ्यांचा पराभव झाला, त्या दिवशीं संध्याकाळच्या चार घटका दिवस राहीपर्यंतसुद्धां मराठ्यांच्याच पक्षाला यश आलेलें होतें. त्या घटकेपर्यंत मराठ्यांच्या उत्कर्षाची एकसारखी चढतीच कमान होती, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. ह्या उत्कर्षाच्या कालामध्यें मराठ्यांनीं जीं अचाट कृत्यें केलीं त्यांतील पहिल्या प्रतीचें कृत्य म्हटलें म्हणजे त्यांनीं दिल्लीचें तक्त फोडिलें, हें होय.

दिल्लीचें तक्त फोडावें ही कल्पना भाऊसाहेबांची. सुराजमल जाट हा ह्या कल्पनेला विरुद्ध होता. व भाऊसाहेबांनीं दिल्लीचें तक्त फोडलें म्हणून सुराजमल जाट व त्याच्याबरोबर दुसरे कांहीं सरदार मराठ्यांचा पक्ष सोडून निघून गेले. ह्या इतिहासांतील गोष्टीवरून ज्या तक्त फोडण्याचे परिणाम अशा रीतीनें अहितकारक झाले, त्या गोष्टीला इतकें महत्त्व देणें बरोबर नाहीं, असा आक्षेप येणें अगदीं स्वाभाविक आहे. परंतु आम्ही जें या गोष्टीला श्रेष्ठ पद देत आहों, तें अगदीं निराळ्या कारणासाठीं आहे. सध्यांच्या प्रसंगीं आम्हांला ऐतिहासिक वादाशीं विशेष कांहीं कर्तव्य नाहीं. आणि त्या वादांच्या दृष्टीनें विचार केला, तरीही सुराजमल जाटाच्या म्हणण्यांत काय अर्थ होता? सुराजमलाचें असें म्हणणें होतें कीं, आम्ही बादशहाचे नोकर आहों, तेव्हां आमच्या समक्ष बादशहाचा खजिना आम्ही लुटूं देणार नाहीं. पण जाटाच्या ह्या म्हणण्यांत काय अर्थ होता? बादशहाचा खजिना कोठला? बादशहांनीं तो कोठून आणिला होता? बादशहांनीं जन्मास येते वेळीं स्वर्गलोकांतून आपल्याबरोबर तो आणिला होता काय? किंवा त्यांच्या आजापणज्यांनीं आणिला होता? हा बादशाही खजिना आला कोठून? लोकांच्या जवळून पैसे लुबाडून ते बादशहानें आपल्या ताब्यामध्यें आणून ठेविले, म्हणजे झाला तो बादशाही खजिना! पण वास्तविक ते पैसे लोकांच्या श्रमाचे. लोकांच्या खिशांत जेव्हां पैसे येतात तेव्हां ते घामानें भिजून येतात. परंतु जेव्हां ते बादशहाच्या खजिन्यांत जातात, तेव्हां रक्तानें ओले होऊन जातात. गरीब लोक कुदळीनें आणि नांगराच्या फाळानें एक एक पैसा कमावितात आणि बादशाहा तरवारीनें आणि तोफेच्या गोळ्यानें कोट्यवधि रुपयांची लूट मारितात. आणि अशा तऱ्हेनें यांचे खजिने भरतात. असले खजिने बादशहांचे कसले? ते वास्तविक लोकांचेच आहेत. त्यांच्यावर लोकांचाच हक्क जास्त आहे. बादशहांचा लुटारूपणाखेरीज त्यांवर दुसरा कोणता हक्क आहे? ज्यांनीं निढळाच्या घामानें पैसा मिळविला,

ते सर्व लोक चोर व्हावे, आणि ज्यांनीं ते लोकांपासून लुटून आणिले ते त्याचे मालक व्हावे काय? दिल्लीचा खजिना दिल्लीच्या बादशहाचा नव्हता. तो दिल्लीच्या लोकांचा होता. तो हिंदुस्थान या लोकांचा होता. त्या खजिन्यांत हिंदुस्थानच्या लोकांचे पैसे सांठविलेले होते. आतां ते पैसे कोणापासून किती लुबाडून घेतले होते, याचा बादशहाच्या दप्तरामध्यें जमाखर्च नसल्यामुळें ( कारण लुटीच्या पैशाचा जमाखर्च कोण ठेवतो? ), ते ज्याचे त्याला परत करणें ही गोष्ट अशक्य असल्याकारणानें त्या पैशाचा जर कांहीं योग्य विनियोग करण्याचा मार्ग असेल तर तो एकच होता; आणि तो हा कीं, ज्याचा त्याला परत करतां येत नसलेला हिंदुस्थानांतील लोकांचा पैसा हिंदुस्थानांतील लोकांच्या कोणत्या तरी सामान्य अशा कल्याणाकडे लावावयाचा. आणि हिंदुस्थानांतील लोकांचें त्या वेळीं सर्वसामान्य कल्याण असें कोणतें होतें? गझनीचा महमद, महंमद घोरी, वगैरे मुसलमानी योद्ध्यांच्या स्वाऱ्यांपासून हिंदुस्थानचें स्वातंत्र्य दिवसेंदिवस नष्ट होत चाललें होतें. तेव्हांपासून जें ग्रहण लागत चाललें त्याचा पूर्ण खग्रास होण्याची वेळ औरंगजेबाच्या कारकीर्दींत आली होती. पुढें दाक्षिणेमध्यें शिवाजी महाराजांसारखे प्रतापशाली पुरुष उत्पन्न होऊन त्यांनीं जरी महाराष्ट्राला स्वातंत्र्याची गोडी लावून दिली होती, तरी उत्तर हिंदुस्थानामध्यें मुसलमानांचा अंमल कायमच होता. उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांचें पूर्ण वर्चस्व होतें. १७६०।६१ सालचे दिवस असे आले होते कीं, त्या वेळेला मुसलमानांच्या सत्तेला प्रतिबंध करण्याचा कांहीं उपाय योजण्यांत आला नसता, तर पारतंत्र्याच्या जोखडानें हिंदुस्थानांतील लोकांच्या माना कायमच्याच मोडून गेल्या असत्या. दिल्लीच्या बादशहाचे वजन कमी होत चाललें आहे असें पाहून त्याला मदत करण्यासाठीं अहंमदशहा अबदाली हा कंदाहाराहून सैन्य घेऊन येत होता. व अबदालीला मदत करण्यासाठीं रुमशामच्या बादशहानेंही आपलें कांहीं सैन्य पाठविलें होतें. म्हणजे हल्लीं जसे युरोपामध्यें संयोगसंधि ( Alliances )

झालेले आपण पाहतों, त्याप्रमाणें त्यावेळच्या तीन मोठमोठ्या मुसलमान राजांच्यामध्यें हा Triple alliance च झालेला होता. कॉंस्टॅंटिनोपलचा बादशहा, कंदाहारचा बादशहा आणि दिल्लीचा बादशहा हे एकत्र होऊन हिंदुस्थानला गुलामगिरीमध्यें दडपून ठेवण्याविषयीं प्रयत्न करीत होते. असें त्यावेळेचें शत्रूकडील कारस्थान होतें. शत्रु हिंदुस्थानचें स्वातंत्र्य नष्ट करण्यासाठीं खटपटी चालवीत होते आणि त्याच वेळीं आमच्या हिंदुस्थानांतील सुराजमल जाट 'आम्हीं बादशहाचा खजिना रक्षण करणार' म्हणून रडत होते. ह्या लोकांच्या अदूरदृष्टीला काय म्हणावें? त्या वेळेला आपल्या देशाविरुद्ध कोण काय काय कारस्थानें करीत आहेत, याचा जाटांना गंधही नव्हता असें दिसतें. अशा वेळीं जसे मुसलमान एक झाले होते, त्याचप्रमाणें हिंदूंनींही एक व्हावयाला पाहिजे होतें. पण तें सर्व एकाच बाजूला राहून जे भाऊसाहेब सर्व हिंदुस्थान स्वतंत्र करण्याचा प्रयत्न करीत होते, त्यांनाच उलट सुराजमल जाट आडवा आला. परंतु भाऊसाहेबांची दृष्टि सुराजमलासारखी वेडगळ समजुतींनीं आणि मतांनीं आंधळी झालेली नव्हती. आपल्या देशावर कोणतें संकट आलें आहे आणि आपला देश स्वतंत्र करण्यासाठीं आपण या प्रसंगीं काय केलें पाहिजे, याची पूर्ण कल्पना भाऊसाहेबांच्या डोळ्यांसमोर होती. त्यांना हिंदुस्थान स्वतंत्र करावयाचें होतें. त्यांना हिंदुपदपातशाहीची इमारत उभी करावयाची होती; व अशाच धोरणानें त्यांचे सर्व प्रयत्न चालले होते. त्यांनीं दक्षिणेंतून गायकवाड, विंचूरकर, पोवार, निंबाळकर, वगैरे सरदार गोळा करून बरोबर आणिले होते. पुढें कूच करून माळव्यांत आल्यावर तेथें ज्या फौजा होत्या त्या त्यांनीं बरोबर घेतल्या होत्या. बुंदेले व झांशीवाले तमाम समागमें निघाले. जयपूर, उदेपूर, भरतपूरवाले, कुंभेरी, चितोड, रामनगर, वगैरे ठिकाणचे सर्व रजपूत शिपाईही भाऊसाहेबांच्या सैन्यांत येऊन मिळाले. हा अतिशय आणीबाणीचाच प्रसंग होता. १७६१ सालानंतर हिंदुस्थानांत मुसलमानांनीं राज्य करावें कीं, हिंदूंनीं राज्य करावें, हिंदु लोकांनीं गुलामगिरी पतकरावी कीं, स्वतंत्र व्हावें या महत्त्वाच्या

प्रश्नाचा निकाल करण्याचाच हा प्रसंग होता. आणि यासाठींच हिंदूच्या बीजाचे म्हणून जे सरदार व शिपाई होते ते सर्व भाऊसाहेबांनीं आपल्या सभोंवतीं गोळा केले होते. हिंदुस्थान हें हिंदुस्थानांतील लोकांकरितां आहे, दुसऱ्यांकरितां नव्हे. हें प्रतिपादन करण्यासाठीं भाऊसाहेबांच्या सभोंवतीं चार लक्षांच्यावर फौजेचा जमाव जमला होता. इतक्या लोकांच्या खर्चाला काय लागणार नाहीं ? भाऊंनीं आपल्याबरोबर दक्षिणेंतून पुष्कळ पैका आणिला होता. परंतु तो दिल्लीपर्यंत मजल येऊन पोचेपर्यंत सर्व खलास होऊन गेला व फौजेंत पैशाची फार टंचाई झाली. दिल्लीच्या बादशाही तक्तामध्यें अपार खजिना असल्याची माहिती सर्वत्र होती. शिवाय तें तक्तही अतिशय मौल्यवान होतें. ही संपत्ति दिल्लीच्या बादशहांनीं कशी कमाविली होती हें वर आपल्याला दिसून आलेंच आहे. ही हिंदुस्थानांतील लोकांच्या निढळाच्या घामाची संपत्ति हिंदुस्थानच्या लोकांच्या सर्वसामान्य कल्याणाकडे उपयोगांत आणण्याची जर एखादी वेळ असली, तर ती ही होती. हिंदुस्थानांतील लोकांच्या स्वातंत्र्यासाठीं हिंदुस्थानांतील लोकांची संपत्ति उपयोगांत आणावयाची नाहीं, तर तीं केव्हां आणावयाची ? हिंदुस्थानची संपत्ति हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितांच आहे. ती बादशहांच्या जलशांकरितां नाहीं. अशा उदात्त विचारांनीं प्रेरित होऊन भाऊंनीं दिल्लीचें तक्त फोडण्याचा निश्चय केला. त्यांतील पैका भाऊसाहेबांना स्वतःच्या उपयोगाकरितां नको होता. तक्तावरील जवाहीर काढून त्यानें भाऊसाहेबांना आपलें अंग सुशोभित करावयाचें नव्हतें. तर त्या थोर वीराला सर्व हिंदुस्थान स्वातंत्र्यानें सुशोभित करावयाचें होतें. त्या द्रव्यापैकीं चार दमड्या भाऊ-साहेबांच्या पदरांत पडणार होत्या असें नाहीं. त्या पैक्यानें भाऊसाहेबांना आपलें पोट जाळावयाचें नव्हतें; तर हिंदुस्थानला स्वतंत्र करण्यासाठीं ज्या फौजा निघाल्या होत्या त्यांच्या पोटाला अन्न द्यावयाचें होतें. आणि त्यासाठीं सदाशिवरावभाऊंनीं हें कृत्य केलें. व अशा दृष्टीनें पाहिलें

म्हणजे वर निर्दिष्ट केलेला आक्षेप अगदीं पोकळ आणि कमजोर आहे असें कोणालाहि वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

ह्याप्रमाणें ह्या आक्षेपाचें निरसन केल्यानंतर आपण आतां सदाशिवरावभाऊंनीं दिल्लीचें तक्त फोडलें या गोष्टीच्या महत्त्वाकडे वळूं. पानिपतच्या लढाईमध्यें कोणाचा पराभव झाला असें हल्लींच्या इंग्रजी शाळेंतील मास्तरानें विचारलें म्हणजे 'मराठ्यांचा पराभव झाला' असें उत्तर देण्याविषयीं मुलांना शिकविलें असतें. परंतु ह्या प्रश्नाचें उत्तर इंग्रजीच्या अमदानींतील चवथ्या इयत्तेकरितां लिहिलेल्या महाराष्ट्र देशाच्या इतिहासांतील उत्तरापेक्षां जरा जास्त बिकट आहे. पानिपतच्या लढाईमध्यें मराठ्यांचें पुष्कळ सैन्य मारलें गेलें हें खरें, परंतु एवढ्यावरून अबदालीचा जय झाला आणि मराठ्यांचा पराजय झाला हें म्हणणें बरोबर होणार नाहीं. मुख्य सेनापति मरणें किंवा पुष्कळ सैन्य मरणें एवढ्याचवरून जयापजयाची कल्पना ठरविणें रास्त नाहीं. या गोष्टीचा विचार करतांना पुढें घडून आलेल्या परिणामांकडेही लक्ष दिलें पाहिजे. पानिपतच्या लढाईंत मराठ्यांचा मोड झाला असला तर अबदालीचाही मोड झाला आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. कारण, त्यानंतर मुसलमानांची हिंदुस्थानावर काबूलच्या दिशेनें दुसरी स्वारी झाली नाहीं. महंमद गिझनी, तैमूरलंग, नादीरशाह, ह्यांच्या मालिकेंतील अबदाली हाच शेवटचा मणि झाला. ही माळ येथेंच कोणी तोडिली? ह्या स्वाऱ्या येथेंच कोणी बंद केल्या? हा सर्व पानिपतच्या मोहिमेचाच परिणाम आहे. पुढें महादजी शिंद्यांना दिल्लीच्या दरबारांत आपला विशेष जोर बसवितां आला, ह्याला मूळ कारण काय? उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांचें वर्चस्व बहुतेक कमी होऊन लोक इंग्रजी लाटेखालीं बुडून जाईपर्यंत जो स्वातंत्र्याचा थोडाबहुत अनुभव घेत होते, तो कशाचा प्रभाव? ह्या सर्व गोष्टी जर पानिपतच्या मोहिमेपासून झाल्या आहेत, तर त्या मोहिमेमध्यें, निदान त्या मोहिमेपासून, मुसलमान लोकांचा पाडाव झाला, असें म्हणण्याला काय हरकत आहे?

पानिपतच्या लढाईपासून मराठ्यांच्या राज्याला धक्का बसला, हें खरें. पण ह्या लढाईमुळें मुसलमानी राज्याला धक्का बसला नाहीं असेंही नाहीं. अशा रीतीनें ह्या लढाईनंतर तर मुसलमानांचा कमजोरपणा झालाच, पण त्याच्या आधींही हिंदुस्थानांतील मुसलमान राज्याला पूर्णपणें उतरती कळा लागलेली होती. आणि ही गोष्ट भाऊसाहेबांनीं एका कृत्यानें सर्व जगाच्या दृष्टोत्पत्तींस स्पष्टपणें आणून दिली होती. दिल्लीचें तक्त फोडणें ही गोष्ट लहानसहान नव्हती. त्यामध्यें एक प्रकारचा पुष्कळ राजकीय अर्थ होता. भाऊसाहेबांनीं हें दिल्लीचें तक्त फोडलें नव्हे, तर हिंदुस्थानच्या गुलामगिरीचें डोकेंच फोडलें. गुलामगिरीचीं जोखडें हिंदुस्थानांतील सर्व लोकांच्या माना दाबून टाकण्याकरितां येथूनच तयार करून बाहेर पाठविलीं जात असत. बंगाल, बहार, ओरिसा, अयोध्या, लाहोर, सिंध, गुजरात, नागपूर, विजापूर, गोवळकोंडा आणि दौलताबाद या सर्व ठिकाणच्या हिंदू प्रजेला जखडून टाकण्यासाठीं गुलामगिरीच्या शृंखला येथेंच घडविल्या जात होत्या. अखंड भरतखंडांतील लोकांच्या अंतःकरणाला चावून चावून त्यांना रात्रीचीही झोंप येऊं न देणारे गुलामगिरीचे साप आणि विंचू याच वारुळांतून बाहेर पडत होते. सर्व तरतरीत लोकांच्या उमेदी आणि महत्त्वाकांक्षी मनुष्यांच्या आशा करपवून टाकणाऱ्या गुलामगिरीच्या ज्वाळा ह्याच अग्निकुंडांतून निघून सर्व हिंदुस्थानभर सैरावैरा धांवत होत्या. आणि काश्मिरांतील हिमालयाच्या शाखा, माळव्यांतील सातपुडा आणि दक्षिणेंतील सह्याद्रि, अशा मोठमोठ्या उंच पर्वतांनाही बुडवून टाकणाऱ्या गुलामगिरीच्या प्रचंड लाटा ह्याच समुद्रापासून उसळत होत्या. त्या दिल्लीच्या तक्ताचें हें स्वरूप आपण लक्ष्यामध्यें आणिलें म्हणजे तें फोडण्यांत भाऊसाहेबांनीं केवढी मोठी कामगिरी बजावली, याची आपल्याला बरोबर कल्पना करितां येईल. त्या वेळीं दिल्लीच्या बादशहांचा साऱ्या हिंदुस्थानभर अतिशय वचक होता व अतिशय दरारा होता. बाबर, हुमायून, अकबर, जहांगीर, शहाजहान, औरंगजेब, ह्या सर्व बादशहांनीं तें तक्त पवित्र करण्याकरितां आपली सर्व

पुण्याई खर्च केली होती. या सर्व बादशहांचें वैभव त्या तक्तामध्य एक-वटलेलें होतें. तें तक्त म्हणजे मोंगलाई सत्तेची प्रत्यक्ष मूर्तिमंत प्रतिमाच होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. दिल्लीपासून दौलताबादेपर्यंत जो अंमल चालत होता तो या तक्ताचा होता. हिंदुस्थानांतील लोक हत्तीच्या प्रमाणें जुलमाच्या पायाखालीं चुरडले जात होते, तरी 'नाविष्णुः पृथिवी-पतिः' हें तत्त्व त्यांच्या मनामध्यें होतेंच. त्यामुळें ते या तक्ताकडे मोठ्या आदरबुद्धीनें पहात असत. सर्वांच्या मनांत याच्याबद्दल पूज्यबुद्धि वास करीत होती, व या तक्ताबद्दल येथून तेथून सर्व लोकांच्या मनामध्यें एक प्रकारचा भीतिमिश्रित सन्मान वागत होता. या तक्तावर सोन्याच्या मुलाम्याचे थर चढविण्याकरतां हजारों लोक निमूटपणें जुलमी करांच्या खालती वांकत होते. या तक्तावर हिरे आणि माणकें चढविण्यासाठीं कैक श्रीमंत लोक गरीब होत होते. कैक हिंदु देवळांचे जवाहीरखाने उघडे पडत होते, आणि कित्येक रजपूत राजांच्या स्त्रिया आपल्या नैसर्गिक लावण्यांतच संतोष मानून स्वस्थ बसल्या होत्या. ह्या तक्तापुढें शेंकडों मांडलिक राजे आपले करभार आणून ओतीत असत; आणि लढाईंत जिंकलेले शेंकडों कैदी हात जोडून उभे रहात असत. ह्या तक्तापुढें कित्येकांनीं सलाम केले असतील, कित्येकांनीं नाकें घांसलीं असतील, आणि कित्येकांनीं साष्टांग नमस्कार घातले असतील. ह्या तक्तापुढें मेवाडचे राणे, उदेपूरचे ठाकूर, बंगालचे सुभेदार आणि दक्षिणेचे राजे लवून रोज मुजरा करीत होते. ह्या तक्तापुढें तंग विजारी घातल्या असल्यामुळें नीट बसतां येत नसलेले इंग्लिशांचे वकील आपण अगदींच सुखानें बसलों आहों, असें आपल्या बाह्यात्कारी हसतमुख चेहऱ्यानें सभोंवतालच्या मुसल-मानांना दाखवीत होते. 'हें तक्त मोडो' म्हणून दक्षिणेंतील पाणीदार मराठ्यांमध्यें कोणी शिव्याशाप देत असले तर असोत, बाकी हिंदुस्थान-भर 'हें तक्त सलामत राहो,' म्हणून सर्व लोकांच्या तोंडून प्रार्थना निघत होत्या. ह्या तक्ताच्यापुढें हिंदुस्थानांतीलच काय पण इंग्लंड, पोर्तुगाल,

हॉलंड, इराण, अफगाणिस्थान, कॉन्स्टँटिनोपल, इत्यादि दूरदूरच्या देशांतूनही आलेल्या नजराण्यांच्या राशी पडत असत. असा ह्या तक्ताचा महिमा होता. पण एवढा मोठा महिमाही आपण आपल्या बाहुबलानें लयाला नेऊं व आपला देश स्वतंत्र करूं, अशी महत्त्वाकांक्षा दक्षिणेंतील मराठे वीरांच्या मनामध्यें उड्या मारीत होती; व ती सदाशिवरावभाऊंनीं शेवटास नेली. सदाशिवरावभाऊंचे पूर्वज म्हटले म्हणजे कोंकणांत समुद्रकांठीं एका खेडेगांवांत रहाणारे गृहस्थ. दैवाच्या मनांत नसतें तर विश्वनाथ-भटाचीं मुलें श्रीवर्धनच्या वाळवंटामध्यें नाचतबागडतच पडलीं असतीं. तीं फार उंच चढलीं असतीं तर एकाद्या माडाच्या झाडावर चढलीं असतीं; सिंहासनावर चढलीं नसतीं. त्यांनीं फार मजल मारली असती तर आपल्या पंचक्रोशींतील अगदीं शेवटच्या गांवाला ते गेले असते, पण अटकेपर्यंत गेले नसते. व त्यांनीं फार फार जिंकलें असतें, तर एखादा भाऊबंदकीचा वाद जिंकला असता, हिंदुस्थान देश जिंकला नसता. श्रीवर्धनच्या नारळीच्या बागांतून आणि समुद्रकिनाऱ्यावरील वाळवंटांवरून त्या वेळीं इतर मुलें जशीं नाचतबागडत होतीं, त्याचप्रमाणें बाजी, चिमाजी, रघुनाथ, विश्वास, आणि सदाशिव हीं मुलेंही त्यांच्याचबरोबर कदाचित् नाचतबागडत राहिलीं असतीं. परंतु परमेश्वराची इच्छा कांहीं निराळीच होती. त्याच्या मनांतून ह्या माडावर चढणाऱ्या मुलांना राज्यपदावर चढवावयाचें होतें. त्याच्या मनांतून श्रीवर्धनच्या किनाऱ्यावर या डोंगरापासून त्या डोंगरापर्यंत वाऱ्याप्रमाणें भटकत फिरणाऱ्या या मुलांना त्यांच्या हातांत विजयश्रीचे भगवे झेंडे देऊन साऱ्या हिंदुस्थानभर फिरवावयाचें होतें. त्याच्या मनांतून श्रीवर्धन हें नांव अन्वर्थक करावयाचें होतें. कारण त्यानें येथील हीं मुलें हातीं धरून साऱ्या हिंदुस्थानच्या विजयश्रीचें वर्धन केलें. सदाशिव-रावभाऊही कोंकणांत राहून हल्लीं जसें कित्येक लोक करूं शकतात, त्या-प्रमाणें फार तर माडावरील ताजा नारळ बुक्कीनें फोडूं शकला असता. पण सदाशिवरावभाऊंचा जन्म त्याकरितां नव्हता. त्याचा जन्म जुनें बादशाही

तक्त चुर्कानें फोडण्याकरितां होता. व तें कृत्य सदाशिवरावभाऊंनीं केलें. बादशाही तक्ताचा मोठेपणा आणि सदाशिवरावभाऊंच्या पूर्ववृत्ताचा कोंकणीपणा हीं वर लिहिलेल्या रीतीनें आपल्या डोळ्यांपुढें आपण मांडलीं असतां सदाशिवरावभाऊंनीं केवढें प्रचंड, अघटित आणि अलौकिक कृत्य केलें, याची आपल्याला बरोबर कल्पना येईल. बाकीच्या लोकांचे डोळे बादशाही वैभवानें दिपून गेलेले होते, पण सदाशिवरावभाऊंची दृष्टि साफ होती. सदाशिवरावभाऊंना पक्कें माहित होतें कीं, बादशाही तक्त कसलेंही केलेलें असो, पण त्याला कोणी फोडणारा भेटला कीं, तें फुटलेंच पाहिजे व त्याप्रमाणें जें तक्त सहासात शतकेंपर्यंत अभेद्य झालें होतें, त्याला अखेरीस सदाशिवरावभाऊ हा फोडणारा भेटला आणि त्याबरोबर तें फुटलें. तक्त कसलेंही केलेलें असलें तरी लोखंडाचा घण ही अशी कांहीं एक अजब चीज परमेश्वरानें ह्या जगामध्यें निर्माण करून ठेविली आहे कीं त्याच्याखालीं सर्व प्रकारच्या धातूंचे तुकडेच झाले पाहिजेत. लोखंडाचे घण सोन्याचीं आणि हिऱ्यांचीही तक्तें फोडूं शकतात यांत कांहीं शंका नाहीं. आणि असले घणही नेहमीं तयारच असतात. ते घण उचलणारीं मनगटें मात्र पाहिजेत. तीं असलीं म्हणजे कोणतेंही तक्त असलें तरी तें फुटलेंच पाहिजे. बलाढ्य, सत्त्वशील, सत्ययुक्त, आणि न्यायोपबृंहित अशा मनगटानें उचललेल्या घणाखालीं निष्कारण मारलेल्या लोकांच्या रक्तानें लाल झालेल्या, गांजलेल्या शिव्याशापरूपी धरणीकंपाच्या धक्क्यांनीं डळमळूं लागलेल्या, अनन्वित जुलूम, अन्यायाचे कर, प्रजेचा असंतोष, राजवल्लभांचीं दुर्व्यसनें, फंदफितुरी, आणि बंडाळ्या ह्या अनेक भुंग्यांनीं आंतून पोखरलेल्या तक्ताचे तुकडे तुकडेच झाले पाहिजेत, ही गोष्ट भाऊसाहेबांच्या मनामध्यें येऊन चुकलेली होती. इतर लोकांना जरी ह्या तक्ताचा मोठा बाऊ वाटत होता, तरी बादशाही जुलुमामुळें त्याला आधींच भेगा गेलेल्या भाऊसाहेबांच्या डोळ्याला दिसत होत्या. तें तक्त बादशाही अन्यायानें आधींच फोडून ठेविलें होतें. भाऊसाहेबांनीं नंतर घण उचलला. दक्षिणेंतील श्रीवर्धनच्या समुद्र-

काठचा एक मुलगा उत्तर हिंदुस्थानांतील यमुनेच्या कांठच्या दिल्लीच्या किल्ल्यांत जाऊन, आपल्या देशाच्या स्वतंत्रतेसाठीं हातावर शिर घेऊन निघालेल्या लोकांच्या पोटाला अन्न देण्यासाठीं सहा सात शतकांच्या संचित केलेल्या वैभवानें उभारलेलें तक्त फोडण्याकरितां आपल्या आजानुलंबी पवित्र हातामध्यें घण घेऊन उभा राहिलेला आहे, ही कल्पना, हा प्रसंग, हें चित्र, हें संविधानक किती आल्हादजनक, किती स्वदेशप्रीतिजनक आणि किती रोमहर्षक आहे, ह्याची प्रतीति आज आपल्याला केवळ कल्पनासृष्टी-मध्येंच करून घेतली पाहिजे. ज्यांनीं अशा स्थितीमध्यें सदाशिवरावभाऊंना प्रत्यक्ष पाहिलें असेल त्यांचे डोळे धन्य! त्यांनीं बाहुवीर्याची परमावधि पाहिली! आणि स्वातंत्र्यप्रीतीची पराकाष्ठा अनुभविली!

बादशाही तक्त भाऊसाहेबांच्या डोळ्यांसमोर होतें. शहाजहान, औरंगजेब, बहादुरशहा, अहमदशहा, वगैरे बादशहा ज्या तक्तावर बसून सर्व हिंदुस्थानचें राज्य हाकीत होते, तें तक्त रिकामें झालेलें भाऊसाहेबांच्यापुढें होतें. व त्या तक्तावर बसून आपण बादशहा व्हावें अशी इच्छा भाऊसाहेबांच्या मनांत आली असती, तर त्यांचा हात धरावयाला त्या वेळेला कोण समर्थ होता? कोणी नव्हता. तरी पण आपण त्या तक्तावर बसावें आणि आपण आतां हिंदुस्थानचे बादशहा झालों आहों, अशी चोहोंकडे द्वाही फिरवावी, ही कल्पना भाऊसाहेबांच्या मनाला शिवलीसुद्धां नाहीं. ज्या तक्तावर बसण्याकरितां शेंकडों बादशहा धडपडत होते, धडपडत आहेत, आणि धडपडत राहतील, तें तक्त फोडण्यांतच भाऊसाहेबांना जास्त कृत-कृत्यता वाटली ह्यांतच त्यांच्या आंगचा थोरपणा दिसून येत आहे. असल्या तक्तांवर बसेल कोणीही. पण जो तीं फोडतो तो त्यावर बसणाऱ्यांच्याही मानेवर बसण्याच्या योग्यतेचा असला पाहिजे. रामानें समुद्रावर सेतू बांधिला म्हणून कित्येकांना मोठी शिफारस वाटत होती. परंतु एका आचमना-मध्यें सर्व समुद्राचें पाणी पिऊन टाकणाऱ्या कुंभोद्भव ऋषींची गांठ पडल्या-बरोबर ती सर्व फुशारकी फिकी पडली. तद्वत् या दिल्लीच्या तक्तावर बसलेल्या

बादशहांना आपण फार मोठे म्हणून अतिशय धन्यता वाटत होती. पण तें तक्त फोडणारा निघाला, तेव्हां या सर्व धन्यतेचें पाणी होऊन गेलें असलें पाहिजे. आणि ज्याप्रमाणें क्षारोदक समुद्र अगस्त्यमूत्रमय मानला गेल्यामुळें तो रामाला अस्पर्शनीय झाला, त्याचप्रमाणें सदाशिवरावभाऊंच्या घणानें छिन्नविछिन्न केलेलें आणि फोडून टाकलेलें तें तक्त त्यांच्या मागून येणाऱ्या राजांना, जर त्यांच्यांत कांहीं मानीपणा असेल तर, केवळ अनुपभोग्यच झालेलें आहे. अशा रीतीचें अचाट कृत्य सदाशिवरावभाऊंनीं आपल्या इतिहासामध्यें करून ठेवलें आहे. असलीं कृत्यें फार मनन करण्यासारखी असतात. असल्या कृत्यांत उदार मनोवृत्ती एकसारख्या उचंबळत असतात. सत्त्वगुण, शौर्य, स्वातंत्र्यप्रीति, स्वदेशभक्ति, आत्मोन्नति, इत्यादि अनेक गुण असल्या कृत्यांच्या पोटामध्यें सदोदित वास करीत असतात. ज्यांनीं असलीं उत्तम आचरणें केलीं ते खात्रीनें स्वर्गलोकालाच गेले असले पाहिजेत.

---

**अभ्यास** :—

*( १ ) 'कांचनगडची मोहना' ( खाडिलकर ) या नाटकांतल्या प्रतापरावानें पातशहाच्या वकिलाला दिलेलें तेजस्वी उत्तर वाचा.*

*( २ ) 'भाऊसाहेबांनीं हें दिल्लीचें तख्त फोडलें नाहीं तर हिंदुस्थानच्या गुलामगिरीचें डोकेंच फोडलें' या वाक्याचें स्पष्टीकरण करा.*

*( ३ ) नेपोलियनप्रमाणें सदाशिवरावभाऊ हाही एक दुर्दैवी वीरपुरुष होता, असें इतिहासाचे तज्ज्ञ कां म्हणतात ?*

## डेक्कन कॉलेज पाहून केशवरावांच्या मनांत आलेले विचार २

### परिचय —

चिपळूणकर, आगरकर व टिळक या तीन निबंधकारांनीं शिवरामपंतांच्या-पूर्वीं वाचकांना आपल्या लेखणीनें अंकित केलें होतें. पण या तिन्ही निबंध-कारांच्या प्रकृतिधर्मात, जीवनश्रद्धांत आणि विचारांचा आविष्कार करण्याच्या शैलींत खूप फरक असला तरी निबंधलेखनाची एक ठराविक पद्धत त्यांनीं मान्य केली होती. फक्त आगरकरांनीं क्वचित् या सांच्याबाहेर जाऊन थोडें लेखन केलें होतें. पण शिवरामपंतांच्या प्रभावी कल्पकतेला असलें तंत्राचें बंधन मानवणें शक्य नव्हतें. त्यांना फक्त केवळ देशभक्तीचा विचार सांगावयाचा नव्हता. पारतंत्र्यामुळें निर्माण झालेली परिस्थिति त्यांना वर्णन करावयाची होती. या परिस्थितीच्या चक्रांत सांपडलेलीं विविध स्वभावाचीं मनुष्यें त्यांना दाखवा-वयाचीं होतीं. त्यांचा निबंध अनेकदां गोष्ट किंवा लघुनिबंध यांच्या सीमेवर रेंगाळत आहे असा जो भास होतो, त्याचें कारण हेंच आहे.

गंभीर आणि विचारप्रधान निबंधलेखन करणाऱ्यांना जे विषय हाताळणें अशक्य होतें, ते शिवरामपंत किती कुशलतेनें रंगवूं शकत असत, हें या लेखा-वरून दिसून येईल. टिळक–आगरकरांच्या पिढींत त्यांच्यासारखे त्यागी देशभक्त हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच निघाले. पण इंग्रज सरकारची सोनेरी बेडी पायांत घालून घेणाऱ्या इतर सुशिक्षितांना आपल्या देशाच्या दुःस्थितीविषयीं कांहींच वाटत नव्हतें, असा मात्र याचा अर्थ करणें, चुकीचें होईल. अशा एका सुशिक्षिताचें हृदय शिवरामपंतांनीं या लेखांत उघड करून दाखविलें आहे. अज्ञानामुळें देशाची दुर्दशा ज्याला कळूं शकत नाहीं तो गुराखी आपल्यापेक्षां

अधिक भाग्यवान आहे, असें या लेखांतल्या केशवरावांना वाटतें. निराश मनःस्थितींत मनुष्याच्या मनांत अशी कल्पना येणें स्वाभाविक असलें, तरी शिवरामपंतांच्या अंगीं लघुनिबंधलेखकाला लागणारे जे अनेक गुण होते, त्यांचाही ही कल्पना फुलवतांना नकळत आविष्कार झाला आहे, असें वाटल्यावांचून रहात नाहीं. 'मोठेपणाचा वीट' व 'चंद्राचा सोनेरी राजवाडा' हे त्यांचे दोन निबंध या विशिष्ट दृष्टीनें अवश्य वाचावेत.

डेक्कन कॉलेज सोडून केशवरावांना वीस पंचवीस वर्षें झालीं होतीं. डेक्कन कॉलेजांतून बी. ए. अभ्यास संपवून पुढें केशवराव एलूएलू. बी. चा अभ्यास करण्याकरतां तीन चार वर्षें मुंबईस होते. ती परीक्षा पास झाल्यानंतर त्यांनीं खानदेशांत बरींच वर्षें वकिलीचें काम केलें. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांचा मुनसफीचा नंबर आल्यावर त्यांनीं मुनसफीची नोकरी पतकरली. केशवरावांनीं जरी सरकारी चाकरी धरली होती, तरी त्या चाकरीमुळें त्यांची स्वदेशभक्ति तिळभरही कमी झाली नव्हती. ते नेहमीं इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रें वाचीत असत. त्यामुळें आपल्या देशाचे आणि देशबांधवांचे कसकसे हाल होत आहेत, ह्याबद्दलची साद्यंत हकीगत त्यांना नेहमीं अवगत असे. व आपल्या देशाच्या अत्यंत कष्टमय स्थितीचें चित्र त्यांच्या डोळ्यांपुढें रात्रंदिवस असे. स्वदेशाच्या सद्यःस्थितीचे विचार त्यांच्या मनांत नाहींत, असा एक क्षणही गेला नाहीं. ते सुग्रास अन्न जेवीत असतांना, दुष्काळानें उपाशीं मरणारे लोक त्यांच्या डोळ्यांपुढें दिसत; व त्यामुळें त्यांना जेवण गोड लागत नसे. ते मऊ बिछान्यावर निजले असतांना घरांदारांवांचून आणि वस्त्रांवांचून उघड्या हवेंत थंडीनें कुडकुडणाऱ्या लोकांची त्यांना आठवण होई, व त्यामुळें त्यांना साऱ्या रात्रभर झोंप येत नसे. ते कोर्टांतील आपल्या न्यायाधीशाचे खुर्चीवर अकरा वाजतां येऊन बसले, म्हणजे त्या दुपारच्या वेळीं उन्हातान्हांतून काबाडकष्ट करणारे लोक, आणि भाकरीच्या तुकड्यासाठीं दारोदार हिंडणारे

भिक्षेकरी, हे त्यांच्या डोळयांसमोर दिसूं लागत; व त्यामुळें त्यांना बराच वेळपर्यंत कांहीं कांहीं कामकाज सुचत नसे. आपल्या पगाराचे रुपये मोजून घेतांना, आपल्या निकालानें जे गरीब ऋणको दिवाणी तुरुंगांत पडलेले असत, व ज्यांचीं घरेंदारें जप्त झालेलीं असत, त्यांची त्यांना आठवण येई; व दिवाणी तुरुंगांतील कैदी आणि जप्त झालेलीं घरें हीं महिन्याच्या कांठीं दहापांच तरी मोकळीं होत. पण ते कैदी आणि तीं घरें ह्यांना कोण मोकळें करतें, हें वादीला आणि प्रतिवादीला दोघांनाही क्वचितच माहीत असे. अशा रीतीनें केशवराव सरकारचीं आणि देशाची दोघांचीही चाकरी बजावीत असतां कांहीं वर्षें लोटलीं. परंतु पुढें एकदां असा कांहीं प्रसंग आला कीं, त्यामुळें केशवरावांच्या मनाला उपरति होऊन, त्यांनीं आपल्या चाकरीचा राजीनामा दिला, व ते पुण्यांत सुखवस्तु येऊन राहिले. केशवरावांची स्वदेशभक्ति दिवसेंदिवस दृढ होत चालली होती. पण त्यांची प्रकृति मात्र उलट अगदीं क्षीण होत चालली होती. म्हणून ते व्यायामाकरितां दररोज फिरावयाला जात असत. नित्यक्रमाप्रमाणें एके दिवशीं पहांटेस फिरावयास गेले असतां, मध्येंच दमल्यामुळें ते एका स्वच्छ कातळावर विसावा घेण्यासाठीं बसले. त्यांच्या पलीकडून एक लहानसा ओढा वाहत होता, व त्याच्या पलीकडे कांहीं गाई आणि वांसरें चरावयाला लावून एक गोवारी आपलें अलगूज वाजवीत झाडाखालीं बसला होता व समोरून डेक्कन कॉलेजचीं उंच शिखरें धुक्यामधून अंधक अंधक दिसत होतीं. त्यांजकडे केशवरावांचें लक्ष गेलें. तीं शिखरें पाहून केशवरावांना पूर्वीची आठवण झाली. त्यांची राहण्याची खोली त्यांना दिसूं लागली. त्यांचे कॉलेजांतील सोबती त्यांच्या डोळयांपुढें उभे राहिले; व त्या वेळची स्थिति आपण आतां अनुभवीत आहों, असा त्यांना क्षणभर भास झाला. तरी पण ती स्थितीच त्यांच्या डोळयांपुढें फार वेळ राहिली नाहीं. त्या वेळच्या स्थितीवरून हल्लींच्या स्थितीची त्यांना आठवण झाली. हल्लीं आपल्या लोकांचे होत असलेले हाल त्यांच्या डोळयांपुढें प्रत्यक्ष दिसूं लागले. आपल्या लोकांची हल्लींची दीन, हीन, आणि पराव-

लंबी अवस्था त्यांच्या मनाला विंचवासारखी चावूं लागली. व आपल्या लोकांच्या हल्लींच्या दारिद्र्यामुळें त्यांना दाही दिशा उदास भासूं लागल्या. असे विचार मनांत येऊन त्यांचा कंठ दाटून आला व डोळे पाण्यानें भरून आले, व अशा स्थितींत त्यांच्या मनांत पुढील विचार आले:–

" माझ्या लोकांच्या दुःखास्थितीबद्दल मलाच इतकें वाईट कां वाटत आहे? तो पलीकडच्या झाडाखालीं बसलेला गोवारी आपल्या गाई खडकावर चारावयाला सोडून देऊन आपली व आपल्या गाईची करमणूक करण्याकरितां आपलें अलगूज वाजवीत आहे. तो माझ्या देशांतीलच नव्हे काय? त्याचा आणि माझा—आमचा दोघांचाही—जन्म या हिंदुस्थान देशांतच झालेला नाहीं काय? आणि मी ज्यांना आपले देशबांधव म्हणून समजतों, ते याचेही देशबांधव नाहींत काय? पण हे हिंदुस्थानांतील लोक जितके माझे देशबांधव आहेत; तितकेच ते याचेही आहेत. तर मग या देशबांधवांच्या दैन्यावस्थेकरितां मी दुःखानें रडत बसावें, आणि यानें मजेनें अलगूज वाजवीत बसावें, असें कां? असें कां होतें? याचें कारण काय? "

असें म्हणून केशवरावांनीं आपली शून्य दृष्टि चोहोंकडे फिरवली. इतक्यांत धुक्यामधून अंधक अंधक दिसणाऱ्या कॉलेजच्या शिखराकडे त्यांची दृष्टि गेली. त्याबरोबर त्यांच्या तोंडांतून पुढील उद्गार निघाले:—

" याचें कारण हें कॉलेज! माझ्या देशांतील लोकांच्या दुःस्थितीबद्दल मी कष्टी कां, आणि हा निष्काळजी कां, याचें कारण हें कॉलेज! माझ्या देशांतील लोकांच्या पेट्यांतून पैसे नसले म्हणजे माझ्या पेटींत असलेले पैसे नाहींसे होतात असें नाहीं, मग मी त्यांच्या दारिद्र्यासाठीं कां रडावें? आणि माझ्या देशांतील लोक अन्नावांचून उपाशी मरत असले, म्हणजे माझ्यापुढें वाढून येणाऱ्या ताटांतील पक्वान्नें कांहीं कमी होतात असें नाहीं. मग मी त्यांच्या उपासमारीसाठीं कां कळ-

चळावें ? अशी वास्तविक स्थिति असतां मी मात्र त्यांच्यासाठीं रडतों आणि कळवळतों, आणि हा खुशाल मजेनें अलगूज वाजवीत बसतो, हा काय न्याय झाला ? पण हा सगळा फरक या कॉलेजानें उपन्न केला आहे. मीं जर १५ वर्षांच्या पूर्वी या कॉलेजांत पाऊल ठेविलें नसतें, तर आज मीही याच्याच सारखा दुसऱ्या एखाद्या झाडाखालीं गाई चारीत आणि अलगूज वाजवीत सुखानें बसलों असतों; व तेथील गवत सरलें असतें, तर मी आपल्या गाई घेऊन दुसरीकडे गेलों असतों. ज्या दिवशीं मी या कॉलेजांत प्रथम गेलों; तो दिवसच जर अजिबात उगवला नसता, तर आजचा हा दिवस उगवण्याच्या वेळीं मला माझ्या दुःखमय स्थितीबद्दल पश्चात्ताप, आणि या गोवाऱ्याच्या आनंदमय जीवनयात्रेबद्दल हेवा, कधींही वाटला नसता ! मला लहानपणीं फारसें समजत नसे, त्यामुळें माझी म्याट्रिक्युलेशनची परीक्षा होण्याच्या आधींपासूनच मी कॉलेजबद्दल मनोराज्य करीत असें व मी कॉलेजमध्यें आलों. तेव्हांही माझ्या मनांत फार आशा होत्या. पण आतां त्या आशांत कांहीं अर्थ नाहीं, अशी माझी खात्री होऊन गेलेली आहे. ह्या कॉलेजमधून शिकून बाहेर पडलों म्हणजे मी अमुक करीन, आणि तमुक करीन, असें मला वाटत होतें. मी आपल्या देशाच्या कांहीं तरी कामीं येईन, मी आपल्या देशांतील लोकांची दैन्यावस्था दूर करीन, मी आपला धर्म उत्कृष्टावस्थेला नेईन, अशा एक का दोन, लक्षावधि महत्त्वाकांक्षा माझ्या मनांत घोळत होत्या पण या महत्त्वाकांक्षा कॉलेजमधल्या ! कॉलेजमधल्या महत्त्वाकांक्षा आणि कॉलेजच्या बाहेरील जगामधील वस्तुस्थिति यांच्यांत किती अंतर ? पण या अंतराची त्या वेळीं किंचित्‌ही कल्पना नसते. मी कॉलेजमधून बाहेर आलों, आणि जगाचा अनुभव घेऊं लागलों, तेव्हां मला असें दिसून आलें कीं, मला फारच थोडी स्वतंत्रता आहे; व मला माझ्या देशाकरितां आणि देशबांधवांकरितां फारच थोड्या गोष्टी करतां येण्यासारख्या आहेत. मी पाहिजे तर शाळेंत पोरें हाकलूं शकेन, एखादा बिन किफायतीचा धंदा चालवूं शकेन, किंवा

काँग्रेसमध्यें शब्दापुढें शब्द ठेवून कांहीं वाक्यें बोलूं शकेन; पण याच्या पलीकडे आपलें ज्यांत खरें हित आहे, अशी कोणतीही गोष्ट आज आपल्यापैकीं कोणालाही करतां येण्यासारखी नाहीं, अशी माझी पूर्ण खात्री होऊन चुकली. कॉलेजांत असतांना माझ्या पुष्कळ आशा होत्या. पण कॉलेजमधून बाहेर पडल्यावर मीं काय केलें? वकिलीचा धंदा करून मी गरीबागुरीबांना नाडलें, आणि न्यायाधीश झाल्यावर मीं सरकारचा तोंडपुजेपणा केला. याच्यापेक्षां आणखी मीं काय केलें? माझ्या वडलांना फार वाटत होतें कीं, आपल्या मुलानें कॉलेजमध्यें जाऊन वरिष्ठ प्रतीचें शिक्षण संपादन करावें. बाबा, तुमच्या इच्छेप्रमाणें मी कॉलेजमध्यें जाऊन शिकलों, व कांहीं दिवस तीनतीनशें रुपये पगार देखील मिळविला. पण त्याचा काय उपयोग? स्वार्थ साधण्यासाठीं मी कॉलेजमध्यें जाऊन शिकावें अशी, बाबा, तुमची कधींही इच्छा नसेल. पण कॉलेजमध्यें शिकून मी दुसऱ्यांचा अर्थ काय साधला आहे? माझ्या हातून कोणतें देशकार्य झालें आहे? किंवा कोणत्या देशबंधूचें दुःख माझ्या हातून निवारण झालेलें आहे? पण या गोष्टी कॉलेजांतील शिक्षणानें सध्यांच्या काळीं होऊं शकतील, अशी कल्पनाच मुळीं चुकीची आहे. सध्यांचा प्रसंगच असा आहे कीं, कोणी कोठेंही शिकलेला असो, सर्वांचे हातपाय सारख्याच रीतीनें बांधले गेलेले आहेत, व ते त्यांना कांहीं नियमित मर्यादेपर्यंतच हालवितां येतात; त्याच्या पलीकडे त्यांना कांहींएक करतां येत नाहीं. अशी स्थिति असल्यामुळें या कॉलेजच्या शिक्षणापासून कांहीं तादृश फायदा होणें तर लांबच राहिलें, पण उलट एक मोठा थोरला तोटा मात्र होतो.

आपल्या देशस्थितीबद्दल मला वाईट वाटतें आणि हा गोवारी निष्काळजी आहे याचें मुख्य कारण हेंच कीं, आपली, आपल्या देशाची, आपल्या लोकांची व आपल्या धर्माची काय दुर्दशा झाली आहे हें मला कळतें, आणि याला कळत नाहीं. याला सांप्रतच्या आपल्या वस्तुस्थितीचें ज्ञान नाहीं, आणि मला आहे, यामुळें हा सुखी आणि मी दुःखी असा

आमच्यांत फरक पडला आहे. याच्या चार गाई हेंच राज्य, रानांतलें कुरण हाच याचा देश, याचें झोपडें हाच याचा राजवाडा, आणि गाई व वांसरें हीच याची संपत्ति ! याची दृष्टि फार आकुंचित आहे आणि याचें क्षितिज अतिशय मर्यादित आहे. म्हणून हा भाग्यवान् गोवारी सुखी आहे. परंतु माझी तशी स्थिति नाहीं. ह्या कॉलेजानें माझी दृष्टि विस्तृत केली आणि माझें क्षितिज अमर्याद केलें. मीही या गोवाऱ्याप्रमाणें माझें कुरण हाच माझा देश आणि माझीं गाई—वांसरें हीच माझी संपत्ति असें मानलें असतें. पण हें कॉलेजानें माझ्या ठिकाणीं आतां अशक्य करून ठेविलें आहे. तें सुख ह्या कॉलेजानें माझ्यापासून हिरावून घेतलें. ह्यानें मला शिकवलें कीं, गंगोत्रीपासून कन्याकुमारीपर्यंतचा सर्व हिंदुस्थान देश हा तुझाच आहे. ह्यानें मला सांगितलें कीं, या हिंदुस्थान देशांत अपार संपत्ति पूर्वी होती व अजूनही आहे. व ती सर्व तुझी आहे. या गोष्टी त्यानें मला सांगितल्या नसत्या, तर आज मला जे सूर्यप्रकाशाचे दिवस मेघाच्छादित वाटत आहेत, आणि ज्या चांदण्याच्या रात्री अंधकारमय वाटत आहेत, त्या तशा कां बरें वाटल्या असत्या ! मी आपला वेळ अज्ञानाच्या सुखांत मोठ्या आनंदानें घालविला असता! पण ह्या कॉलेजानें आणि कॉलेजांतील ज्ञानानें माझ्या सुखांत माती कालविली ! ह्यानें मला ह्या जगांत विश्रांतीचें ठिकाण ठेविलें नाहीं. तो गोवारी दिवसा पाहिजे त्या झाडाखालीं आपलें अलगूज वाजवीत बसूं शकेल, आणि रात्रीं पाहिजे त्या कातळावर झोंप घेऊं शकेल. पण मला हें शक्य नाहीं. ज्या मैदानांत मी हल्लीं आहे, त्याचीच गोष्ट घेतली तरी जेथें तो गोवारी स्वस्थ बसला आहे, तेथील जागा पाहून माझ्या मनांत वादळांवर वादळें उत्पन्न होत आहेत. येथेंच पूर्वीं पेशवाई होती. तेव्हां कांहीं कामगिरीसाठीं होळकरांना बोलाविलें म्हणजे त्यांच्या सैन्याचा तळ पडत असे ! ज्या लढाईनें पेशव्यांची पेशवाई बहुतेक नामशेष झाली, ती लढाई—खडकीची लढाई—याच्याच आसपास कोठेंतरी लढली गेली असली पाहिजे ! त्या लढाईत आशा अपरिपूर्ण राहून

धारातीर्थी पडलेले शूर लोक कदाचित् अजूनही येथें पिशाचरूपानें हिंडत असतील. त्यांचीं भयंकर स्वरूपें माझ्या डोळ्यांपुढें दिसतात, तीं या गोवाऱ्याला कोठें दिसत आहेत ? मी कोठेंही जाऊन कोणतेंही ठिकाण पाहिलें तरी तेथील वैभव नाहींसें झालेलें आणि तेथील संपत्ति लयाला गेलेलीच माझ्या दृष्टीस पडते. संपत्ति गेल्यामुळें भिकार झालेलीं शहरें आणि वैभव गेल्यामुळें उजाड झालेलीं गांवें, हीं सर्व मला ह्या कॉलेजानेंच दाखवून दिलीं. ह्यानें मला ह्या गोष्टी सांगितल्या नसत्या, तर रायगड, पुणें, सातारा, विजापूर, आग्रा, दिल्ली, या ठिकाणांतून पूर्वीचे दगड, विटा, चुना, लांकडें, हीं कायम असलीं तरी तेथून कांहीं तरी नाहींसें झालें आहे, असें मला कशाला वाटलें असतें ? यानें जर मला ह्या गोष्टी सांगितल्या नसत्या, तर मी या ठिकाणीं गेल्यावर शिवाजीचें थडगें, शनवारचा वाडा, अजिमताऱ्याचा किल्ला, गोल घुमट, ताजमहाल, किंवा कुतुबमिनार पहावयाला जाऊन तेथें डोळ्यांतून टिपें कां बरें गाळलीं असतीं ? इतर लोकांप्रमाणें मलाही तेथें जाऊन मजा मारतां आली नसती काय ? पण माझी सर्व मजा या कॉलेजानें नाहींशी केली आहे ! मी या कॉलेजवर एकदां अतिशय प्रीति करीत होतों. पण त्या वेळेला जर मला अशी कल्पना असती कीं हेंच कॉलेज पुढें माझ्या सर्व सुखांत माती कालविणार आहे, तर मी याच्यावर कधींही प्रीति केली नसती. या कॉलेजांतून विद्या मिळते व विद्या ईश्वराचाच अंश आहे, हें सर्व खरें. परंतु विद्येची कृति ईश्वराच्या कृतीपेक्षां पुष्कळ कमतरपणाची ! ईश्वर मनुष्याला डोळे आणि हात अशीं दोन्हीही इंद्रियें देतो. पण विद्या मनुष्याला फक्त डोळेच देऊं शकते. याच्यापेक्षां जास्त ती देऊं शकत नाहीं. आणि हेंच तर वाईट ! याच्यापेक्षां डोळे नसलेले बरे. टँटलस म्हणून एक लिडियाचा राजा होता. ह्याला कांहीं अपराधाबद्दल अशी शिक्षा करण्यांत आली होती कीं, त्याच्या हनुवटीपर्यंत त्याला पाण्यांत बुडवून ठेविलें होतें. परंतु तहान लागली, तर त्याला तें पाणी पितां येणें शक्य नव्हतें. त्याला तें पाणी डोळ्यांनीं दिसत

असे, पण हातानें घेऊन तोंडांत घालतां येत नव्हतें. ह्याच्यापेक्षां तें पाणी डोळ्यांनीं न दिसतें, तर टॅंटॅलसची तहान इतकी प्रक्षुब्ध झाली नसती. या कॉलेजांतील ज्ञानानें, ज्यांनीं तें संपादन केलें आहे त्यांची अशाच प्रकारची स्थिति करून सोडली आहे. त्या ज्ञानानें दृष्टि उघडल्यामुळें सर्व बरें व वाईट, आपलें व लोकांचें, हल्लींचें व पूर्वींचें त्यांना कळतें. परंतु कळण्यापलीकडे दुसऱ्या कांहींच रीतीनें आपली अवस्था सुधारून घेतां येत नाहीं, अशी स्थिति आहे. अशा स्थितींत मला वाटतें, ज्ञानी असल्यापेक्षां अज्ञानी असणें अधिक चांगलें! आपल्याविरुद्ध उठलेल्या देवदूतांना देवानें नरकलोकांत ढकलून दिलें, त्या वेळेला त्या ठिकाणीं थोडासा उजेड होता; पण त्या जागेंतील भयंकरपणा किती आहे, हें त्या पतित झालेल्या देवदूतांना दिसावें, एवढ्याच पुरता तो उजेड होता, असें मिल्टननें वर्णन केलेलें आहे. त्या प्रकारचीच आमच्या देशांतील ज्ञानाची स्थिति आहे. आमच्या देशाची आणि आमच्या देशांतील लोकांची अवस्था किती भयंकर आहे, हें समजण्यासाठींच आमचें ज्ञान आहे. ‘ दुःखसंवेदनायैव मयि चैतन्यमर्पितम् ’ हें जसें रामानें म्हटलें आहे, तसेंच मला वाटतें, मलाही असें म्हणतां येईल कीं, ‘ दुःखसंवेदनायैव मयि विज्ञानमर्पितम् ’ असलें पंगु ज्ञान ह्या कॉलेजानें मला दिलें. आणि त्यानें धड मला ह्या तीरावरही स्वस्थ अलगुजें वाजवीत आणि गाई चारीत बसूं दिलें नाहीं, आणि धड पलीकडच्या तीरावरही ह्या जगांतील स्पृहणीय व उन्नत स्थितीचा अनुभव घेण्यास मला नेलें नाहीं; तर एखाद्या भोकें पडलेल्या नावेप्रमाणें यानें मला या दुःस्थितीच्या नदींत मध्यावर आणून सोडून दिलें आहे. अशी या कॉलेजानें माझी दुर्दशा करून टाकिली आहे. यानें मला निरनिराळ्या वेळचे आणि निरनिराळ्या लोकांचे इतिहास वाचावयाला दिले. मला ते इतिहास वाचून काय करावयाचें होतें? ते इतिहास न वाचलेले लोक जगांत थोडे आहेत काय? त्यांतलाच मी एक झालों असतों; पण निदान रात्रीची मला सुखाची झोंप तर लागली असती.

आणि आतां सगळया जगाचा इतिहास माझ्या स्मृतीमध्यें सांठविलेला असूनही माझ्या मनाला सुख म्हटलें तर काडीइतकेंही नाहीं. आपल्या देशांतील पूर्वींचे इतिहास वाचून आपले पूर्वज कसे होते आणि आपण त्यांच्या पोटीं कसे निर्माण झालों, हे विचार मनांत येऊन वाईट मात्र वाटावयाचें; आणि दुसऱ्यांच्या देशांतील हल्लींचे इतिहास वाचून ते लोक आपलें घोडें पुढें ढकलण्यासाठीं किती धडपडत आहेत, आणि आपण आपल्या उन्नतीविषयीं किती उदासीन आहों, असे विचार मनांत येऊन उद्वेग मात्र उत्पन्न व्हावयाचा. तें इतिहासज्ञान आपल्याला कशाला पाहिजे आहे ? अरे गाई चारणाऱ्या गोवाऱ्या, अमेरिका इंग्लिशांच्या अंमला-पासून स्वतंत्र झाली, जर्मनीनें फ्रान्सला एकदां पादाक्रान्त केलें होतें, किंवा राघोबादादांनीं अटकेवर झेंडे लाविले, या गोष्टी तुला माहीत नाहींत, म्हणून तुझी न्याहरीची भाकरी तुझ्या जिभेला कडसर लागते काय ? नाहीं. मग तुला हा इतिहास माहीत नाहीं म्हणून तुझें काय वाईट झालें आहे ? आणि तो मला माहीत आहे म्हणून मी तुझ्यापेक्षां अधिक काय कमावलें आहे ? उलट मी आपल्या मनाची शांति मात्र त्याच्या योगानें घालवून बसलों आहें. ती माझी मानासिक शांति मला कोणी परत देईल काय ? अरे सुखांत कालक्रमणा करणाऱ्या गोवाऱ्या, तुझ्या माझ्या स्थितीची आपण अदलाबदल करूं, येतोस काय ? पण छे, छे ! तुला असें फसवून उपयोगी नाहीं. माझ्या ह्या बाह्यात्कारी डामडौलाला भुलून तूं कदाचित् फसशील. माझे हे बूट, ही पाटलोण, हा कोट, ही पगडी हीं सर्व बाहेरून तुला मोहक दिसत आहेत. पण ह्यांच्या आंत सारें दुःखच भरलेलें आहे. ज्या कॉलेजानें मला तें दुःखोत्पादक ज्ञान दिलें, त्यानेंच हा मला दुःखमय पोषाख दिलेला आहे ! ह्यांत सुख नाहीं. तेव्हां तुझी स्थिति तुझ्यापासून घेऊन तुला तुझ्या दुःखांत टाकणें मला बरोबर दिसत नाहीं. हें ज्ञानजन्य दुःख माझें मलाच सहन केलें पाहिजे. दुसरा उपाय नाहीं ! या गोवाऱ्याची स्थिति मला स्पृहणीय वाटते. पण ती मला

प्राप्त व्हावी कशी ? ह्या कॉलेजानें मला दिलेलें ज्ञान माझ्यांतून नाहींसें झाल्यावांचून मला त्याच्यासारखें सुख कसें प्राप्त होणार ? हें दुःख-जनक ज्ञान मी विसरून जाईन तर बरें ! पण मी घोकलेले इतिहास आतां विसरणार कसे ? ग्रीक लोकांच्या पुराणांत एक नदी वर्णिलेली आहे. तिचें पाणी प्यालें असतां मागील सर्व स्मृति नष्ट होते म्हणून म्हणतात. तसल्या एखाद्या नदीच्या पाण्यानें जर हें सगळें ज्ञान विसरून जाईल, तर किती बरें चांगलें होईल ! या कॉलेजाच्या ज्ञानानें आम्हांला नास्तिक आणि धर्मभ्रष्ट मात्र केलें आहे. व दुसऱ्याची उन्नतावस्था आमच्या डोळ्यांपुढें मांडून ती संपादन करण्याच्या अशक्यतेमुळें आमच्या मनांत त्यानें निराशा मात्र उत्पन्न केली आहे. अशा प्रकारचें ज्ञान असल्या-पेक्षां नसलेलें बरें ! व ज्ञानापेक्षां अज्ञानच बरें ! डोळे आहेत पण हात नाहींत, आणि ज्ञान आहे, पण कर्तृत्वशक्ति नाहीं, अशा स्थितींतिल तें ज्ञान नुसतें घेऊन काय करावयाचें आहे ? जेथें अज्ञानांतच सुख आहे, तेथें सज्ञान होणें म्हणजे मूर्खपणाच होय. ”

अशा प्रकारचे विचार केशवरावजींच्या मनांत चालले होते. तों सूर्य बराच वर आला. धुकें पडलेलें हळूहळू कमी होत जाऊन कॉलेजाचें शिखर स्पष्ट दिसूं लागलें. त्या मैदानांतील गवतावर पडलेल्या दहिंवराच्या थेंबावर सूर्यकिरण प्रतिबिंबित झाल्याच्या योगानें हा इंद्रनीलमण्यांचाच मळा पिकला आहे कीं काय, असा भास होऊं लागला होता. तेथें जवळूनच जो ओढा वहात होता, त्याच्या लहान लहान लाटांवर सूर्य-बिंबाचीं अर्धवट प्रतिबिंब चोहोंकडे पडल्यामुळें हा रत्नखचित जमिनीचा भाग आहे कीं काय, अशी शोभा दिसत होती व तो गोवारी आपल्या गाई घेऊन अलगूज वाजवीत घराकडे चालला होता. इतका उशीर झालेला पाहून केशवरावहि घरीं जाण्याकरतां उठले. उठल्यानंतर केशवरावांनीं डेक्कन कॉलेजच्या शिखराकडे एकदां फिरून पाहिलें. पण त्यासरशीं त्यांच्या डोळ्यांतून अश्रु आले. ते पुसून त्यांनीं आपली दृष्टि त्या

गोवाऱ्याकडे आणि त्याच्या गाईकडे लाविली. पण कांहीं वेळानें तो गोवारी आणि त्या गाई दिसेनाशा झाल्या, तरी पण त्या गोवाऱ्याच्या अलगुजाचा शब्द ऐकूं येत होता, तोच ऐकत केशवराव किती तरी वेळ उभे राहिले. पण पुढें तोही ऐकूं येईनासा झाला. तेव्हां एक दुःखाचा सुस्कारा टाकून केशवरावांनीं हळूहळू आपल्या घराकडे जाण्याची सुरुवात केली.

अभ्यास –

*( १ ) 'या गोवाऱ्याची स्थिति मला स्पृहणीय वाटते.' असें केशवराव म्हणतात. तुम्हाला तें पटतें काय? 'अज्ञानांत सुख असतें' या कल्पनेंत त्यांच्या या उद्गारांचा उगम आहे. पण ही कल्पना कितीशी तर्कशुद्ध आहे?*

*( २ ) 'याचें झोंपडें हाच याचा राजवाडा' असें केशवराव गुराख्याच्या झोंपडीचें वर्णन करितात. असल्याच एका राजवाड्यांत ते एक दिवस रहायला गेले आहेत, अशी कल्पना करून त्यांना येणारे अनुभव वर्णन करा.*

*( ३ ) Miller of the Dee या कवितेंत गरीब मनुष्याच्या सुखाचा हेवा करणारा राजा दाखविला आहे. ती कविता वाचून तिच्या कथाभागाची चर्चा करा.*

# एक नवीन कारखाना



## परिचय —

'एक नवीन कारखाना' या शिवरामपंतांच्या निबंधांत त्यांच्या उपहास-शक्तीचा मोठा डौलदार आणि मर्मभेदक आविष्कार झाला आहे. तयार कपड्या-प्रमाणें तयार सभ्य गृहस्थांचा माल भरपूर प्रमाणांत निर्माण करणाऱ्या या कारखान्याचें वर्णन त्यांनीं इतक्या बारकाईनें केलें आहे कीं, जणुं कांहीं असा एखादा कारखाना अस्तित्वांत आहे असेंच वाचकाला वाटावें. इंग्रजी अमदानींत सुटाबुटासारख्या ऐटबाज पोषाखावर आणि तशाच प्रकारच्या बाह्य भपक्यावर मोठेपणा मिरविण्याची जी पद्धति रूढ झाली होती, तिचें या लेखांतलें विडंबन अत्यंत खुसखुशीत आहे. 'सभ्य गृहस्थाचा सभ्यपणा हा केवळ त्याच्या बाह्य स्वरूपावर अवलंबून असतो असा हल्लींचा सिद्धांत आहे आणि या सिद्धांतावरच आम्ही सभ्य मनुष्य तयार करायची रीत बसविलेली आहे' ही या लेखाची मध्यवर्ती कल्पना असून तिच्या अनुषंगानें लेखकानें 'न्हावी आणि शिंपी नसते तर सभ्य गृहस्थ नसते', 'अलीकडे पदव्या फार सवंग झाल्या आहेत व त्या बहुधा अयोग्य माणसांच्याच वांट्याला येतात', 'त्या सभ्य गृहस्थाला तपासून पाहतां मॅनेजरना असें दिसून आलें कीं त्याच्यामध्यें खरेपणा, निस्पृहपणा, स्पष्टवक्तेपणा, स्वाभिमान, स्वदेशभक्ति, इत्यादि पुष्कळच दोष राहिले होते; ते त्यांनीं त्याच्या कानांत फुंकर घालून घालून सर्व बाहेर काढले आणि मग त्यांची गाडी जाऊं दिली,' असले गुदगुल्या करणारे चिमटे काढले आहेत.

इंग्रजी राज्याबरोबर पोकळ पदव्यांचा हव्यास, पोषाखी मोठेपणाचा हौस, इत्यादि दोष आपल्यांतून जाण्याच्या बेतांत असले तरी या लेखांत शिवराम-

पंतांनीं वर्णन केलेल्या कारखान्यासारख्या अजब कारखान्यांची संख्या आपल्या देशांत कमी होण्याऐवजीं वाढत असलेलीच दिसून येते. इकडे मागच्या दारानें काळा बाजार करून गरिबांच्या माना मुरगळायच्या आणि तिकडे व्यासपीठावर देशभक्त म्हणून मिरवायचें, जनतेचे सेवक अशा गळ्यांत पाट्या लटकावून हिंडायचें आणि सेवावृत्तीला अवश्य असलेला कोणताही गुण संपादन न करतां भोळ्या आणि आंधळ्या लोकांच्या जीवावर आत्मपूजेचा बाजार मांडायचा; इकडे धर्ममंदिरांत सारीं माणसें देवाचीं लेकरें आहेत असें महंतानें, मौलवीनें, पुराणिकानें किंवा पाद्र्यानें आपल्या प्रवचनांत उद्गार काढतांच त्याच्या शब्दांना माना डोलवायच्या, आणि तिथून बाहेर पडतांच दैनंदिन व्यवहारांत पावलों पावलीं माणसांना जनावराप्रमाणें वागवावयाचें; आपल्या गलिच्छ चैनीकरितां त्यांच्या तोंडचे घांस काढून घ्यायचे—हीं किंवा असलीं दृश्यें आपल्याभोंवतीं आज सर्रास दिसत आहेत. नीति, प्रीति, भक्ति, इत्यादि उच्च जीवनमूल्यांना सत्ता, संपत्ति, स्वार्थ, वगैरेपुढें आज नाक घांसावें लागत आहे. बडे बडे मानले जाणारे लोक सैतानापाशीं आपली सदसद्विवेकबुद्धि गहाण ठेवून निव्वळ शरीरानें जगत आहेत—उपभोग हाच देव मानीत आहेत. ही स्थिति जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत शिवरामपंतांच्या या लेखांत सत्त्व फेंकून देऊन फोलपटाचें स्तोम माजविणाऱ्या मानवतेचें जें दुःख वर्णन केलें आहे, त्याची बहुविध तीव्रता आपल्याला जाणवत रहाणारच !

एका बातमीपत्रांतील पुढील मजकूर वाचकांस मनोरंजक वाटल्यावांचून राहणार नाहीं असें समजून तोच आज आम्ही आपल्या वाचकांपुढें मांडीत आहों.

" — — — — मला तें मुळींच खरें वाटेना. मी आपल्या मित्राच्या बोलण्यावर कधींच अविश्वास केला नव्हता. पण या कारखान्याच्या बाबतींत तो अगदीं निव्वळ थाप मारतो आहे असें मला वाटलें. कांहीं केल्यानें माझी खात्री होईना. तेव्हां रामभाऊ मला म्हणाले, 'असें कशाला पाहिजे? तुम्ही प्रत्यक्ष तेथें जाऊन पहा म्हणजे झालें.'

ही गोष्ट मला पसंत पडली आणि मी तो कारखाना पाहण्यासाठीं लागलाच निघालों.

रामभाऊंनीं सांगितलेल्या खुणेप्रमाणें शोध करीत करीत मी सदर बाजारांतून चाललों असतां एकाएकीं एक विस्तीर्ण आणि भव्य साइनबोर्ड (पाटी) माझ्या दृष्टीस पडली. त्याच्यावर सभ्य गृहस्थ तयार करण्याचा कारखाना अशीं अक्षरें कोरलेलीं होतीं. तीं पाहून रामभाऊंनीं थाप मारली नाहीं एवढी माझी खात्री झाली; पण ही पाटी लावणारे कारखानेवाले सभ्य गृहस्थ तयार करून देण्याविषयींची थाप मारीत नाहींत याबद्दल माझी खात्री होईना. तरी पण एकाएकीं त्या कारखानेवाल्यांची कांहीं लबाडी असावी असें मानण्याचेंही मला धैर्य होईना. त्या साईनबोर्डकडे पाहून मी आश्चर्यचकित झालों आणि आपल्या मनांत म्हटलें, 'काय? ह्या विसाव्या शतकांत सभ्य गृहस्थ करण्याचीं देखील यंत्रें निघालीं आहेत काय?' पण हें शक्य कसें होईल, याबद्दल फिरून मनाला शंका वाटण्यास सुरवात झाली. त्या शंकेचें समाधान सभ्य गृहस्थ तयार करण्याची यांत्रिकरचना आपण प्रत्यक्ष डोळ्यानें पाहिल्यावांचून व्हावयाचें नाहीं असें समजून मीं कारखान्यांत जाण्याचा निश्चय केला.

कारखान्याच्या दरवाज्याशीं जातों तों मला एका खाजगी संत्र्यानें मज्जाव केला, तेव्हां रुप्याच्या एका वर्तुळाकृति लहानशा तुकड्यावर आपल्या राणी सरकारचें कोरलेलें एक चित्र माझ्यापाशीं होतें तें मीं त्याला नजर केलें. त्याचा त्यानें अतिशय राजनिष्ठेनें आणि स्वामिभक्तीनें स्वीकार केला व मज्जाव करतेवेळीं रुंद केलेली छाती किंचित् आकुंचित करून तो मला म्हणाला, 'येथें सभ्य गृहस्थ कसा बनविला जातो त्याची कृति पाहून ती कदाचित् कोणी बाहेर फोडील म्हणून पाहिजे त्याला आंत जाण्याची परवानगी नसते. याच कारखान्यांत तयार होऊन गेलेले एक सभ्य गृहस्थ + + नंबरच्या बंगल्यांत राहतात. त्यांची चिठ्ठी आणल्यावांचून कोणाला आंत सोडण्याचा हुकूम नाहीं. पण तुम्ही आंत

जा. कांहीं हरकत नाहीं.’ सभ्य गृहस्थ बनविण्याच्या कारखान्याच्या द्वारावर असलेल्या ह्या सभ्य गृहस्थाचें वर्तन पाहून मला फार आश्चर्य वाटलें!

मीं आंत जाऊन पाहिलें तेव्हां त्या कारखान्याचा अवाढव्यपणा पाहून तर मी अगदीं थक्क झालों. कारखान्याचें काम फारच विस्तीर्ण होतें. त्याच्या दोन बाजूला दोन मोठाले दरवाजे होते. एकांतून कच्चा माल कारखान्यांत येत असे व तेथील कृतीनें त्याचा सभ्य गृहस्थ बनला म्हणजे तो गाडींत घालून दुसऱ्या दरवाज्यानें बाहेर पाठविण्यांत येत असे. कापसाचीं बोंडें सुताच्या गिरणींतील यंत्रांत गेलीं म्हणजे त्यांचें जसें सूत बाहेर पडतें त्याप्रमाणें मी जर एखाद्या यंत्रांत सांपडलों तर सभ्य गृहस्थ होऊनच बाहेर पडेन, अशी मला फार भीति वाटत होती. म्हणून मी बाहेरून बाहेरूनच प्रेक्षण करीत होतों. इतक्यांत त्या कंपनीचा मुख्य म्यानेजर कोठें आसपास होता. त्याची नजर माझ्यावर गेली, तेव्हां तो धांवत मजजवळ येऊन म्हणाला, ‘काय, तात्या, तुम्हांला जंटलमन् व्हावयाचें आहे काय?’ या प्रश्नाचें मी उत्तर देणार, इतक्यांत कच्च्या मालाचे बोजे उचलून कारखान्यांत नेऊन टाकण्याचें काम ज्यांच्याकडे होतें असे चार पांच कुली माझ्या जवळ येऊन मला उचलूं लागले. आतां हे मला कोठल्या तरीं एंजिनमध्यें नेऊन घालणार हें खास, आणि आतां सभ्य गृहस्थ होण्याचें आपल्या कपाळाचें कांहीं केल्यानें चुकत नाहीं, असें वाटून मी अगदीं गयावया करूं लागलों; व त्या म्यानेजरच्या पायां पडून त्याला म्हटलें कीं ‘मी सभ्य गृहस्थ होण्यासाठीं आलों नाहीं, मला उचलून नेऊं पाहणाऱ्या या सभ्य गृहस्थांच्या हातून जर आपण माझी सुटका कराल तर आपले मजवर फार आभार होतील.’ तो म्यानेजर सभ्य गृहस्थ होता. पण तो त्या कारखान्यांत तयार झालेला नव्हता. तो घरगुती रीतीनें तयार झालेला होता. म्हणून त्याला माझी करुणा आली, व त्यानें माझ्या भोंवतीं जमलेल्या घाटी हमालांना दुसऱ्या कामाला

जावयास सांगितलें. नंतर मी म्यानेजरसाहेबांस सांगितलें कीं, ' मी स्वतः सभ्य गृहस्थ व्हावयास आलों नाहीं, परंतु दुसरे लोक येथें सभ्य गृहस्थ कसे बनविण्यांत येतात त्याची कृति जर पहावयास मिळेल तर ती पहाण्यासाठीं मी येथें आलों आहे. ' म्यानेजर म्हणाले, ' चला, या माझ्या बरोबर. मी तुम्हांला सर्व गिरणी दाखवितों. '

असें बोलून आम्ही दोघे चालूं लागलों. म्यानेजरसाहेब फारच मोकळ्या मनाचे दिसले. म्हणून मी त्यांस आपल्या शंका स्पष्टपणें विचारण्याची सुरवात केली. ' माझी पहिली शंका अशी आहे कीं, ' मी विचारिलें, ' यांत्रिक सामर्थ्यानें सभ्य गृहस्थ कसा तयार करतां येईल ? ' ' कां बरें ? ' ते म्हणाले, ' ऑक्सिजन आणि हैड्रोजन यांच्यापासून पाणी होतें. असें आपल्याला कळल्यावर आपल्याला पाणी तयार करतां यावयाचें नाहीं काय ? साबणाचे किंवा सोडावॉटरचे घटकावयव काय आहेत हें कळलें म्हणजे ज्याप्रमाणें त्यांचे कारखाने काढितां येतात, त्याप्रमाणें सभ्य गृहस्थांचे घटकावयव कळल्यानंतर सभ्य गृहस्थ तयार करण्याचा कारखाना काढतां येणें कां शक्य नाहीं ? कोणताही माल उत्तम प्रकारचा तयार होण्याला त्यांत घटकद्रव्यें कोणकोणतीं असावीं आणि तीं कोणत्या प्रमाणानें असावीं, हें कळणें फार जरूरीचें आहे. व सभ्य गृहस्थ तयार करण्याच्या बाबतींत तर या गोष्टीकडे विशेष लक्ष द्यावें लागतें व हें फार खर्चाचें काम आहे. ज्या ज्या संस्थांतून सभ्य गृहस्थांचा उपयोग करण्यांत येतो त्या त्या सर्व ठिकाणीं जाऊन सभ्य गृहस्थांच्या अंगीं काय काय गुण असतात, हें बारकाईनें पाहून त्यावरून आम्ही हल्लींची ही कृति ठरविली आहे. क्लबांत आणि सभांत, घरीं आणि कचेरींत, वादविवादाच्या बैठकींत आणि व्याख्यानाच्या ठिकाणीं, मित्रमंडळींत आणि परकीय लोकांत, वेश्यागृहांत आणि कलालाच्या दुकानांत, नाटक-गृहांत आणि दरबारांत, घरच्या मेजवान्यांत आणि वेटिंगरूममधील उपहारांत, अशा अनेक प्रसंगीं अनेक सभ्य गृहस्थांच्या अंगचे जे गुण

आढळून येतात त्यांवरून उत्तम रसायनशास्त्रवेत्त्यांच्याकडून सभ्य गृहस्था-मधील घटकावयव काय काय असावेत हें ठरवून घेऊन नंतर आम्ही हा कारखाना काढला आहे. आम्हीं सुमारें तीस केमिस्टस् मुद्दाम याच कामाकरितां पन्नास वर्षे कामावर लाविले होते. त्यांनीं पुष्कळ एक्सपेरिमेंटस् करून पाहिले. पहिल्यापहिल्यानें तर त्यांनीं जे सभ्य गृहस्थ तयार केले होते, तो माल लोकांच्या अगदींच पसंतीस उतरेना. पुढें त्या केमिस्टसूना असें आढळून आलें कीं, सभ्य गृहस्थ तयार करण्याचा रांधा करतांना त्यांत स्वाभिमानाचा अर्क जास्त टाकला जातो, त्यामुळें भट्टी बिघडते. ही चूक लक्षांत येऊन आमच्या रसायनशास्त्रवेत्त्यांनीं त्याप्रमाणें दुरुस्ती केली. तरी पण जो माल तयार होई त्यांत एक प्रकारचा चिवटपणा आणि कठिणपणा रहात असे; त्यामुळें आमच्या गिरणींतील सभ्य गृहस्थांचा खप मुंबईसारख्या मोठमोठ्या व्यापाराच्या शहरीं मुळींच होत नसे. तेव्हां अतिशय मऊ सभ्य गृहस्थ बनविण्याकडे आमचें सारें लक्ष लागलें व पुढें आम्ही कापूस, शेण, चिंध्या, पेंढा, लांकडाचा भूस, या द्रव्यांपासून आपला सभ्य गृहस्थ तयार करूं लागलों. तेव्हां आमचा माल बाजारांत जरासा पसंत पडूं लागला. व त्याचा थोडा जास्ती खपही होऊं लागला. त्यांतही उत्तरोत्तर आमच्या रसायनशास्त्राच्या गुरुजींनीं सुधारणा करून आजमित्तीला आमचा कारखाना इतक्या उदयाला आणून सोडला आहे कीं, आमच्या येथल्या सारखा जंटलमन दुसऱ्या कोठेंच तयार होत नाहीं. एवढा वेळपर्यंत मी सांगितलेले शोध हे सभ्य गृहस्थाच्या अंतस्थ रचनेबद्दल होत. परंतु त्याच्या बाह्य स्वरूपांतही अलिकडे आम्ही पुष्कळ सुधारणा केल्या आहेत. पूर्वीं अशी एक खोटी कल्पना प्रचलित झालेली होती कीं, सभ्य गृहस्थ हा मनुष्य आहे आणि त्याचा सभ्यपणा हा त्याच्या मनावर अवलंबून असतो. पण ही कल्पना हल्लीं बहुतेक लयाला गेलेली आहे. आणि सभ्यपणाचा मनाशीं कांहीं संबंध आहे असें जर हल्लीं कोणी प्रतिपादन करील तर त्याची मूर्खांत गणना झाल्यावांचून रहाणार नाहीं.

सभ्य गृहस्थामध्यें मन हा पदार्थ घातलेला असतो असें कोणीही मानीत नाहीं. सभ्य गृहस्थाचा सभ्यपणा हा केवळ त्याच्या बाह्य स्वरूपावर अवलंबून असतो, असा हल्लींचा सिद्धांत आहे आणि या सिद्धांतावरच आम्ही सभ्य मनुष्य तयार करण्याची रीत बसविलेली आहे.'

या लांबलचक उत्तरानें माझें फारसें समाधान झालें नाहीं. तरी पण दुसऱ्या शंकांचें समाधान करून घेण्याची मला विशेष उत्कंठा असल्यामुळें मी म्यानेजर साहेबांस पुन्हां असें विचारिलें कीं, ' तुमच्या कारखान्याला कच्च्या मालाचा पुरवठा कसा होतो ? कागदाच्या गिरणीला गवत, पेंढा व फाटके कागद लागतात; कांचेच्या कारखान्याला फुटक्या कांचा गोळा कराव्या लागतात; व साखरेच्या कारखान्यासाठीं गुरांचीं हाडकें वेंचावीं लागतात. त्याप्रमाणें तुमच्या कारखान्यांत जो कच्चा माल लागतो, तो तुम्ही कोठून पैदा करितां ? ' यावर म्यानेजरनीं उत्तर दिलें कीं, ' कच्चा माल गोळा करण्यासाठीं आम्हांला मुळींच बाहेर जावें लागत नाहीं. येथें आपल्या पायानें चालत आलेला कच्चा माल रोजच्या रोज तयार होऊन बाहेर कसा पडेल याचीच आम्हांला काळजी असते. इतकें पुष्कळ काम नेहमीं आमच्याकडे कसें येतें याचें कारण मी तुम्हांला सांगतों. अलीकडे सरकारनें आपल्या पैशाच्या पिशवीचा गळा अतिशय दाबून धरला आहे, आणि किताबाच्या पिशवीचा दोरा अतिशय ढिला सोडला आहे; त्यामुळें सरकारपासून लोकांना फुकट पदव्या मात्र मिळतात, परंतु त्या पदव्यांची खरी योग्यता राखण्याला लागणारे पैसे सरकारांतून मिळत नाहींत. त्यामुळें ज्याला ज्याला म्हणून पदवी मिळते, मग ती कितीका क्षुल्लक असेना, त्याला त्याला कोरडा दिखाऊ भपका करावा असें वाटतें. शिवाय आज चार वर्षें हिंदुस्थानांत प्लेग असल्यामुळें प्लेगच्या वेळीं युरोपियन अधिकाऱ्यांना पगार वांटून सरकारचे पैसे खर्च झाल्यामुळें सरकारनें नेटिवांना बऱ्याच पदव्या दिल्या आहेत. शिवाय अशी एक गोष्ट आहे कीं, सरकारचा स्वतःच्या कर्तबगारीवर फार थोडा

भरंवसा असल्यामुळें कीं काय कोण जाणें, अलीकडे सरकारची जरा कोणीं तरफदारी केली कीं त्याला पदवी मिळाली म्हणून समजावेंच. सरकार दुसऱ्याच्या पाठबळासाठीं आणि स्तुतीसाठीं इतकें भुकेलेलें पूर्वी कधींच नव्हतें. त्यामुळें अलिकडे पदव्या फार सवंग झाल्या आहेत व त्या बहुधा अयोग्य मनुष्यांच्याच वांटयाला येत आहेत. ज्यांच्या अंगांत मोठेपणाचे कांहीं देखील गुण नसतात, पण ज्यांनीं एखादे वेळीं सहज कोठें एखादी गुप्त गोष्ट कोणाच्या कानांत सांगितली असेल, किंवा सरकारच्या वतीनें एखादें पुस्तक लिहिलें असेल, किंवा प्लेगमध्यें सरकारचें फुकट, आणि लोकांचें विकत काम केलें असेल, ते एखादे दिवशीं अंथरुणांतून उठून जागे होऊन पाहातात तों त्यांना असें आढळून येतें कीं, त्यांच्यापैकीं कोणी रावबहादूर झाले आहेत, कोणी ऑनरेबल झाले आहेत, कोणी जे. पी. झाले आहेत, व कोणी खान बहादूर झाले आहेत. अशा प्रकारें अयोग्य माणसांवर एकदम या पदव्यांचा बोजा येऊन पडला म्हणजे ते अगदीं भांबावून जातात. व आपल्याला सभ्य गृहस्थ झालें पाहिजे असें त्यांस वाटूं लागतें. व ते सर्व लोक सभ्य गृहस्थ होण्यासाठीं आमच्या कारखान्यांत येतात. तेव्हां जोंपर्यंत हिंदुस्थानांत प्लेग आहे, व इनॉक्युलेशन हा जोंपर्यंत त्याचा उपाय म्हणून मानला जात आहे, व त्यामुळें जोंपर्यंत गचाळ आणि अयोग्य लोकांना पैशाच्या ऐवजीं पदव्या मिळत आहेत, तोंपर्यंत तरी निदान आमच्या गिरणीला कच्च्या मालाचा तोटा पडणार नाहीं, अशी माझी समजूत आहे. मात्र सरकारच्या हस्तें आमच्या या कारखान्याला उत्तेजन मिळत आहे ही गोष्ट तुम्ही बाहेर फोडूं नका. नाहीं तर पैशाच्या अडचणींत सांपडलेलें सरकार आमच्या या कारखान्यावर एखादी नवीन 'ड्यूटी' मात्र बसवील. शिवाय आमच्या गिऱ्हाइकांचा आणखी एक वर्ग आहे. कोणाला कलेक्टरला भेटावयाचें असतें, कोणाला कमिशनरकडे जावयाचें असतें, कौन्सिलरांची गांठ घ्यावयाची असते, कोणाला लेव्हीला जावयाचें असतें, किंवा कोणाला

सभ्य गृहस्थामध्यें मन हा पदार्थ घातलेला असतो असें कोणीही मानीत नाहीं. सभ्य गृहस्थाचा सभ्यपणा हा केवळ त्याच्या बाह्य स्वरूपावर अवलंबून असतो, असा हल्लींचा सिद्धांत आहे आणि या सिद्धांतावरच आम्ही सभ्य मनुष्य तयार करण्याची रीत बसविलेली आहे.'

या लांबलचक उत्तरानें माझें फारसें समाधान झालें नाहीं. तरी पण दुसऱ्या शंकांचें समाधान करून घेण्याची मला विशेष उत्कंठा असल्यामुळें मी म्यानेजर साहेबांस पुन्हां असें विचारिलें कीं, 'तुमच्या कारखान्याला कच्च्या मालाचा पुरवठा कसा होतो ? कागदाच्या गिरणीला गवत, पेंढा व फाटके कागद लागतात; कांचेच्या कारखान्याला फुटक्या कांचा गोळा कराव्या लागतात; व साखरेच्या कारखान्यासाठीं गुरांचीं हाडकें वेंचावीं लागतात. त्याप्रमाणें तुमच्या कारखान्यांत जो कच्चा माल लागतो, तो तुम्ही कोठून पैदा करितां ?' यावर म्यानेजरनीं उत्तर दिलें कीं, 'कच्चा माल गोळा करण्यासाठीं आम्हांला मुळींच बाहेर जावें लागत नाहीं. येथें आपल्या पायानें चालत आलेला कच्चा माल रोजच्या रोज तयार होऊन बाहेर कसा पडेल याचीच आम्हांला काळजी असते. इतकें पुष्कळ काम नेहमीं आमच्याकडे कसें येतें याचें कारण मी तुम्हांला सांगतों. अलीकडे सरकारनें आपल्या पैशाच्या पिशवीचा गळा अतिशय दाबून धरला आहे, आणि किताबाच्या पिशवीचा दोरा अतिशय ढिला सोडला आहे; त्यामुळें सरकारपासून लोकांना फुकट पदव्या मात्र मिळतात, परंतु त्या पदव्यांची खरी योग्यता राखण्याला लागणारे पैसे सरकारांतून मिळत नाहींत. त्यामुळें ज्याला ज्याला म्हणून पदवी मिळते, मग ती कितीका क्षुल्लक असेना, त्याला त्याला कोरडा दिखाऊ भपका करावा असें वाटतें. शिवाय आज चार वर्षें हिंदुस्थानांत प्लेग असल्यामुळें प्लेगच्या वेळीं युरोपियन अधिकाऱ्यांना पगार वांटून सरकारचे पैसे खर्च झाल्यामुळें सरकारनें नेटिवांना बऱ्याच पदव्या दिल्या आहेत. शिवाय अशी एक गोष्ट आहे कीं, सरकारचा स्वतःच्या कर्तबगारीवर फार थोडा

भरंवसा असल्यामुळें कीं काय कोण जाणें, अलीकडे सरकारची जरा कोणीं तरफदारी केली कीं त्याला पदवी मिळाली म्हणून समजावेंच. सरकार दुसऱ्याच्या पाठबळासाठीं आणि स्तुतीसाठीं इतकें भुकेलेलें पूर्वीं कधींच नव्हतें. त्यामुळें अलिकडे पदव्या फार सवंग झाल्या आहेत व त्या बहुधा अयोग्य मनुष्यांच्याच वांट्याला येत आहेत. ज्यांच्या अंगांत मोठेपणाचे कांहीं देखील गुण नसतात, पण ज्यांनीं एखादे वेळीं सहज कोठें एखादी गुप्त गोष्ट कोणाच्या कानांत सांगितली असेल, किंवा सरकारच्या वतीनें एखादें पुस्तक लिहिलें असेल, किंवा प्लेगमध्यें सरकारचें फुकट, आणि लोकांचें विकत काम केलें असेल, ते एखादे दिवशीं अंथरुणांतून उठून जागे होऊन पाहातात तों त्यांना असें आढळून येतें कीं, त्यांच्यापैकीं कोणी रावबहादूर झाले आहेत, कोणी ऑनरेबल झाले आहेत, कोणी जे. पी. झाले आहेत, व कोणी खान बहादूर झाले आहेत. अशा प्रकारें अयोग्य माणसांवर एकदम या पदव्यांचा बोजा येऊन पडला म्हणजे ते अगदीं भांबावून जातात. व आपल्याला सभ्य गृहस्थ झालें पाहिजे असें त्यांस वाटूं लागतें. व ते सर्व लोक सभ्य गृहस्थ होण्यासाठीं आमच्या कारखान्यांत येतात. तेव्हां जोंपर्यंत हिंदुस्थानांत प्लेग आहे, व इनॉक्युलेशन हा जोंपर्यंत त्याचा उपाय म्हणून मानला जात आहे, व त्यामुळें जोंपर्यंत गचाळ आणि अयोग्य लोकांना पैशाच्या ऐवजीं पदव्या मिळत आहेत, तोंपर्यंत तरी निदान आमच्या गिरणीला कच्च्या मालाचा तोटा पडणार नाहीं, अशी माझी समजूत आहे. मात्र सरकारच्या हस्तें आमच्या या कारखान्याला उत्तेजन मिळत आहे ही गोष्ट तुम्ही बाहेर फोडूं नका. नाहीं तर पैशाच्या अडचणींत सांपडलेलें सरकार आमच्या या कारखान्यावर एखादी नवीन 'ड्यूटी' मात्र बसवील. शिवाय आमच्या गिऱ्हाइकांचा आणखी एक वर्ग आहे. कोणाला कलेक्टरला भेटावयाचें असतें, कोणाला कमिशनरकडे जावयाचें असतें, कौन्सिलरांची गांठ घ्यावयाची असते, कोणाला लेव्हीला जावयाचें असतें, किंवा कोणाला

बॉलचें बोलावणें असतें. अशीं हजारांचीं हजार कामें असतात. व या नेटिवांना सभ्य गृहस्थांच्या चालीरीती माहित नसल्यामुळें ते सर्व येथें येतात. '

अशा रीतीनें बोलत चाललों असतां आम्ही एका मोठ्या दालनामध्यें आलों. तेथें कमींत कमी सात आठशें शिंपी काम करीत असलेले मी पाहिले. तें पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें व सभ्य गृहस्थ तयार करण्याच्या कारखान्यांत शिंप्याचें काय काम, आणि काम असलेंच तरी इतके शिंपी कशाला, म्हणून मी म्यानेजरसाहेबांना प्रश्न विचारला. तेव्हां ते म्हणाले, ' वः ! हाच तर आमच्या कारखान्यांतील मुख्य भाग ! हा एक भाग आणि या शिवाय दुसरा एक भाग आहे, हे दोन भाग काय ते आमच्या कारखान्यांत मुख्य ' असें म्हणून त्यांनीं मला माडीवरील एका भव्य दिवाणखान्यांत नेलें. तेथें चारी बाजूंनीं आरसे लाविलेले होते व त्या दिवाणखान्यांत ज्या खुर्च्या मांडलेल्या होत्या, त्यांपैकीं कांहींवर कित्येक न्हावी बसलेले होते. त्यांच्याकडे बोट दाखवून म्यानेजर म्हणाले, ' हें पाहिलेत ! या कारागिरांच्या हातून सभ्य गृहस्थ बनला जातो; व बाकी राहिलेला भाग तुम्ही नुकत्याच पाहिलेल्या शिंप्यांकडून पुरा केला जातो. किरकोळ कामासाठीं दुसऱ्या कारागिरांची गरज लागते. पण मुख्यत्वें-करून सभ्य गृहस्थ हे न्हावी आणि शिंपी यांच्या कर्तबगारीचें फळ आहे. न्हावी सभ्य गृहस्थाचा चेहरा गुळगुळीत आणि सुंदर करतो, आणि शिंपी सभ्य गृहस्थाच्या अंगच्या सर्व दुर्गुणांवर पांघरूण घालतो. अहाहा ! देवाचे आपल्यावर किती उपकार आहेत कीं, त्यानें न्हावी आणि शिंपी ह्या दोन जिनसा निर्माण केल्या आहेत ! आज न्हावी आणि शिंपी नसते तर सभ्य गृहस्थ नसते ! आणि जेथें सभ्य गृहस्थ नाहींत तें शहर कसलें ? किंवा राष्ट्र कसलें ? जगांत न्हावी आणि शिंपी नसते तर जगाची काय भयंकर स्थिति झाली असती ? सगळ्यांच्या दाढीमिशा वाढलेल्या आणि सगळे उघड्या अंगानें फिरणारे अशी स्थिति झाली असती !

हें आमचें बोलणें चाललें आहे इतक्यांत कांहीं हमालांनीं एक खटारा भरून कच्चा माल आणल्याची वर्दी म्यानेजरास दिली. ती पोंचतांच ते व मी खालीं आलों. खटाऱ्यामध्यें सभ्य गृहस्थ होण्यासाठीं आलेले बरेच लोक एकावर एक आडवे तिडवे घातलेले होते. व घोटाळा होऊं नये म्हणून प्रत्येक जण कां सभ्य गृहस्थ होत आहे याबद्दल प्रत्येकाच्या गळ्यांत एकेक चिठ्ठी अडकविलेली होती. या चिठ्ठ्यांचा उपयोग, म्यानेजरनें मला असें सांगितलें, न्हाव्याच्या डिपार्टमेंटमध्यें फारसा होत नाहीं, कारण सगळ्यांची सारखीच हजामत करावयाची असते. परंतु शिंप्यांच्या दालनांत यांची फार जरूर लागते! कारण रावसाहेब झाल्यामुळें जर कोणी सभ्य गृहस्थ होण्यास आला असेल तर त्याचा पोषाख निराळा, रावबहादूर झाल्यामुळें आला असेल तर त्याचा पोषाख निराळा, हायकोर्टाचा वकील ह्मणून आला असेल तर त्याचा पोषाख निराळा, डॉक्टर म्हणून आला असेल तर पोषाख निराळा, जज्ज असेल तर पोषाख निराळा, आणि व्यापारी असेल तर पोषाख निराळा. सगळी खुबी काय ती पोषाखांत आहे.

अशा रीतीनें म्यानेजरचें भाषण ऐकून सभ्य गृहस्थ करण्याच्या कृतीबद्दल मला बरीच कल्पना आली. व नंतर आम्ही दोघेजण जिकडून माल तयार होऊन बाहेर पडतो त्या दरवाजाकडे गेलों. सभ्य गृहस्थ तयार करण्याला अथपासून इतिपर्यंत लागणारें यच्चयावत् सामान म्यानेजरनीं आपल्या कांपाऊंडमध्यें आणून ठेविलें होतें. बुटांचीं दुकानें, घड्याळांचीं दुकानें, हातरुमाल व त्याच्यावर शिंपडावयाचीं विलायती अत्तरें, हातांत धरावयाच्या छड्या, गळ्यांतील कॉलर, व डोळ्यांवरील चष्मे, या सर्वांचीं दुकानें, उत्तम ब्रँडीचीं दुकानें, फर्स्टक्लास भाड्याच्या गाड्या, व त्या गाड्यांवर पुढें पाठीमागें बसणारे लिव्हरी घातलेले भाड्याचे नोकर, या सर्व जिनसांचे कारखाने पहात पहात आम्ही दरवाजापाशीं येऊन पोंचलों. त्या वेळीं एक सभ्य गृहस्थ पूर्णपणें तयार होऊन गाडींत घालून बाहेर

पाठविण्यांत येत होता. त्याच्यांत कांहीं तरी कमतरपणा राहिला आहे असें म्यानेजरच्या नजरेस येऊन त्यांनीं ती गाडी थांबविली. व त्या सभ्य गृहस्थाला तपासून पाहतां म्यानेजरना असें दिसून आलें कीं, त्याच्यामध्यें खरेपणा, निस्पृहीपणा, स्पष्टवक्तेपणा, स्वाभिमान, स्वदेशभक्ति, इत्यादि पुष्कळच दोष राहिले होते. ते त्यांनीं त्याच्या कानांत फुंकर घालून घालून सर्व बाहेर काढले, आणि मग त्याची गाडी जाऊं दिली. गाडी गेल्यावर म्यानेजर आपल्याशीं पुटपुटले, 'मूर्ख बेटा ! ही घाण डोक्यांत घेऊन हा कमिशनर साहेबांकडे चाकरी मागण्यासाठीं जात होता ! अशानें याला जागा मिळेल काय? असें म्हणत त्याच्या डोक्यांतून काढलेला खरेपणा, निस्पृहीपणा, वगैरे जिनसांच्या म्यानेजरसाहेब पुड्या करूं लागले. तेव्हां मी त्यांना विचारिलें, 'याचा तुम्ही काय उपयोग करितां ? ' तेव्हां ते म्हणाले, ' हे जिन्नस आमच्या कारखान्यांत मुळींच लागत नाहींत. याचा खप गरिबगुरीब लोकांत मात्र होतो. '

यानंतर म्यानेजरनीं मला त्या कारखान्यांतील औषधिसंग्रहालयांत नेलें. व तेथें त्यांनीं मला कित्येक चमत्कारिक औषधि दाखविल्या. स्तुतिपाठाच्या गोळ्यांची एक बाटली दाखवून मला ते म्हणाले, 'यांतील एक गोळी तोंडांत धरून जर कोणी सभ्य गृहस्थ साहेबाकडे जाईल तर सबंध एक तासभर साहेबांची स्तुति करूनही आपल्याला थकवा आला आहे असें त्याला वाटायचें नाहीं व त्या गोळ्यांचा खप स्मारकाची वगैरे धामधूम कोठें चालली असली तर त्या वेळीं अतिशय होतो' असेंही त्यांनीं मला सांगितलें.

असेच आणखीही कित्येक चमत्कार त्यांनीं मला सांगितले व दाखविले, परंतु यांत्रिक पद्धतीवर सभ्य गृहस्थ बनवितां येणें शक्य आहे, या चमत्काराबद्दलचें मला सर्वांत अतिशय आश्चर्य वाटलें व या नवीन शोधानें थक्क होऊन म्यानेजरसाहेबांची रजा घेऊन मी आपल्या घराकडे येण्यासाठीं निघालों. ”

**अभ्यास** :—

( १ ) कल्पक मिस्किलपणा आणि दाहक मर्मभेदकपणा यांचें मिश्रण शिवरामपंतांच्या वक्रोक्तिपूर्ण लेखनांत आढळतें, या विधानाचें प्रस्तुत लेखाच्या आधारें विवेचन करा.

( २ ) श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचा 'यांत्रिक चमत्कार' हा विनोदी लेख वाचून त्याची शिवरामपंतांच्या या लेखाशीं तुलना करा.

( ३ ) 'जगांत न्हावी आणि शिंपी नसते तर जगाची काय भयंकर स्थिति झाली असती' असें शिवरामपंत म्हणतात. एका मोठ्या शहरांतल्या सर्व न्हाव्यांनीं व शिंप्यांनीं संप पुकारला आहे अशी कल्पना करून तिथें उडालेल्या हलकल्लोळाचें वर्णन करा.

## गरिबांची उपासमार

४

### परिचय

राजकीय गुलामगिरीविरुद्ध शिवरामपंतांनीं वारंवार पोटतिडकीनें लिहिलें आहे. विषय कोणताही असो, पारतंत्र्याविरुद्ध चीड उत्पन्न करणें हें त्यांच्या प्रत्येक लेखाचें पालुपदच आहे असें म्हणतां येईल. त्यांच्या लेखनाचा मुख्य भाग अशा रीतीनें बहुजनसमाजाच्या अंतःकरणांतला सुप्त स्वातंत्र्य-स्फुलिंग फुलवून प्रज्वलित करण्यांत खर्ची पडला असला, तरी राजकीय गुलामगिरी इतकीच सामाजिक विषमतेचीही त्यांना मनापासून चीड होती, हें या लेखा-वरून दिसून येईल. समाजवादाच्या तत्त्वज्ञानाचा ओझरता परिचयसुद्धां ज्या वेळीं सुशिक्षितांना झाला नव्हता अशा काळांत हा निबंध लिहिला गेला आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे त्यांतील विचार किती समर्पक, सडेतोड, आणि पुरोगामी आहेत, याची यथार्थ कल्पना होते. शिवरामपंतांच्या वाग्विलासाच्या विविध छटाही या लेखांत प्रतिबिंबित झाल्या आहेत. त्यांत गोष्टीमुळें येणारा गोडवा आहे, कल्पकतेनें रंगलेला जिव्हाळा आहे आणि चिमट्यापासून चाबकापर्यंतच्या उपहासाच्या सर्व तऱ्हा आहेत. स्वतःला सुधारक म्हणवून घेणाऱ्या आणि त्या कैफांत स्वतःच्या सुखसोयींत गुंग होऊन जाणाऱ्या लोकांचा त्यांनीं अनेकदां

अत्यंत कठोर उपहास केला असला तरी समता—विशेषतः आर्थिक समता हाच खऱ्याखुऱ्या सामाजिक क्रांतीचा पाया आहे, या गोष्टीवर त्यांची श्रद्धा होता असें दिसतें. 'इनकमटॅक्स आणि सोशॅलिझम्' या आपल्या लेखांत ते म्हणतात, 'हें जें सोशॅलिझम्चें तत्त्व वर सांगितलें आहे, तें युरोपखंडामध्यें जरी अलीकडे विशेष प्रबल झालें असलें तरी आपल्यामध्येंही हें तत्त्व पूर्वीपासून प्रचलित आहे असें दिसतें. महाभारतांतील एका वचनांत असें सांगितलें आहे कीं, 'जे फक्त आपल्यासाठींच अन्न शिजवितात म्हणजे देव, धर्म, अनाथ, अतिथि, अभ्यागत, इत्यादिकांकडे त्या अन्नांतील कांहीं भागाचा विनियोग न करतां जे आपणच एकटे त्याजवर ताव मारतात ते पापाचे वांटेकरी होतात. आपलें स्वतःचें पोट भरण्याला जितकें अवश्य पाहिजे आहे तितक्यावरच काय ती प्रत्येकाची वास्तविक सत्ता होय.' अशा अर्थाचा श्लोक श्रीमद् भागवतामध्येंही आहे. यापेक्षां अधिक द्रव्यावर जर कोणी आपली सत्ता चालवील तर त्याच्यावर त्याची खरी सत्ता नाहीं. ज्याच्यावर त्याची सत्ता नाहीं असें द्रव्य जर त्याच्या पाशीं असलें तर तें चोरीचें द्रव्य होय व तें चोरीचें द्रव्य बाळगणारा एका दृष्टीनें चोर म्हणून जी योग्य शिक्षा असेल ती मिळणें अवश्य आहे.

देशांत संपत्ति नाहीं म्हणून देश भिकार होऊं शकतो किंवा देशांत संपत्ति असूनही तिची योग्य वांटणी झालेली नसली म्हणजे देश भिकार होतो. उत्तर किंवा दक्षिण ध्रुवाकडील देश, मध्य आफ्रिकेंतील देश आणि समुद्रांतील कांहीं कांहीं खडकाळ बेटें येथें खरोखरच संपत्ति नसल्यामुळें ते प्रदेश कंगाल अवस्थेंत पडलेले आहेत. परंतु पृथ्वीच्या पाठीवर कांहीं असे हतभाग्य देश आहेत कीं, तेथें अपरंपार संपत्ति असूनही भिकार देशांत त्यांचा पहिला नंबर लागण्याची पाळी येते. महिन्यांतून पंधरा दिवस अहोरात्र जागून, भ्रमण करून आणि श्रम करून चंद्रानें अमृताचा सांठा आपलेपाशीं जमवून ठेवावा आणि देवांनीं दुसऱ्या पंधरवड्यांत चंद्रानें जमवून ठेविलेलें अमृत खाऊन फस्त करावें आणि क्षयरोगानें ग्रस्त झालेल्या चंद्राच्या हातापायांच्या काड्या करून सोडाव्या, हा प्रकार स्वर्गलोकांत

देखील दिसून येतो. हाय! हाय! अधाशीपणानें आणि खादाडपणानें देवांना देखील सोडलें नाहीं. आणि दुबळयानें जमविलेल्या अन्नावर बलाढ्यांनीं धाड घालण्याची वहिवाट आकाशांत देखील चालू आहे. मग माणसांना कशाला हांसलें पाहिजे? आकाशांत जर अशा गोष्टी चालतात तर मग त्या जमिनीवर झाल्या तर त्यांत नवल तें काय? चंद्राच्या सारखीच पुष्कळ देशांतील लोकांची स्थिति होते. त्या देशांतून अनिवार संपत्ति असते. परंतु तिचा दुरुपयोग होत असतो. ह्यामुळें लाखों लोकांना उपाशी मरावें लागतें. शेतें चांगलीं पिकलेलीं असतात आणि त्यांची राखण करणारा शेतकरी भुकेनें तळमळत असतो. गलबतावर धान्याच्या पोत्यांचे ढीगच्या ढीग पडलेले असतात आणि तीं पोतीं वाहणाऱ्या हमालाच्या पोटांत भुकेनें काहूर उसळून टाकिलेलें असतें. ह्या सगळयांचें कारण काय? असें कशानें होतें? ह्याचें उत्तर संपत्तीची वांटणी बरोबर होत नाहीं हें होय. आधीं सगळ्यांचीं पोटें भरल्यावांचून आपला पैसा चैन-बाजींत उधळून टाकण्याचा कोणालाही अधिकार नाहीं आणि जो असें करतो तो परमेश्वराची आज्ञा मोडतो आणि हातांत शस्त्र घेतल्यावांचूनही शेकडों गरिबांचे खून करतो. आणि असले खून करणारे जागोजाग किती तरी लोक सांपडतात. हे जरी फांशीं गेले नाहींत तरी त्यांच्या आधाशी-पणामुळें सदोष मनुष्यवध झाले नाहींत असें कोण म्हणूं शकेल? दुष्काळांत अशा प्रकारचे खून अतिशय होतात. पण त्याबद्दल जबाबदार कोण? जे श्रीमंत खून करतात तेच न्यायासनावर बसून शिक्षा देणार. मग आपणच आपल्याला फांशीची शिक्षा करून घेणारा न्यायप्रिय मनुष्य या जगांत कोण सांपडणार? दुष्काळ ईश्वरी क्षोभामुळें पडतो असें नाहीं. तर श्रीमंतांचा खादाडपणा आणि हावरेपणा हेही पुष्कळ अंशांनीं त्याला कारणीभूत होतात. यंदांच्या अवर्षणामुळें हा भयंकर दुष्काळ आपल्यावर येऊन पडला आहे, अशा, डोळ्यांत टिपें आणून आणि कंठ सद्गदित करून पण एकीकडे अजीर्णाची ढेंकर देत श्रीमंत लोक गरिबांना बाता

मारीत असतात. पण श्रीमंतांनीं गरिबांचीं दरसाल घरें धुऊन नेऊन आपलीं घरें भरून ठेविलीं नसतीं तर हा एक वर्षीं पाऊस न पडल्याबरोबर उपाशी मरण्याचा प्रसंग गरिबांवर खास आला नसता. श्रीमंत आपले अवगुण झांकण्यासाठीं देवावर देखील दोष लादण्याला मागें पुढें पहात नाहींत, व त्यासाठीं ते वाटतील तशा युक्त्या करितात. आपला देश दिवसेंदिवस सधन होत चालला आहे अशा कल्पना लोकांच्या मनांत भरवून देण्याचा त्यांचा नेहमीं प्रयत्न चालला असतो. ह्यासाठीं किती कोष्टकें तयार होत असतात, किती आंकडे भरण्यांत येत असतात, आणि किती कागद खर्च होत असतात ह्याची गणती नाहीं. गरीब लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्यासाठीं किती कारकून लोकांना आपली डोळेफोड करून घ्यावी लागत आहे! आणि अर्धपोटीं तळमळत पडणाऱ्या लोकांना आपला देश उत्तरोत्तर सधन होत चालला आहे हें निदान समाधान तरी वाटण्यासाठीं जगांत किती नोकर लोकांच्या माना टिपणें लिहून लिहून दुखूं लागल्या असतील ? ठीक आहे. श्रीमंतांनो चालूं द्या हे उद्योग. तुमचे धंदे फार स्तुत्य आहेत. पहा, ह्याच्या योगानें गरीब लोक फसले तर. नाहीं तर दुसरी युक्ति. पण अशा युक्त्या किती चालणार ! आणि त्या मनुष्यापुढं चालल्या तरी देवापुढें कशा चालतील ? देव तुमच्या कागदावर काय लिहिलेलें आहे हें पहात बसणार नाहीं. तुमच्या अंतःकरणांत काय लिहिलें आहे, तें पाहील. आणि त्याच्यापासून तुम्ही आपलें अंतःकरण कसें दडवून ठेवाल ? आणि मनुष्यें देखील तुमच्या ह्या आंकड्यांनीं आणि वितंडवादांनीं फसतीलच असें नाहीं. पुष्कळ लोकांना तुमचे आंकडेबिकडे कांहीं समजत नाहींत. पण आपण उपाशी आहों एवढें मात्र समजतें. खोल गेलेले डोळे, खळगे पडलेले गाल आणि भाकाळ्या पडलेलीं पोटें, हीं जुलमाची रात्रंदिवस साक्ष देत असतां ह्यांच्यापुढं तुमच्या आंकड्यांचें काय तेज पडणार आहे ? तुमचे आंकडे खरेच आहेत असें घटकाभर मानलें तरी गरिबांची उपासमार आणि दुर्दशा हे चालते बोलते आणि

साऱ्यांना दिसणारे आणि समजणारे जे आंकडे तुमच्या काळ्या लोकांच्या नजरेस आणून देत आहेत, ते खोटे कोणाच्यानें म्हणवणार आहेत? धांवतां धांवतां देखील वाचतां येण्यासारखे हे आंकडे साऱ्या जगभर रस्त्यांतून उघडे पडलेले आणि झोंपड्यांतून कण्हत असलेले पाहून कोण शहाणा तुमच्या आंकड्यावर विश्वास ठेवणार आहे? इतके लोक उपाशी मरत असतांना तुम्ही म्हणतां आपलें राष्ट्र अधिक श्रीमंत होत चाललें आहे, हें कोणाला खरें वाटणार? तुमच्या पेट्यांतून पैसे फार झाले आहेत हें राष्ट्राच्या श्रीमंतीचें लक्षण होय असें तुम्ही जर समजत असाल तर खुशाल समजा. पण साधारण लोक असें समजत नाहींत व श्रीमंत होत चाललेल्या राष्ट्रांत राहून उपाशी मरण्यांत त्यांना मोठा अभिमान वाटतो, असेंही नाहीं. तसेंच हल्लीं जगांतील राष्ट्रांतून धर्मशिक्षणाकडे विशेष लक्ष दिलें जात असल्यामुळें लोकांची धर्मश्रद्धा विशेष वाढली आहे असेंही प्रतिपादन करण्यांत येत असतें. पण आपल्या भोंवतीं हजारों लोक अन्नासाठीं पटापट प्राण टाकीत असतांनाही ज्यांच्या घृतकल्यांत आणि मधुकल्यांत तिळमात्र कमी होतां कामा नये असे लोक ज्या राष्ट्रांत आहेत, तें राष्ट्र धार्मिक आहे असें कोण म्हणेल? धर्मासाठीं लढाया करून लोकांचे गळे कापले आणि राज्यांत स्वाहाकार केला म्हणजे राष्ट्र धार्मिक होतें असें नाहीं. गगनचुंबित शिखरांचीं देवालयें आणि प्रार्थनालयें बांधलीं म्हणजे राष्ट्र धार्मिक होतें असें नव्हे. धर्माधिकाऱ्यांना मोठमोठे पगार देत असलें म्हणजे राष्ट्रांतील धार्मिकपणा वाढतो असें नव्हे. किंवा इतर धर्मांतील मनुष्यकोटी सोडून ख्रिस्ताच्या कळपांतील मेंढरें होऊन राहणारांची संख्या अधिक वाढली म्हणजे राष्ट्रांतील धार्मिकपणा वाढला असें नाहीं. गरिबांची सोय लागत नाहीं त्या राष्ट्रांत कसला धार्मिकपणा आला आहे? गरिबांची उपासमार झाल्यानें राष्ट्राला एक विशेष महत्त्वाचा तोटा सोसावा लागतो व तिकडे श्रीमंत लोकांचें बहुधा लक्ष जात नाहीं. सरकार देशाचें रक्षण करण्यासाठीं लाखों रुपये खर्च करीत असतें, समुद्रावर आरमार ठेवितें

आणि जमिनीवर किल्ले बांधितें. पण ही सर्व संरक्षणाचीं साधनें दारिद्र्यानें गांजलेल्या देशांत निष्फळ आहेत. नुसत्या आरमारांत आणि किल्ल्यांत कांहीं शक्ति नसते. शक्ति मनुष्याच्या अंगांत असते. त्या आरमारावरील किंवा किल्ल्यांतील शिपाई जर सशक्त असतील तर त्या राष्ट्राला खरी मजबुती. नाहीं तर त्याचें संरक्षण व्हावें कसें ? पण जे पुढें शिपाईगिरीचीं कामें करणार तेच गरिबांचे मुलगे जर लहानपणीं अन्नासाठीं वाळलेले असले तर पुढें राष्ट्राचा पाया त्यांच्या मणगटावर डळमळल्याशिवाय उभा रहावा कसा ? सरकारच्या पलटणींत गेल्यावर पोटभर खायला मिळेल हें खरें. तरी पण हाडापेराची वाढ लहानपणीं अन्नाच्या अभावामुळें खुंटली असली तर मग तसल्या कमकुवत आणि पोचट शिपायांचा काय उपयोग ? तेव्हां सरहद्दीवरील सुरक्षितपणासाठीं तिजोऱ्या रिकाम्या करणारांनीं आपल्या राष्ट्रांतील गरिबांना पोटभर खायला मिळतें किंवा नाहीं, इकडे विशेष लक्ष दिल्यास त्यापासून परिणामीं अधिक फायदा होण्याचा संभव आहे.

गरीब लोकांना पोटभर खावयाला मिळत नाहीं म्हणून त्यांची उपासमार होते, वगैरे गोष्टींचें विवेचन मागील अंकीं केलेंच आहे. पण श्रीमंतांच्या आधाशीपणामुळें गरिबांची फक्त शारीरिकच उपासमार होती तर त्यांतही फारसें कांहीं नव्हतें. परंतु ह्याच्याहीपेक्षां भयंकर परिणाम गरीबांना सोसावे लागतात. शरीराची उपासमार झालेली एक वेळ चालेल. पण मनाला अवश्य लागणारें शिक्षण त्यांना मिळणें फार जरूर आहे. पण तें मिळतें आहे कोठें ? गरीब लोक अशिक्षित आणि उपाशी रहात असतांही आपल्या पेट्या पैशांनीं भरून ठेवणाऱ्या श्रीमंतांना आपल्या डोक्यावर काय काय जबाबदारी आहे हें मुळींच समजत नसतें. व तिकडे ते लक्षही कधीं देत नाहींत. आणि यदाकदाचित् चुकून त्यांचें लक्ष ह्या प्रश्नाकडे गेलें तरी त्यांचा उद्दामपणाचा जबाब तयार असतोच. गरीबानें काम करावें आणि आपलें पोट भरावें. त्यानें

दिवसभर काम केलें तर त्याला दीड आण्याची मजुरी कोणीही देईल. आणि दीड आणा कांहीं थोडा झाला नाहीं. थोडा झाला नाहीं खराच !! गरीबाला नाच तमाशे, दारूबाजी, रंडीबाजी, असल्या गोष्टींत पैसे उधळावयाचे नसतात. म्हणून तो कसा तरी तेवढ्यांत आपला उदरनिर्वाह करील, ही गोष्ट वेगळी. पण आपल्याला बरोबर पांच हजारांचें पेनशन मिळावें किंवा हुंडणावळीच्या दरांत फेरफार झाल्याबरोबर आपणाला कॉंपेन्सेशन मिळावें म्हणून धडपड करणाऱ्या लोकांनीं जर असें म्हटलें तर तें किती सयुक्तिक आहे बरें ? ज्यांना रोज शंभर रुपये पगार मिळत असूनही तेवढा रोजच्या खर्चाला पुरत नाहीं, त्यांनीं 'दीड आणा कांहीं थोडा झाला नाहीं' असें म्हणणें अगदीं विसंगत दिसतें. संपत्तीच्या मदांत श्रीमंत मनुष्य पाहिजे तसें बोलतो. परंतु तो असा विचार करीत नाहीं कीं, दीड आण्याच्या पैशांत त्या गरीबानें काय करावें, त्यानें काय खावें, आणि आपल्या बायकांमुलांना काय खायला द्यावें? त्याला कांहीं कपडालत्ता नको काय? तो त्यानें कशांतून करावा ? तो कधीं आजारी पडला आणि त्या दिवशीं त्याला दीड आणाच का होईना पण तोही मिळाला नाहीं तर मग त्यानें कोठला आणावा ? ह्या प्रसंगासाठीं त्याला कांहीं संचय करून ठेवणें जरूर नाहीं काय ? पण दीड आण्याच्या पैशांतून हें सगळें व्हावें कसें? तरी पण श्रीमंत मनुष्य म्हणतच असतो कीं, दीड आणा कांहीं थोडा झाला नाहीं. पण श्रीमंतापाशीं पैसा असला ह्मणजे अक्कल असतेच असें नाहीं. श्रीमंतांचें दुसरें असें एक म्हणणें असतें कीं, लोक गरीब होतात ते आपल्या अंगच्या दुर्गुणांमुळें होतात. परंतु असल्या प्रकारच्या सर्व म्हणण्यांतली खुबी अशी असते कीं, कोणींकडून तरी गरीबाला एकादा पैसा दान करण्याचा प्रसंग आपणावर गुदरला असतां त्यांतून निसटून जाण्याकरितां ह्या युक्त्या योजिलेल्या असतात. कारण आपल्या अंगच्या कोणत्याही दुर्गुणाशिवाय केवळ दुर्दैवानें गरीब झालेले जे लोक आहेत त्यांची ह्या श्रीमंत उदार महात्म्यांनीं आणि कर्णाच्या पुतळ्यांनीं आजपर्यंत काय

दाद लाविली आहे ? कसें तरी करून आपलें कर्तव्य टाळून मोकळें व्हावयाचें हा सारा उद्देश असतो व त्या उद्देशाप्रमाणें हातून कृति घडते. सारांश, गरीब लोकांना अधिक गरीब करण्यापेक्षां इतर कामांत श्रीमंत लोकांकडून फारशी मदत होतें असें नाहीं. दीड आण्यांत गरीबांचें पोट भरत नाहीं हें तर आहेच; परंतु ह्याच्याहीपेक्षां अतिशय वाईट गोष्ट वर सांगितलेली होय कीं, गरीबांना अवश्य लागणारें मानसिक शिक्षणही मिळत नाहीं. त्यामुळें पुष्कळ वेळां गरीबांच्या हातून अन्याय घडतात. अन्यायाचा परिणाम वाईट ही गोष्ट शिक्षणाच्या अभावामुळें त्यांच्या मनावर बिंबलेली नसते. व दुपारची वेळ आली म्हणजे घरांत अन्न खावयाला नसतें, अशा प्रसंगीं मध्यान्ह काळची भूक मध्यान्ह रात्रीच्या धाडसानें शांत करण्यापेक्षां त्यांना दुसरा मार्गच दिसत नाहीं. व ते गरीब लोक दारिद्र्यानें इतके गांजलेले असतात कीं, त्यांच्या मनांतील तुरुंगाची भीति अगदीं नाहींशी होऊन गेलेली असते. तुरुंगाच्या बाहेर राहून उपभोगण्यासारखें सुख जगांत त्यांच्यासाठीं कांहीं उरलेलें नसतें. श्रीमंत लोकांनीं त्यांच्या पुढील अन्न ओढून नेल्यामुळें त्यांचीं बायका-पोरें उपाशी मरून गेलीं असल्याकारणानें मागचा कांहीं पाश उरलेला नाहीं हें पाहून गरीब लोक मोठ्या आनंदानें तुरुंगांत जायला तयार होतात. त्यांना घरीं उपाशी मरावें लागतें. पण तुरुंगांत दोन तरी भाकऱ्या मिळतात. ज्या वीतभर घरांत शंभर ठिकाणीं गळत असावयाचें आणि ज्याच्या फाटक्या कुडांनीं थंडीवाऱ्याचें निवारण व्हावयाचें नाहीं, अशा खोपटापेक्षां तुरुंग कोणाला चांगला वाटणार नाहीं ? अहाहा ! धन्य आहे त्या श्रीमंत लोकांची, कीं ज्यांच्या कृतीनें गरीबांना तुरुंग देखील प्रिय वाटूं लागले. कित्येक देशांतील सरकारें गुन्हे ज्या प्रमाणानें अधिक वाढतील त्या प्रमाणानें पोलिसाचे शिपाई वाढवीत असतात, परंतु गुन्हे वाढण्याचें कारण काय, ह्या प्रश्नाचा विचार करण्याकडे कोणीही लक्ष्य देत नाहीं. नवीन पोलीस ठेवून जो खर्च वाढतो, तो फिरून लोकांच्याच डोक्यावर बसतो. त्यामुळें

लोक अधिकाधिकच भिकारी होत जातात. आणि सकृद्दर्शनीं गुन्हे बंद करण्यासाठीं म्हणून जो उपाय योजण्यांत आलेला असतो, त्याच्याच योगानें अंशतः तरी गुन्हे वाढले जातात ह्यांत संशय नाहीं. पोलीस आणि पोलिसांवरील वरिष्ठ अधिकारी ह्यांच्या पगारांत जे पैसे खर्च होतात, त्यांतला कांहीं भाग जे केवळ पोटासाठीं गुन्हे करितात अशा गरीबांच्या उदरनिर्वाहासाठीं खर्च केला, तर एकंदरींत किती फायदेशीर होणार आहे ! गुन्हा करावयाला लावून शिक्षा देण्यापेक्षां गुन्हा न होऊं देणें हें अधिक चांगलें. जेथें आपल्या पोटच्या पोराला पोटभर खायला घालावयाला जवळ अन्न नसल्यामुळें आई आपल्या मुलाचा जीव घेण्याला उद्युक्त होते व अशा वेळींही त्या आईला तिच्या कर्माबद्दल शिक्षा होते, तेथें त्या न्यायाची तारीफ करावी किंवा तेथील श्रीमंत लोकांच्या सदयतेचा तारीफ करावी हें सांगणें कठीण आहे. सारांश, गरीबांनीं अन्याय केला म्हणजे त्याला शासन करण्याकडे श्रीमंतांची जितकी प्रवृत्ति असते, तितकी अन्यायाचें कारण जी गरीबी ती काढून टाकण्याकडे नसते. व याचें कारणही अगदीं सावें आहे. शिक्षा भोगावयाची असते दुसऱ्याला. ती तो भोगीना खुशाल बापडा. पण त्याची गरीबी काढून टाकावयाची म्हटलें म्हणजे आपली पिशवी होणार रिकामी. एवढें कोणी सांगितलें आहे ? तेवढ्याच पैशांत वाटेल तितकी दारू पितां येईल, वाटेल तितके नाच तमाशे करितां येतील, वाटेल त्या मनुष्याला संतुष्ट करण्या इतका लांच देतां येईल, किंवा वाटेल ती पदवी विकत घेतां येईल, अशा विचारांच्या गर्दींत गरीबांच्या दैन्यावस्थेची दाद कसली लागते ? पण नेहमींच असें करणें चांगलें नाहीं. गरीब लोकांना पोटापुरतें खायला मिळेल आणि जरूर लागणारें शिक्षण मिळेल, इतकी तरी व्यवस्था श्रीमंतांकडून होणें इष्ट आहे. कांहीं देशांतून सरकार मार्फत गरीबांसाठीं शाळा घालण्यांत आल्या आहेत हें खरें, पण नुसत्या शाळा घालूनही कांहीं उपयोग नाहीं. शरीराचें पोषण करणारें अन्न त्यांना मिळाल्यावांचून मनाचें पोषण करणारी विद्या त्यांना कशी गोड लागणार ?

कित्येक खेड्यांतून उपाशी मरणाऱ्या लोकांच्या शिक्षणासाठीं शाळेच्या इमारती बरच पैसे खर्च करून बांधलेल्या असतात. व फारशीं मुलें जमलीं नाहींत तरी आपल्या कारखान्यांतून तयार होऊन शिल्लक पडल्यामुळें गंज चढलेल्या-पैकीं एकेक मास्तरही त्या खेड्यावर लादण्यांत येतो. पण त्या खेड्यांतील लोकांचे जीव वांचावे ह्याबद्दल तेथें ज्यांनीं शाळा बांधल्या त्यांनीं काय व्यवस्था केली आहे ? दुपारच्या वेळीं घांसभर अन्न देण्याची सरकारनें तेथें कांहीं सोय केली आहे काय ? शाळेंतील मुलें जर अर्धपोटीं किंवा अगदीं उपाशी शाळेंत येतील, तर मास्तर त्यांना काय शिकवील ? व मास्तरचा उपदेश मुलांच्या मनावर काय ठसणार ? मुलांच्या हातापायांत शक्ति नसेल, तर मास्तरच्या शिकविण्यानें मुलांच्या मेंदूंत शक्ति कोणीकडून येणार ? तेव्हां खेड्यांखेड्यांतून शाळा बांधूं लागण्याच्यापूर्वीं त्या त्या खेड्यांतील लोक उपाशी मरत नाहींत, हें पहाणें फार जरूरीचें आहे. गरीब लोकांसंबंधानें आणखीही अशी एक गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते कीं, त्यांच्यापैकीं बरेच लोक नेहमीं आजारी असतात. व याबद्दल सुद्धां त्यांनीं श्रीमंत लोकांच्याच आधाशीपणाचे आभार मानले पाहिजेत. श्रीमंतांना सशक्त करण्यासाठीं गरीबांना अशक्त रहावें लागतें. श्रीमंतांचा धष्टपुष्टपणा हा गरीबांच्या क्षीणतेचें कारण आहे. आपल्या जवळचें चांगलें चांगलें अन्न श्रीमंतांच्या भरीस घालून गरीबांना वाईट साईट कसलें तरी अन्न खावें लागतें. आपल्या शेतांत पिकविलेले आंबेमोहोराचे तांदूळ श्रीमंतांनीं उचलून नेले म्हणजे गरीबांना कित्येक प्रसंगीं झाडांचीं मुळें, कांदे, वगैरे पदार्थांवर आपली उपजीविका करावी लागते. ह्याचा परिणाम असा होतो कीं, त्या लोकांची प्रकृति बिघडून ते वरचेवर आजारी पडतात. अशा वेळीं श्रीमंतांनीं त्यांना मदत करणें जरूर आहे. परंतु श्रीमंतांपाशीं मदत मागितली असतां त्यांचीं ठराविक उत्तरें लागलींच पुढें येतात. कोणी गरीब आजारी असेल तर त्याच्यासाठीं दवाखाने बांधून ठेविले आहेत तेथें जावें. आणि आपल्या-पाशीं खावयाला कांहीं नसलें तर तेथें जाऊन मरावें. आमचा त्यांच्याशीं

काय संबंध ? तो आजारी पडला म्हणून आम्हांला त्याचा त्रास कशाला पाहिजे? अशा बेपरवाईचे जबाब पुष्कळ वेळां ऐकण्यांत येतात. हेंही चांगलें नव्हे. श्रीमंतानों, आजारी पडलेला आणि उपाशी मरत असलेला गरीब मनुष्य हा तुमचा एक भाऊच आहे. तुम्हांला श्रीमंत करण्यासाठीं तो गरीब झाला आहे. तुम्हांला बलिष्ठ करण्यासाठीं तो दुबळा झाला आहे. त्याचे पैसे तुमच्या खजिन्यांत आहेत. तुमचा त्याचा कांहीं संबंध नाहीं असें म्हणूं नका. असें म्हणून चालावयाचें नाहीं. तुम्ही म्हटलें तरी देव हें तुमचें म्हणणें ऐकणार नाहीं. तुमचा आणि गरीबांचा संबंध आहे किंवा नाहीं, हें तुम्हींच आपल्या मनांत उमजा. गरीबांनीं पुढें येऊन आपला संबंध सिद्ध करून दाखविण्याची वाट पाहूं नका. गरीबांना देवाचें मोठें पाठबळ आहे. गरीबांपासून लुबाडून घेतलेल्या द्रव्यांतूनच हजारों रुपये खर्च करून तयार केलेल्या तुमच्या बागबगीच्यांतून गरीबांना जाण्याची बंदी असली, तरी परमेश्वराच्या ह्या सृष्टिरूप बागेंतलि सर्व चमत्कार पाहण्याला गरीबांना परवानगी आहे. तुमचे मौल्यवान आणि सुंदर दिवे गरीबांना न मिळोत, पण तुमच्या दिव्यांपेक्षां शतपटीनें अधिक चांगले असे सूर्य, चंद्र, नक्षत्रें, हे दिवे देवानें गरीबांच्या तेलाचा खर्च न होतां त्यांना उजेड मिळावा म्हणून मुद्दाम निर्माण केलेले आहेत. गरीबांना देवाचा आधार इहलोकीं व परलोकीं सारखाच आहे. प्रश्न काय तो तुमच्या-बद्दलच. आपल्या जवळच्या संपत्तीचे ढीग पाहून तुम्हांला वाटतें कीं, आपण मोठे परमेश्वराच्या मर्जींतले आहों. परंतु हा सर्व भ्रम आहे, हें लॅझॅरसच्या गोष्टीवरून अगदीं स्पष्ट होतें. पूर्वीं कोणी एक अतिशय श्रीमंत मनुष्य होऊन गेला. तो दररोज अंगावर रेशमी वस्त्रें घेत असे आणि पंच-पक्वान्नी जेवण जेवीत असे. व त्याचे दाराशीं एक लॅझॅरस नांवाचा भिकारी पडलेला असे. पुढें लॅझॅरस मरण पावला, तेव्हां देवदूतांनीं त्याला स्वर्ग-लोकांत अब्रहामजवळ नेलें व तो श्रीमंत मनुष्य मेला तेव्हां तो नरकांतील अग्निकुंडांत जाऊन पडला. तेथें त्यानें डोळे उघडून पाहिलें तों लॅझॅरस

अब्रहामच्या जवळ बसलेला त्याला दिसला. तेव्हां तो श्रीमंत ओरडून म्हणाला, हे अब्रहाम, त्या लॅझॅरसला इकडे धाड. म्हणजे तो मला एक घोटभर पाणी तरी पाजील. माझी जीभ ह्या आगीनें अगदीं करपून गेली आहे. तेव्हां अब्रहाम म्हणाला, ह्या लोकांतील मनुष्यांना नरकलोकांत येतां यावयाचें नाहीं. तूं मृत्युलोकीं कर्मे केलीं आहेस त्याचें फळ तुला भोगिलें पाहिजे. तेव्हां तो श्रीमंत म्हणाला, बरें तर आतां निदान माझ्या सारखें वागलें तर मेल्यानंतर काय दुःखें भोगावीं लागतात, हें कळविण्याकरितां लॅझॅरसला मृत्युलोकीं जाऊं दे. तेथें माझे आणखी पांच भाऊ आहेत. परंतु अब्रहामनें ती गोष्ट कबूल केली नाहीं. पण ती स्थिति सांगण्याकरितां अब्रहामनें लॅझॅरसला त्या वेळीं जरी खालीं येऊं दिलें नाहीं, तरी अजून लॅझॅरस जर वर असेल आणि अब्रहाम त्याला परवानगी देईल तर फार चांगलें होईल. कारण त्या श्रीमंत मनुष्याचे त्या वेळीं फक्त पांचच भाऊ होते. परंतु हल्लीं त्याच्या भावांची संख्या अतिशय वाढली आहे.

**अभ्यास** —

*( १ ) 'देव तुमच्या कागदावर काय लिहिलेलें आहे, हें पहात बसणार नाहीं. तो तुमच्या अंतःकरणांत काय लिहिलें आहे, तें पाहील.' याच तत्त्वाचें प्रतिपादन करणारी 'Abou Ben Adhem' ही कविता वाचा आणि तिचा कथाभाग दोन छोट्या नाट्यप्रवेशांच्या रूपानें लिहा.*

*( २ ) शिवरामपंतांनीं खऱ्या धार्मिकपणाचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत, तीं आपल्या समाजांत सध्यां आढळतात काय?*

*( ३ ) गरिबी कशामुळें निर्माण होते आणि ती कशी नाहींशी करतां येईल, हा विषय तुमच्या वादविवाद-मंडळाकरितां घेऊन त्याची चर्चा करा.*

# स्वातंत्र्यवीर विल्यम टेल

५

## परिचय —

शिवरामपंत स्वतंत्रता–देवीचे एकनिष्ठ भक्त होते. पारतंत्र्यांत पिचत पडलेला आपला देश शक्य तितक्या लवकर स्वतंत्र व्हावा म्हणून जनतेच्या मनांत स्वातंत्र्य-संपादनाची ज्योत प्रज्वलित करण्याचा त्यांनीं अहर्निश प्रयत्न केला. स्वदेशांतल्या प्रत्येक घटनेचा आणि प्रसंगाचा उपयोग त्यांनीं जनमन चेतविण्याकरितांच केला. पण केवळ आपल्या देशांतल्या पूर्वींच्या स्वातंत्र्याचे पोवाडे गाऊन आणि आपल्या आजच्या गुलामगिरीची निर्भर्त्सना करून ते स्वस्थ बसले नाहींत. परदेशांतल्या स्वातंत्र्यवीरांचीं चरित्रें गाण्यांत आणि तेथल्या रोमहर्षक चळवळींचे इतिहास वर्णन करण्यांत त्यांची लेखणी नेहमींच रंगून जात असे. 'ग्रीस देश कसा स्वतंत्र झाला', 'स्वित्झर्लंडची स्वतंत्रता', इत्यादि लेखमाला त्यांनीं मोठ्या तन्मयतेनें लिहिल्या आहेत. 'स्वातंत्र्यवीर विल्यम टेल' हा लेख 'स्वित्झर्लंडची स्वतंत्रता' या मालेंतलाच आहे. एका तेजस्वी देशभक्ताची ही अद्भुतरम्य कथा त्यांनीं अत्यंत समरसतेनें चित्रित केली आहे. स्वातंत्र्यवीरांचे पोवाडे गातांना त्यांच्या लेखणीला जणूं कांहीं अग्नीचें तेज चढतें. या दृष्टीनें 'सेंट डॉमिनगोमधील एक रात्र' या लेखांतलें त्यांचें पुढील वर्णन वाचनीय आहे:—

' गोऱ्या वसाहतवाल्यांची अशी कल्पना होती कीं नीग्रो लोकांच्या पुढाऱ्याला ठार मारलें म्हणजे त्यांना दहशत बसून ते पुढें कांहीं एक करणार नाहींत. परंतु त्यांची ही कल्पना चुकली. एखादा मनुष्य दहशतीनें वचकेल. परंतु सर्व माणसें सारख्याच दर्जाचीं आहेत आणि सर्वांना स्वतंत्र होण्याचा सारखाच हक्क आहे, हीं उदात्त तत्त्वें दहशतीनें वचकण्यासारखीं नाहींत. ज्या अंतःकरणामध्यें निव्वळ पेंढाच भरला आहे तें अंतःकरण जुलमी लोकांच्या असल्या उपायांनीं भयग्रस्त होईल. परंतु समान हक्क आणि स्वतंत्रता यांचीं हीं तत्त्वें ज्या अंतःकरणांत एकदां ठसलीं, तीं अंतःकरणें त्यांच्यापुढें जुलुमाचा ब्रह्मराक्षसही मूर्तिमंत येऊन उभा राहिला तरी एक पाऊलभरसुद्धां मागें हटणार नाहींत. एका रात्रीमध्यें साठ हजार नीग्रो लोक एकत्र गोळा झाले. अडाणी लोक ! त्यांच्यापाशीं सुधारलेलीं शस्त्रें वगैरे कांहीं एक नव्हतें. तरी पण गोऱ्या वसाहतवाल्या लोकांचीं उसांचीं आणि कॉफीचीं शेतें ते ज्या हत्यारांनीं लागवडीस आणीत असत, तीं हत्यारें त्यांचेपाशीं होतीं. तीं त्यांनीं एका हातांत घेतलीं आणि दुसऱ्या हातांत मशाली पाजळून घेतल्या. इतकी तयारी झाल्यानंतर सर्व लोक सारख्या दर्जाचे आहेत आणि सर्वांना स्वतंत्र होण्याचा सारखाच हक्क आहे, या तत्त्वाची अंमलबजावणी करण्याकरितां ते निघाले. गोरे मळेवाले आणि वसाहतवाले यांनीं त्या नीग्रो लोकांवर शेंकडों वर्षें जुलूम चालविला होता. त्यांच्या पापपुण्याचा निवाडा होण्याची वेळ त्या दिवशीं आली. ते मळेवाले आणि वसाहतवाले आपल्यासारख्याच परंतु अनाथ झालेल्या गरीब लोकांवर नानाप्रकारचे जुलूम करून आपल्या पापांचे घडे भरून काढण्यामध्यें शेंकडों वर्षेंपर्यंत गुंतले होते. ते त्यांचे पापाचे घडे त्या रात्रीं कांठोकांठ भरून आले. त्या मळेवाल्यांनीं त्या नीग्रो गुलामांच्या मासाचा चिखल आणि रक्ताचें पाणी एकत्र कालवून उत्तम रीतीनें कमावलेल्या गुलामगिरीच्या जमिनीमध्यें जुलुमाचा मळा तयार करून त्यांत आपल्या बळजबरीच्या अंमलाचा जो वृक्ष लावला होता, त्याचीं शंभर वर्षें त्या वेळीं पुरीं झालीं. ते मळेवाले पूर्वीं त्या नीग्रोंना ज्या मार्गानें छळीत होते, त्याचाच उलट प्रयोग त्यांच्यावर करून त्यांचे हालहाल करून त्यांना त्या नीग्रोंनीं ठार मारलें. गोरा रंग म्हणजे मृत्यूचा शिक्का, अशी त्या वेळीं स्थिति झाली होती. आपण या वसाहतवाल्या लोकांपाशीं न्याय मागत होतों. पण तो त्यांनीं आपल्याला कधीं दिला नाहीं, या त्यांच्या पातकाबद्दल हेंच शासन योग्य आहे अशी

प्रत्येक नीग्रोच्या मनाची खात्री होऊन चुकली होती. अशी त्यांच्या मनाची स्थिति झाली असल्यामुळें थोड्याच वेळामध्यें त्यांनीं तें सर्व शहर उध्वस्त करून टाकलें. जिकडे पहावें तिकडे धूर, राख, ज्वाळा, प्रेतें, रक्त, आणि मुंडकीं यांच्याशिवाय दुसरें कांहींच दिसत नव्हतें. मळेवाले लोक थोड्या वेळापूर्वी ज्या घरांतून नीग्रो गुलामांच्या निढळाच्या घामाच्या पैशावर ऐषआराम भोगीत होते आणि चैन करीत आले होते, तीं घरें जमीनदोस्त होऊन त्या शून्य, भयाण, भेसूर आणि उध्वस्त झालेल्या ठिकाणांतून मांसाच्या लोभानें जमा झालेल्या भुताखेतांच्या आणि हिंस्त्र पशूंच्या आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या. अशा भयंकर रीतीनें त्या रात्रीं गुलामगिरीनें जुलुमावर सूड उगविला आणि आपल्या भावी स्वातंत्र्याच्या इमारतीच्या पायाचा पहिला दगड बसविला.'

स्वित्झर्लंडमधील लोक आस्ट्रियाच्या जुलमाला अगदीं कंटाळून गेले होते, गुप्त मंडळ्या जमूं लागल्या होत्या, आणि देशभक्तांनीं स्वदेश स्वतंत्र करण्याच्या शपथा घेतल्या होत्या. आपल्या मानेवरील गुलामगिरीचें जोखड आपण केव्हां झुगारून देऊं आणि आपल्या पायांतील गुलामगिरीच्या शृंखळा आपण केव्हां तोडून टाकूं, असें त्यांना होऊन गेलें होतें. दारूनें सुरुंग भरून तयार झालेला होता. फक्त एका ठिणगीचा अवकाश होता. ती मिळाल्याबरोबर स्वित्झर्लंडवरील आस्ट्रियाच्या जुलमी सत्तेच्या ठिकऱ्या उडून जावयाच्या होत्या. इतकी जरी स्थिति झाली होती तरी स्वित्झर्लंडमधील जुलमी अधिकाऱ्यांच्या डोळ्यावरील धूर उतरला नव्हता. जुलमी राजांना नेहमीं असेंच वाटत असतें कीं, आपली प्रजा आपण जितके जुलूम करूं तितके निमूटपणें सोशील. परंतु ज्याप्रमाणें सापाला दांत आणि विंचवाला नांगी असते, त्याचप्रमाणें मनुष्याला त्वेष असतो, हें ते विसरतात. पारतंत्र्यांत मनुष्याच्या मनाला झोंबणारें विष असतें आणि क्षुब्ध झालेल्या गुलामगिरीच्या तरवारींनीं अनेक जुलमी राजांचे गळे कापलेले आहेत, या गोष्टी त्यांच्या स्वप्नांतही येत नाहींत. लोकांना आपली जन्मभूमि आपल्या

आईप्रमाणें प्रिय असते, तिच्यासाठीं ते पाहिजे तें साहस करण्याला तयार होतात, आणि तिच्यावर जे जुलूम करतात त्यांना ते आपले कट्टे हाडवैरी समजून त्यांच्या विध्वंसासाठीं ते टपून बसलेले असतात, हा विचार त्यांच्या मनाला कधीं शिवतसुद्धां नाहीं. असल्या जुलमी अधिकाऱ्यांपैकींच जेसलर हा एक होता. लोक इतके खवळलेले आहेत तर आपण या वेळीं जास्त आचरटपणा करूं नये अशी सुबुद्धि त्याला त्या वेळीं सुचली नाहीं आणि ती कोठून सुचणार ? ज्यांचें राज्य नष्ट करावयाचें देवाच्या मनांत येतें, त्यांची बुद्धि देव पहिल्यानें नष्ट करतो. जेसलरनें एक बादशाही टोपी एका काठीवर घालून ती काठी आपल्या राजधानींतील एका चवाठ्याच्या जागेवर उभी करून ठेवली, व जो येईल त्यानें त्या टोपीला मुजरा केला पाहिजे आणि तसें जो करणार नाहीं, त्याला राजद्रोही आणि बंडखोर समजला जाईल, म्हणून त्यानें ठरवलें. असा हुकूम झाल्याबरोबर जे कित्येक तोंडपुजे लोक जेसलरपुढें लोटांगणें घालीत होते, त्यांना आणखी एक नवीन दैवता मिळाली ! ते त्या टोपीपुढेंही रोज लोटांगणें घालूं लागले ! परंतु वुइल्यम टेल हा अशांतील मनुष्य नव्हता. तो स्वतः त्या तीस कटवाल्यांपैकीं एक होता व आपले देशबांधव परकीय जुलुमाचें जोखड आपल्या मानेवर कां वागवीत बसले आहेत आणि तें एकदम झुगारून कां देत नाहींत, याबद्दल त्याला मोठा विस्मय वाटत असे. राजाच्या टोपीला मुजरा केला पाहिजे, ही गोष्ट जेव्हां त्याला कळली, तेव्हां मी असली अपमानास्पद गोष्ट कधींही करणार नाहीं, असें त्यानें साफ सांगितलें. या राजद्रोहाची बातमी जेसलरला कळतां-क्षणींच त्यानें वुइल्यम टेलला बोलावून आणलें व त्याचा छळ करण्याला त्यानें सुरवात केली. त्याला आणि त्याच्या मुलाला बोलावून त्यानें असें सांगितलें कीं, तूं आपल्या तीरकमठ्यानें आपल्या मुलाच्या डोक्यावर एक नारिंगाचें फळ ठेऊन त्याजवर नेम मार; पण तो नेम जर चुकला तर मात्र तुझा शिरच्छेद करण्यांत येईल. वुइल्यम टेल हा आपल्या इकडील पृथ्वीराज चव्हाणासारखा नेम मारण्याच्या कामांत फार कुशल होता. परंतु

थोडा नेम चुकला तर नारिंगाला लागणारा बाण मुलाच्या मस्तकाला लागून बापाच्या हातून पुत्रहत्या होण्याचा संभव होता. एखाद्या तिरंदाजानें बाण मारला तर तो एक चुकेल तरी किंवा बरोबर तरी लागेल. परंतु ह्या दोन्ही परिणामांना अनुलक्षून जेसलरनें आपली दुष्टपणाची तरतूद करून ठेवली होती. नेम बरोबर धरला तर तो बाण मुलाच्या मस्तकाला लागलाच पाहिजे, आणि त्या बाणानें त्याचा प्राण गेला म्हणजे अर्थात् पुत्रशोकानें बाप व्याकूळ होऊन जाईल, असें जेसलरचें धोरण होतें. आपण कदाचित् या पेंचांतून सुटण्याकरितां त्यानें नेम चुकविला, तर नेम चुकल्याबद्दल देहांत प्रायश्चित्ताची योजना जेसलरनें दुसरीकडे करून ठेविलेलीच होती. अशी जेसलरच्या जुलमाची दुहेरी युक्ति होती. जुलमी अधिकारी किती दुष्ट असतात आणि ते अनाथ गरीबांचा मुद्दाम कसा छळ करीत असतात, हें ह्या जेसलरच्या निर्दयपणाच्या आणि लबाडीच्या हुकमावरून चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे. परंतु जे लोक जुलमाच्या विरुद्ध बंड करून उठले, त्यांचा परमेश्वर नेहमीं पाठिराखा असतो, हें तत्त्व इतिहासांत अनेक जागीं आढळून येतें. आपल्याला गुलामगिरी नको, असा मनुष्यांच्या मनानें निदिध्यास घेतला म्हणजे परमेश्वर त्यांना स्वतंत्रता देण्याला तयारच असतो. ही परमेश्वराची लीला आणि गांजलेल्या लोकांना स्वतंत्रता देण्याच्या कामीं परमेश्वराची तत्परता या गोष्टी वुइल्यम टेलच्या आणि स्वित्झर्लंडच्या स्वतंत्रतेच्या कथानकामध्यें फारच चांगल्या रीतीनें दिसून येतात.

हें कथानक येथपर्यंत इतिहासाला धरून वर्णिलें आहे. आतां कित्येक अर्वाचीन शोधकांनीं जरी असें शोधून काढिलें आहे कीं, ही वुइल्यम टेलची गोष्ट खरोखर घडून आलेली नसून ती निव्वळ काल्पनिक आहे, तरी सर्व इतिहासकारांनीं तिचा आपल्या इतिहासांतून उल्लेख केलेला आहे. व्हाइटबुक आणि 'सुडी' चे ग्रंथ यांत याबद्दलची सविस्तर आणि विश्वसनीय अशी हकीकत दिलेली आहे; व अतिशय प्रख्यात जर्मनकवि,

शिलर, यानें या विषयावर एक अतिशय उत्तम वीररसप्रधान नाटक लिहून बुइल्यम टेलची कीर्ति आणि स्वित्झर्लंडची स्वतंत्रता तिकडील लोकांमध्यें अजरामर करून ठेविली आहे. तसेंच इंग्रजी भाषेमध्यें शेरिडन नाउलेस यानेंही एका नाटकाला हाच विषय घेतला आहे. या पुस्तकांतून त्या वेळच्या स्थितीचें, गांजलेल्या लोकांच्या विचारांचें, आणि स्वतंत्रतेबद्दलच्या उत्सुकतेचें जसें वर्णन आहे, तसें तें दुसरीकडे कोठेंही आढळणार नाहीं. म्हणून पुढील कथाभाग त्याच पुस्तकांच्या अनुषंगानें दिला आहे. बुइल्यम टेलची गोष्ट खरी असो किंवा खोटी असो, त्याच्याशीं आपल्याला फारसें कर्तव्य नाहीं. खोट्या गोष्टींपासून देखील जर मनावर चांगला बोध होत असेल, तर त्यांचें अध्ययन करण्याला काय हरकत आहे? पंचतंत्रांतील किंवा इसापनीतींतील गोष्टी खऱ्या आहेत म्हणून लोक त्या वाचतात असें नाहीं. शिवाय ज्या गोष्टीनें युरोपखंडांतील सर्व लोकांना स्वातंत्र्याची किंमत शिकविली आहे आणि जिचें कथन अद्यापिहि तिकडील लोकांच्या बाहूंमध्यें स्फुरण उत्पन्न करीत आहे, अशी ही गोष्ट हिंदुस्थानांतील आमच्याही देशबांधवांना जरूर माहीत असली पाहिजे.

बुइल्यम टेलचा मुख्य धंदा म्हटला म्हणजे शिकारीचा होता व त्यासाठीं त्याला नेहमीं भयंकर अरण्यांतील उंच शिखरांवरून, खोल दऱ्यांतून आणि तुटलेल्या कड्यांवरून फिरावें लागत असे. या प्रसंगीं आल्प्स पर्वताच्या दिव्य शोभा सहजगत्या त्याच्या अंतःकरणामध्यें प्रविष्ट झाल्यामुळें त्यांचें मन उदात्त झालेलें होतें. तो जेथें रहात असे, व ज्या प्रदेशांत शिकारीकरितां तो हिंडत असे, तेथील सृष्टिरचना व वनश्री फार विलक्षण होती. आल्प्स पर्वताचीं अतिशय वरचीं शिखरें नेहमीं बर्फानें आच्छादिलेलीं असत, आणि त्याच्या खोल खोल दऱ्या धुक्यानें व्यापून गेलेल्या असत. परंतु मधून जें पठार होतें, त्या ठिकाणीं वरून वहात येणाऱ्या पाण्याच्या योगानें जीं सुंदर सरोवरें बनलेलीं होतीं, त्यांच्या आसपास बरीच वस्ती होती. तेथील कुरणांतून आपल्या गाईंना चरत

सोडून त्यांचे गुराखी त्या तळ्यांच्या कांठीं आपलीं सुस्वर आणि मंजूळ अलगुजें वाजवीत विश्रांति घेत गवतावर पडत असत. त्या गाईंच्या गळ्यांतील घंटांचे आवाज दुरून हळूहळू ऐकूं येत असल्यामुळें अगदीं निर्धास्त असत. तीं गुरें त्या तळ्यावर पाणी प्यावयाला आलीं म्हणजेही त्यांची फार शोभा दिसत असे. शेजारच्या डोंगरांतून गवळणी दुधाचीं भांडीं आपल्या डोक्यावर घेऊन खालीं उतरत असत, आणि तुटलेल्या कड्यावर दोरखंडाच्या शिड्या लावून शेतकरी लोक मोठमोठीं ओझीं घेऊन वर चढत असत. एका कड्यावरून दुसऱ्या कड्यावर जाण्याला कोठें कोठें लांकडी पूल केलेले असत. त्यांवरून जातांना माणसांचे डोळे फिरून जावयाचे. तरी पण ते शेतकरी तेथूनही निर्धास्तपणें जात असत. असल्या जागेंत फिरून अतिशय उंच अशा आल्प्स पर्वतापेक्षांही उंच आकाशामध्यें घिरट्या घालणाऱ्या पक्ष्यांची शिकार करणाऱ्या लोकांच्या अंगामध्यें धाडस आणि स्वतंत्रतेची प्रीति हे गुण अवश्य उत्पन्न झालेच पाहिजेत. अशा परिस्थितींत वाढलेल्या वुइल्यम टेलच्या मनामध्यें स्वदेशभक्ति आणि स्वातंत्र्यप्रीति हीं अतिरेकाला जाऊन पोहोंचलेलीं असलीं तर त्यांत कांहीं मोठेंसें आश्चर्य आहे असें नाहीं. वुइल्यम टेलला आपला देश गुलामगिरींत सांपडलेला पाहून अतिशय वाईट वाटत असे. एकदां डोंगरांत शिकारीसाठीं फिरत असतां एक पक्षी आकाशांत उंच फिरतांना त्यानें पाहिला व त्याला बाण मारून खालीं पाडावें, असें त्याच्या मनांत आलें. परंतु इतक्यांत त्याला आपल्या गेलेल्या स्वातंत्र्याची आठवण होऊन त्यानें धनुष्याचा बाण काढून परत भात्यांत ठेविला. तो म्हणाला, "हा पक्षी स्वतंत्रतेनें आकाशांत फिरत आहे. त्याची स्वतंत्रता मी कशाला नष्ट करूं? आम्हांला स्वतंत्रता असती तर आम्हीही ह्याच्यासारखा स्वैर रीतीनें संचार केला असता. पण आमच्या कपाळीं तें सुख नाहीं. तें सुख हा पक्षी भोगीत आहे. तें मी त्याच्यापासून कधींही नष्ट करणार नाहीं." दुसऱ्याचें स्वातंत्र्य पाहून तो अशा रीतीनें हळहळत असे. डोंगरांतील गरीब लोकांपाशीं संपत्ति वगैरे

कांहीं एक नसते, असें असतां जुलमी राजे त्यांना विनाकारण कां छळतात, असा एकदां प्रश्न निघाला असतां त्याच्यावर वुइल्यम टेल असें म्हणाला कीं, " आपल्यापाशीं संपत्ति नाहीं असें कोण म्हणेल ? स्वतंत्रता ही आपली संपत्ति आहे. या स्वतंत्रतेच्या रत्नासारखें रत्न कोणत्याही खाणीमध्यें आजपर्यंत सांपडलें नाहीं, आणि याच्यासारखें पाणीदार मोती कोणत्याही समुद्रांत यापुढें तयार होणार नाहीं. जुलमी राजे याच संपत्तीला लुटून नेण्यासाठीं धडपडत असतात. हा गरीब लोकांचा खजिना हस्तगत करण्याकरितां जुलमी राजे आपले खजिने खर्च करितात, रात्रीची झोंप नाहींशी करून घेतात, हजारों लोकांच्या खुनांच्या पातकाचें ओझें आपल्या डोक्यावर वाहण्यास तयार होतात, आणि नरकलोकाची वाट जवळ करतात. परंतु इतकें करूनही त्यांना स्वतःला अखेरीस सुख नाहीं तें नाहींच. असल्या राजांची जुलमी राजे म्हणून अपकीर्ति होते आणि स्वतंत्र लोक मात्र आपल्या स्वतंत्रतेला मुकतात. " वुइल्यम टेल हा रानांत फिरत असतां पुष्कळ वेळां वादळामध्यें सांपडत असे. हा प्रसंग फार कठीण असतो. बर्फावरून चालत असतां एखादे वेळीं त्याचें कवच पातळ असलें तर तें फुटून त्याच्या खालील पाण्यांत मनुष्य बुडून जाण्याचा संभव असतो किंवा पर्वताच्या शिखरावरून बर्फाचे डोंगर खालीं कोसळत असतात, त्यांत कोणी सांपडला तर त्यांतूनही जिवंत निघण्याची आशा नसते. तसेंच वारा अतिशय जोरानें सुटलेला असल्यामुळें मनुष्यसुद्धां उडून जाण्याची भीति असते. अशा एका भयंकर वादळांत वुइल्यम टेल एकदां सांपडला असतां त्याच्या मनांत असा विचार आला कीं, अशा वादळाच्या देशांत राहण्यापेक्षां आपण दुसऱ्या एखाद्या देशांत रहावयाला गेलों तर काय वाईट ? परंतु हा विचार फार वेळ टिकला नाहीं. तो म्हणाला, " स्वित्झर्लंड हा माझा देश आहे तो कसाही असला तरी तो मला प्रिय आहे. माझे पूर्वज जेथें गेले आणि मी जेथें जन्मास आलों, तो देश मी कधींही सोडणार नाहीं. हल्लीं जरी याला गुलामगिरी प्राप्त झाली आहे, तरी याची स्वतंत्रता आम्ही मिळवूं. हा डोंगरी देश म्हणजे स्वतंत्रतेचा देश आहे. हा माझा देश आहे.

वाऱ्यांना, तुम्ही वाटेल तितक्या जोरानें वहा. हा देश मी कधींही सोडणार नाहीं." स्वतंत्रतेचा प्रख्यात कवि जो शिलर त्यानें वुइल्यम टेल आणि त्याचा मुलगा यांचा ह्याच स्वदेशप्रीतीबद्दल एक तुलनात्मक संवाद दिला आहे, तो फार मनोवेधक आहे.

मुलगाः—बाबा, या अडचणीच्या डोंगराळ जागेंत राहण्यापेक्षां खालच्या मैदानांत आपण कां रहात नाहीं?

बापः—ते देश फार चांगले आहेत खरे. पण तेथें एक वाईट आहे· तेथील शेतें जे लोक नांगरतात त्यांना त्या शेतांतील धान्य खावयास मिळत नाहीं.

मुलगाः—कां? ते स्वतंत्र नाहींत?

बापः—नाहींत. तेथील सगळी जमीन राजांनीं आपल्या ताब्यांत घेतली आहे.

मुलगाः—पण निदान जंगलांत शिकार करण्याला तर कोणाची भीति नाहीं?

बापः—छे! छे! जंगलांत देखील राजांची बंदी असते.

मुलगाः—बरें, नद्या आणि समुद्र यांतील मासे मारून खाण्याला तर कोणी बंदी करीत नाहीं?

बापः—हं! राजांनीं मासे मारण्यालाही बंदी ठेविली आहे आणि समुद्राच्या खाऱ्या पाण्यालासुद्धां मिठासाठीं अटकाव आहे.

मुलगाः—असे हे लोकांना जेथें तेथें बंदी करणारे राजे असतात तरी कोण?

बापः—लोकांच्या संरक्षणासाठीं म्हणून यांनीं आपल्यापाशीं मोठमोठीं सैन्यें ठेवलेलीं असतात. आणि त्या सैन्याच्या जोरावर ते लोकांना जेथें तेथें अशी बंदी करीत असतात.

मुलगा:—मग लोक आपणच आपलें संरक्षण कां करून घेत नाहींत?

बाप:—त्यांचा एकमेकांवर विश्वास नसतो म्हणून!

मुलगा:—बाबा, तर मग असल्या ठिकाणीं राहण्यापेक्षां आपल्या या डोंगरांत राहणेंच फार चांगलें. असल्या राजांसारख्या नीच मनुष्यांपासून आपलें संरक्षण करून घेण्यापेक्षां ह्या डोंगरावरील वादळांनीं एखाद्या दिवशीं आपल्याला मारलें तरीही तें कांहीं वाईट नाहीं. कारण, यांत स्वतंत्रता आहे!

याप्रमाणें वुइल्यम टेल आणि त्याचा मुलगा यांचीं स्वतंत्रतेविषयींचीं भाषणें चालत असत. तो आपल्या मुलाच्या लहान लहान चिमुकल्या हातांकडे पाहून आपल्या मनांत असें म्हणत असे कीं, “हे हात लहान आहेत पण कांहीं दिवसांनीं हे मोठे झाले म्हणजे आपल्या देशावर जुलूम करणाऱ्या राजांना हे हात त्यांच्या सिंहासनांवरून खालीं ओढतील आणि आपल्या देशबांधवांच्या पायामध्यें ज्या गुलामगिरीच्या शृंखला आहेत, त्या तोडून टाकण्याचें सामर्थ्य कांहीं दिवसांनीं परमेश्वर या हातांमध्यें उत्पन्न करतील!” आणि आपला मुलगा स्वदेशाच्या, स्वतंत्रतेच्या उपयोगी पडावा अशाच रीतीनें तो त्याला शिक्षणही देत असे. पहाटेस उठून शिकारीला जाणें, डोंगरांत फिरणें, आपले धनुष्यबाण तयार करणें, अचुक नेम मारणें, वगैरे गोष्टी तो आपल्या मुलाकडून मुद्दाम करवून घेत असे व नेम मारण्याचें शिक्षण देत असतां एकीकडे तो आपल्या मुलाच्या मनामध्यें तेथील जुलमी अधिकारी जो जेसलर त्याच्याबद्दल मोठ्या युक्तीनें द्वेष उत्पन्न करीत असे. ज्या एखाद्या पदार्थावर नेम धरावयाचा त्याला तो जेसलर असं नांव देई, व आपल्या मुलाला सांगे कीं, “हा प्रत्यक्ष जेसलर तुझ्या पुढें उभा आहे अशी कल्पना कर, आणि आपल्या देशाच्या स्वतंत्रतेसाठीं बरोबर याच्यावर नेम मार पाहूं! एका बाणांत या जुलमी जेसलरची छाती फुटून गेली पाहिजे.” असल्या वाक्यांनीं टेल आपल्या मुलाचा जुलमाविषयींचा क्षोभ उत्तेजित करीत असे. परंतु हा जेसलरचा

जुलूम फक्त टेललाच असह्य झाला होता असें नाहीं. सर्व लोक त्याच्या जुलमानें सारखेच त्रस्त होऊन गेलेले होते. जेसलरच्या जुलमापुढें पर्वताचा कडा कोसळणें, बर्फाचा लोट खालीं येणें, वगैरे गोष्टींचें सुद्धां लोकांना कांहीं वाटत नसे. अरण्यांत एखादा हिंस्र पशु त्यांच्या अंगावर धांवून आला, तर हा जेसलर नाहीं—हा हिंस्र पशु आहे—हा कदाचित् दया करील—अशा हेतूनें लोकांना समाधान वाटत असे. इतर ठिकाणच्या प्रमाणें त्या ठिकाणच्याही शेतांत पीक येत असे, झाडांना फळें येत, आणि वेली पुष्पांनीं सुशोभित होत. परंतु लोकांना त्यांपासून तिळमात्रही आनंद होत नसे. कारण, हें सगळें परकीय अधिकारी लुटून नेणार हें त्यांना पक्कें माहीत होतें. गुरांचे आणि बकऱ्यांचे कळप डोंगरांतील चरण्यानें चांगले पुष्ट होत, परंतु हे परकीय अधिकाऱ्यांच्या भक्ष्यस्थानीं पडणार ही कल्पना त्यांच्या मनांत उभी राहिली म्हणजे त्यांना अतिशय दुःख होत असे. लहान लहान सुंदर मुलें असलीं तरी त्यांना आलिंगन द्यावें असें आई-बापांच्या मनांत येत नसे. हीं गुलामगिरीच्या दोषानें दूषित झालीं आहेत असें पाहून त्यांच्या डोळयांतून टिपें गळत. लोकांना क्षुल्लक कारणासाठीं अतिशय जुलूम सोसावा लागत असे. जेथें कोणाला जातांही यावयाचें नाहीं अशा कठीण कड्यांतील जमिनीवरसुद्धां जुलमी कर बसविलेले होते. अशा एका ठिकाणचें एका शेतकऱ्यानें गवत कापण्याचा गुन्हा केला. ही जागा एका कड्याच्या अगदीं टोंकावर होती. गुरेंसुद्धां जाऊन तेथील गवत खाण्याला धजत नसत. तें गवत आपल्या पोटाची खांच भरण्या-करतां कापल्याबद्दल त्या शेतकऱ्याला किती तरी दिवस तुरुंगांत अडकून पडावें लागलें होतें. अखेरीस उपाशी मरत चाललेलीं आपलीं मुलें घेऊन त्याची बायको एक दिवस जेसलरची वाट अडवून उभी राहिली. तिनें आपलीं मुलें त्याच्या वाटेंत आडवीं टाकलीं, आणि त्यांनाही तुडवून जाण्याला तो निर्दय तयार झाला, तेव्हां तिनें त्याच्या घोड्याचा लगाम धरला. तरी त्याला दया आली नाहीं. जेसलरनें आपल्याकरतां किल्ला

बांधण्याचें काम सुरू केलें होतें, तेथेंही रोज लोकांवर असेच जुलूम चालले होते. शिलरनें या प्रसंगाचें जें वर्णन केलें आहे, त्यावरून जुलमी राजांच्या सुंदर इमारती बांधल्या जात असतांना गरीब लोकांचीं हाडें किती खिळखिळीं होतात, याची चांगली कल्पना येते. तो किल्ला बांधित असतांना हा आपणच आपल्याकरतां तुरुंग बांधीत आहों, असें त्या लोकांना समजत होतें. तरी पण निरुपायास्तव आपल्या स्वतंत्रतेचें तें थडगें उभारण्याला हजारों लोक जेसलरच्या हुकमानें रात्रंदिवस खपत होते. त्यांत कित्येक दमून बसले असतां मुकादमांच्या हातच्या छड्यांचा मार खात होते व कित्येक पराची-वरून खालीं पडून प्राणालाही मुकत होते. इतके जुलूम झाल्यानंतर कोणाला संताप येणार नाहीं? सर्वांनीं असल्या जुलमी अधिकाऱ्याला घालवून लावून आपली स्वतंत्रता परत मिळविण्याचा निश्चय केला. वृद्ध लोक मरणाच्या वेळीं अंथरुणावरून आपल्या मुलांना असा उपदेश करूं लागले कीं, तुम्ही सर्व एक व्हा आणि आपला देश स्वतंत्र करा! व आपला देश स्वतंत्र झाल्याशिवाय मेलेल्या लोकांना मूठमातीसुद्धां द्यावयाची नाहीं, असा तरुणांनीं निग्रह केला. तसेंच जे तरुण लोक आपल्या देशाच्या स्वतंत्रतेच्या कामीं साहय्य करतील त्यांनाच फक्त आपण वरावयाचें, असा तरुण कुमारिकांच्या प्रेमवृत्तीचा ओघ वळला. स्त्रियांनाही स्वतंत्रतेच्या स्फूर्तीनें धैर्य आलें आणि त्या आपल्या नवऱ्यांना गुप्त कट आणि लढाई यांबद्दल सल्ला देऊं लागल्या. शिलरनें अशा एका प्रसंगाचें फार उत्तम वर्णन केलें आहे. स्टाफॉचर या नांवाच्या एका इसमाला त्याच्या बायकोनें गुप्त कट करून परशत्रूचें निवारण करण्याविषयींची युक्ति सुचविली. त्या वेळचें त्या उभयतांचें भाषण फार मनोरंजक आहे:—

बायको:—शत्रूची एवढी भीति कशाला पाहिजे? ते पुरुष आहेत तसे तुम्हीही पुरुष आहां आणि त्यांच्याप्रमाणें तुम्हांलाही आपलीं शस्त्रें उगारतां

येतात ! प्रयत्न तर करून पहा ! जिकडे न्याय आहे, त्या पक्षाला परमेश्वर यश देतो.

नवराः—लढाईपासून किती नुकसान होतें, याची तुला कल्पना नाहीं, म्हणून तूं मला हा मार्ग सुचवीत आहेस.

बायकोः—नुकसान किंवा नफा यांपैकीं परमेश्वराच्या मनांतून जें कांहीं करावयाचें असेल तें सोसण्याला मनुष्यानें तयार असलें पाहिजे. पण लोकांचे अन्याय विनाकारण सहन करीत बसण्याची आपल्या मनाला संवय लागलेली चांगली नाहीं.

नवराः—पण हें जें आपलें घर तुला इतकें आनंद देत आहे, तें कदाचित् लढाई सुरू झाली तर जळून खाक होईल.

बायकोः—माझी जरी असल्या ह्या ऐहिक क्षणभंगुर वस्तूंवर प्रीति असली, तरी आपल्या देशाच्या स्वतंत्रतेसाठीं जरूर असेल तर मी आपल्या हातानें या घराला पहिल्यानें आग लावून देईन !

नवराः—या निर्जीव वस्तूंचा त्याग करण्याला तूं कदाचित् तयार होशील, पण पाळण्यांत जीं लहान मुलें खेळत आणि बागडत असतात, तींसुद्धां त्या निष्ठुर लढाईला बळी पडतात.

बायकोः—तुम्ही हें नेहमीं लक्षांत ठेवा कीं, जे अनाथ आणि निरुपद्रवी प्राणी आहेत, त्यांचें परमेश्वर संरक्षण करीत असतो. पण तुम्हांला मागची मुलाबाळांची काळजी नको. तुम्ही पुढें पाऊल टाकून शत्रूवर चला म्हणजे झालें.

नवराः—आमचें काय ? आमचें ठीकच आहे. आम्ही समरांगणांत जाऊं आणि शत्रूशीं लढून मरूं. परंतु आमच्या मागें तुमच्यासारख्या स्त्रियांची काय वाट ?

बायको:—आमच्यासारख्या अबलांनाही देवानें स्वसंरक्षणाचा मार्ग मोकळा ठेवला आहे. एखाद्या कडच्यावर जाऊन तेथून खालीं उडी टाकली म्हणजे झालें !

हें आपल्या बायकोचें भाषण ऐकून स्टाफॉचर याला अतिशय आनंद झाला. व तिला आलिंगन देऊन तो म्हणाला, “ज्या लोकांना अशा शूर, स्वदेशाभिमानी आणि स्वातंत्र्यलोलुप स्त्रिया मिळाल्या आहेत, ते आपल्या देशाकरतां मोठ्या आनंदानें लढण्याला तयार होतील. आणि त्यांच्याविरुद्ध कितीही मोठें सैन्य आलें, तरी ते त्याचा तेव्हांच फडशा पाडून टाकतील !” अशा रीतीनें लोकांची चित्तवृत्ति बदलत चालली होती. जेसलरच्या जुलमाखालीं कोणालाही घरादाराची शाश्वती उरली नव्हती. सत्याचें तोंड बंद झालें होतें, शहाणपणाचे डोळे फुटून गेले होते, आणि पराक्रमाच्या हातापायामध्यें शृंखला अडकविण्यांत आल्या होत्या. अशा स्थितींत लोकांना जिवंत राहाणेंच अशक्य झालें होतें. आणि स्वित्झर्लंडमध्यें लांडगे, वाघ आणि जुलमी अधिकारी यांनींच फक्त रहावें अशी अवस्था येऊन पोहोंचली होती. तरी पण जेसलरचा जुलूम मर्यादेपलीकडे जाईपर्यंत आपण वाट पहावी, असें कित्येकांचें म्हणणें होतेंच ! परंतु याविरुद्ध जे कित्येक लोक होते त्यांचें असें म्हणणें पडलें कीं, “आणखी वाट किती पहावयाची ? आतां मर्यादेचें उल्लंघन काय व्हावयाचें उरलें आहे ? कोणता जुलूम आपल्यावर आतांपर्यंत झालेला नाहीं ? माणसांच्या डोळ्यांतील बुबुळें देखील सुरक्षित नाहींत ! ( जेसलरनें खरोखरच एकाचे डोळे बाहेर काढले होते. ) आपण आणखी किती जुलूम सहन करणार ? गरीब बिचारें हरिण देखील फार पाठलाग केला म्हणजे उलटून शिंगें उगारून अंगावर धांवतें. बैल नेहमीं मनुष्याच्या जोखडाखालीं आपली मान नम्रपणानें घालूं देतो. पण तोसुद्धां एखाद्या वेळीं रागावला म्हणजे बेधडक आपल्या धन्याच्या अंगावर चवताळून जातो. मग आपण तर मनुष्य आहों. आपलें संरक्षण आपल्याला करतां यावयाचें नाहीं ? मग आपण ही तीर मारण्याची विद्या कशाला शिकलों ?

आणि हें कुऱ्हाडीचें ओझें आपण आपल्या खांद्यावर कशाला वाहत आहों ?" अशा प्रकारचे विचार लोकांत फैलावत जाऊन अखेरीस कटवाल्या मंडळीची गुप्त सभा अरण्यांत एके ठिकाणीं भरली. जे देशांतील खरे रहिवासी त्यांना चोराप्रमाणें लपून छपून देशहिताच्या विचारासाठीं जाण्याची पाळी आली. थंडीचें निवारण करण्याकरतां त्यांच्या अंगावर वस्त्रें नसल्याकारणानें त्यांनीं मध्यभागीं लांकडें पेटवून विस्तव केला. कोणी कड्यावरून दोरीला धरीत धरीत खालीं उतरले, कोणी दरींतून हळूहळू वर आले, आणि कोणी सरोवरांच्या पलीकडून होडींत बसून आले. सर्व जण जमल्यानंतर काय करावें याच्याबद्दल बराच वेळ विचार झाला. हा विचार चालतां चालतां अखेरीस सूर्योदय झाला. तेव्हां त्या उगवणाऱ्या सूर्याला साक्षी ठेवून सर्वांनीं आपले हात वर उभारून अशी शपथ वाहिली कीं, आपण स्वदेशाच्या स्वतंत्रतेसाठीं नेहमीं सख्या भावाप्रमाणें वागूं, आणि गुलामगिरींत जिवंत राहण्यापेक्षां मरण जास्त चांगलें असल्यामुळें परमेश्वरावर विश्वास ठेवून आपण आपल्या पूर्वजांप्रमाणें स्वतंत्र होऊं. अशी शपथ वाहून त्यांनीं एकमेकांना आलिंगन दिलें. व जेसलरवर सूड उगाविण्याच्या उद्योगाला सर्व जण लागले.

इकडे पूर्वींच्या जुलमांनीं तृप्त न होऊन जेसलरनें एका काठीवर टोपी घालून ती चवाठ्यावर उभी करून ठेवली व तिच्यापुढें गुडघे टेकून मुजरा केला पाहिजे, अशी दवंडी पिटविली. परंतु त्या टोपीबद्दल आदर दाखविण्याच्या ऐवजीं लोक त्या वेडगळ कृत्याची थट्टाच करूं लागले. तें अतिशय चवाठ्याची जागा होती, तरीपण ही दवंडी पिटविल्यापासून तेथें एक सुद्धां मनुष्य येईनासा झाला, इतकी लोकांच्या मनांत जेसलरबद्दल राजनिष्ठा वास करीत होती ! या चवाठ्यावरून जवळची वाट असली तरी लोक मुद्दाम दोन दोन कोसांचा हिसका घेत; पण त्या टोपीजवळ जाण्याचें टाळीत. आणि गांवांतील चटोर पोरें तर तेथें येऊन आपल्या डोकीवरच्या टोप्या उंच फेंकून तेथील रखवालदार शिपायांना त्रास देऊं

लागलीं व बादशहाच्या टोपीवर खडे मारून तीं पाडण्यापर्यंतही मजल आली. रखवालदार शिपायांना त्या रिकाम्या टोपीजवळ रखवाली करीत बसण्याची लाज वाटूं लागली, आणि आपल्या या मूर्खपणाबद्दल त्यांनाही हसूं येऊं लागलें. पुढें पुढें कोणी जवळून गेला आणि त्यानें मुजरा केला नाहीं, तरी त्याच्याकडे आपण पाहिलेंच नाहीं, असा ते कानाडोळा करूं लागले. कोणी दूर उभे राहून त्या टोपीकडे बोट दाखवीत व दुसऱ्यांना म्हणत कीं, तो पहा तेथें आपला जुलमी अधिकारी टांगला आहे. अशी बहुतेकांनीं त्या टोपीची टर मांडली होती. तरी त्या टोपीपुढें राजनिष्ठपणानें मुजरा करणारेही कित्येक मूर्ख लोक निघाले. त्यांना पाहून वुइल्यम टेलच्या अंगाचा अतिशय संताप झाला. तो म्हणाला : "असल्या माणसांपेक्षां पशूदेखील फार बरे. कारण, त्यांना जितक्या नीच योनींत घातलें आहे त्याच्यापेक्षां जास्त नीचपणाला ते जात नाहींत. कुत्रा हा नेहमीं कुत्राच राहतो. आणि सरपटणारा एखादा किडसुद्धां आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या जातीचें लांच्छनास्पद कृत्य करीत नाहीं. परंतु मनुष्यप्राणी हा आपल्याला त्यांच्यापक्षां श्रेष्ठ म्हणवीत असून नीचपणांत त्यांच्यापेक्षांही खालीं उतरतो." असे उद्गार काढून वुइल्यम टेल त्या टोपीजवळ गेला. तो आवेशानें येत असलेला पाहून तेथील सर्व सरकारी अधिकारी पळून गेले. त्यानंतर वुइल्यम टेल तेथें जमलेल्या आपल्या देशबंधूंकडे वळून त्यांना म्हणाला : "माझ्या देशबंधूंनो, पहा, तुम्ही कशाला भीत होतां? यांना? या पळपुट्यांना? या माणसांच्या बाह्य आकृतींना? आणि या शिपायांच्या सोंगांना? तुम्ही असे आश्चर्यचकित होऊन काय बसलां आहां? तुम्हांला यांचेंच एवढें आश्चर्य काय वाटत आहे? हे ज्या गोष्टी करीत आहेत त्या तुम्ही मनांत आणलें तर तुम्हांलाही करतां येतील. तुम्ही मनुष्यच आहां! तुम्हालाही विचार करण्याला डोकें आहे, आणि कृत्यें करण्याला हात आहेत. तुम्ही रानांतल्या एखाद्या पशूची किंवा पक्ष्याची शिकार करावयाला गेलां तर परमेश्वरानें दिलेली स्वतंत्रता राखण्याकरतां

तोदेखील प्रयत्न करतो; आणि तुम्हांला त्या पक्ष्यापेक्षां आपल्या स्वतंत्रतेचें जास्त ज्ञान असून तुम्ही या गुलामगिरींमध्यें संतोष मानून राहतां ? तुम्ही असे बावळ्यासारखे बघत काय उभे राहतां ? या टोपीची तुम्हांला भीति वाटते? हिच्यांत काय आहे! ही पहा, मी काठी खालीं पाडून ही जेसलरची टोपी आपल्या पायाखालीं तुडवितों!" असें म्हणून त्यानें त्याप्रमाणें केलें. इतक्यांत पळून गेलेले अधिकारी जास्त मदत घेऊन तेथें आले व त्यांनीं वुइल्यम टेलला व त्याच्या मुलाला कैद केलें. इतक्यांत जेसलरही तेथें आला आणि त्यानें वुइल्यम टेलनें आपल्या मुलाच्या डोक्यावरील नारिंगाला नेम मारावा अशी कपटाची तोड काढली. वुइल्यम टेलनें पुष्कळ आढेवेढे घेतले परंतु कांहीं उपाय चालेना. वुइल्यम टेल जरी नको म्हणत होता तरी आपल्या बापाचा किती अचूक नेम असतो याची खात्री असल्यामुळें त्याचा मुलगा बापाला आग्रहच करीत होता. शंभर पावलांवरून नेम मारण्याचा हुकूम झाला होता. त्याप्रमाणें मुलगा शंभर पावलांवर जाऊन बसला. आणि एक फळ त्याच्या डोक्यावर ठेवण्यांत आलें. इकडे वुइल्यम टेलही दोन बाण घेऊन त्यांपैकीं एक आपल्या वस्त्राखालीं झांकून ठेवून आपल्या मुलाच्या मस्तकावरील फळाला नेम मारण्याकरतां आपली दृष्टि कायम करूं लागला. यांची अशी तयारी चालली असतां सभोंवतालीं जमलेले लोक अतिशय क्षुब्ध होऊन गेले. बापाच्या बाणानें मुलाचें मस्तक फुटणार असें पाहून कित्येक बायका बेशुद्ध पडल्या आणि कांहीं पुरुष भीतीनें ओरडूं लागले. तरीही जेसलरच्या हृदयाला द्रव आला नाहीं. पण ईश्वराच्या कृपेनें वुइल्यम टेलचा बाण इतका बरोबर गेला कीं, मुलाच्या केसालाही धक्का न लागतां वरील फळाचे मात्र दोन तुकडे झाले. हें कौशल्य पाहून सर्वांना मोठा आनंद झाला. व मुलगा बापाला येऊन कडकडून भेटला. परंतु जेसलरला मात्र या गोष्टीबद्दल मुळींच समाधान वाटलें नाहीं. त्यानें वुइल्यम टेलला विचारलें कीं, "तूं दुसरा बाण घेतला होतास तो कशासाठीं?" यावर टेलनें असें उत्तर

दिलें कीं, " माझा जर पहिला नेम चुकला, तर दुसरा बाण तुझ्या छातींत मारण्याकरतां मी घेतला होता. " हें उत्तर ऐकून जेसलरचा क्रोध फिरून खवळला व त्यानें त्याला एका अंधारकोठडींत कोंडून ठेवण्याचा हुकूम केला. ज्या किल्ल्यांत त्याला अटकेंत ठेवावयाचें होतें तो तेथील सरोवराच्या पलीकडे होता. सबब त्याला आपल्या नावेंत घेऊन पलीकडे नेऊन स्वतःच किल्ल्यांत कोंडून ठेवण्याला जेसलर तयार झाला व त्याप्रमाणें ते नावेंत बसून निघाले. इतक्यांत भयंकर वादळ होऊन नाव खात्रीनें बुडते अशी स्थिति येऊन पोहोंचली. पण वुइल्यम टेल हा जसा तीर मारण्याच्या कामांत तसाच सुकाणू धरण्याच्या कामांतही फार वाकबगार होता; म्हणून त्याच्या हातापायांतील बिड्या काढून त्याला सुकाणूवर बसविण्यांत आलें, व तूं सगळ्यांना सुरक्षित नेशील तर तुला मुक्त करूं असें जेसलरनें त्याला वचन दिलें. वुइल्यम टेलनें वादळांतून ती नाव सुरक्षित आणिली. परंतु एके ठिकाणीं खडकाचें टोंक पुढें आलेलें होतें, तेथें नावेला पायानें हिसका देऊन व ती पाण्यांत दूर ढकलून वुइल्यम टेलनें किनाऱ्यावर उडी टाकली, व तो जंगलांत नाहींसा झाला. नावेंतील बाकीचे सर्व लोक आश्चर्यानें चकित झाले व निरुपाय होऊन आपल्या किल्ल्याकडे जाऊं लागले. या किल्ल्याला जावयाच्या वाटेंत एक भयंकर खिंड होती. दोन्ही बाजूंनीं कडे तुटलेले होते, व झाडी दाट होती. या अरुंद वाटेंतून नुकतीच एका लग्नाची वऱ्हाडी मंडळी तासेवाजंत्रीं वाजवीत पुढें चालली असल्यामुळें तो रस्ता बहुतेक अडून गेला होता इतक्यांत जेसलरची स्वारी लव्याजम्यासुद्धां तेथें येऊन पोहोंचली. पुढें वाट करण्याकरतां कोणी प्रयत्न करीत आहेत, इतक्यांत एक अचुक बाण लागून त्याच्या वेदनेनें जेसलर आपल्या घोड्यावरून मरून खालीं पडला. तेव्हां त्याच्या लव्याजम्याच्या मंडळींत एकच गहजब उडून गेला, आणि हें कृत्य कोणी केलें हें कोणालाच कळेना. सभोंवतीं पुष्कळ मंडळी जमली, पण जेसलर मेला ही बातमी ऐकून सर्वांना आनंदच झाला. त्याच्यासाठीं कोणीही

रडेना. जो तो बरें झालें असें म्हणूं लागला. त्याच्या छातींत लागलेला बाण उपटून काढण्यालाही कोणी मदत करीना; आणि हा एवढा मोठा अधिकारी मेला तरी पुढें जीं लग्नाचीं वाद्यें वाजत होतीं तींसुद्धां कोणी बंद करीतना. जुलमी राजा मेला म्हणजे लोकांना लग्नाप्रमाणें आनंद होतो असें दाखविण्याकरतांच कीं काय कोण जाणे, तीं वाद्यें वाजत राहिलीं होतीं. त्या वेळीं सर्वांना अतिशय आनंद झाला, परंतु या आनंदाला कारण कोण हें मात्र कोणालाच कळेना. इतक्यांत एका उंच खडकावरून गंभीर शब्दानें वुइल्यम टेल जेसलरला उद्देशून म्हणाला : “ जेसलर, हा माझा बाण आहे ! आजपासून तुझ्या जुलमांतून आमचा देश स्वतंत्र झाला ! ”

**अभ्यास** :—

*( १ ) फ्रान्स आणि रशिआ या देशांतल्या राज्यक्रांत्यांची स्थूल माहिती मिळवून ‘क्षुब्ध झालेल्या गुलामगिरीच्या तरवारींनीं अनेक जुलमी राजांचे गळे कापलेले आहेत.’ या शिवरामपंतांच्या वाक्याचें विवेचन करा.*

*( २ ) विल्यम टेलशीं ज्याची तुलना करतां येईल अशा भारताच्या आधुनिक इतिहासांतील एखाद्या स्वातंत्र्यवीराचें चरित्र चाळीस ओळींत लिहा.* उ: वासुदेव बळवंत फडके पुणे

*( ३ ) ‘खोट्या गोष्टींपासून देखील जर मनावर चांगला बोध होत असेल तर त्यांचें अध्ययन करण्याला काय हरकत आहे ?’ हें लेखकाचें म्हणणें तुम्हांला पटतें काय ?*

## एका खडी फोडणाराची गोष्ट ६

### परिचय —

शिवरामपंतांनीं सर्वसामान्य निबंधाची चाकोरी सोडून आपल्या कल्पना-शक्तीला नेहमीं स्वच्छंद भ्रमण करूं दिलें. त्यामुळें कधीं कधीं त्यांचे निबंध जसे लघुनिबंधाच्या वळणावर गेले आहेत तसें कांहीं कांहीं वेळां त्यांना जवळजवळ कथेचें स्वरूप आलें आहे. मात्र असले गोष्टीवजा लेख लिहितांना सुद्धां त्यांचें लक्ष कथेंतल्या पात्रांच्या स्वाभाविक चित्रणापेक्षां त्यांना जो अर्थ सूचित करायचा असे त्याच्यावरच केंद्रित होई. या गोष्टींत दुष्काळाच्या मगरमिठींत सांपड-लेल्या व शेतीवर पोट भरणें अशक्य झालेल्या एका शेतकरी कुटुंबाची कहाणी आहे असा आरंभीं भास होतो. भिन्न प्रकृतीच्या दुसऱ्या एखाद्या कथा-लेखका-च्या हातांत हें सूत्र असतें तर त्यानें करुणरसाच्या दृष्टीनें त्याचा परिपोष करून वाचकांच्या डोळ्यांत पाणी उभें केलें असतें. पण शिवरामपंतांनीं तेंच सूत्र हातीं घेऊन नेमका विरुद्ध परिणाम साधला आहे. वाचकांच्या डोळ्यांतून चीड आणि त्वेष यांच्या ठिणग्या बाहेर पडाव्यात, अशा बेतानें त्यांनीं त्याची रचना केली आहे. स्वत्व विसरणाऱ्या, गुलामागिरींत आनंद मानणाऱ्या, आणि आपल्या मानेवर जबरदस्तीनें जूं लादून पदोपदीं पाठीवर आसुडाचे फटके मारीत सुट-लेल्या जुलमी धन्याचे पाय चाटणाऱ्या जनावरवजा जीवांची जी एक जात असते, तिचा या गोष्टीच्या द्वारें त्यांनीं अत्यंत मर्मभेदक उपहास केला आहे.

दुष्काळांत माणसें उपाशी मरतात हें खरें; पण त्या मरणापेक्षांही शिवरामपंतांना अधिक दुःखाची गोष्ट वाटते ती त्यांचें जगणें-लाचार आणि लाजिरवाणें, कंगाल आणि केविलवाणें असें जगणें! अशा प्रकारच्या गुलामगिरीच्या जीवनांतील विद्रूपता त्यांनीं या गोष्टींत परिणामकारकतेनें चित्रित केली असून प्राण गेला तरी बेहत्तर; पण मनुष्यानें स्वातंत्र्याचा अभिमान सोडतां कामा नये हें आपलें आवडतें तत्त्व भयानक रसाचा आविष्कार करून वाचकांच्या गळीं उतरविलें आहे. कल्पकता व उपरोध या गुणांनींच त्यांच्या प्रतिभेची मूस ओतली गेली होती हें या गोष्टीवरून सहज दिसून येईल. 'आम्रवृक्ष', 'पोपट आणि परशुराम', 'सांपडलेलं संपुष्ट', इत्यादि लेखांतही त्यांनीं अशाच कथनपद्धतीचा अवलंब केला आहे. पण अशा प्रकारचा त्यांचा कुठलाही गोष्टीवजा लेख घेतला तरी त्यांत रूपकाच्या सहाय्यानें अथवा उपहासाच्या मदतीनें स्वातंत्र्याविषयींचें प्रेम आणि पारतंत्र्याविषयींची चीड, याच भावना तीव्रतेनें प्रतिबिंबित झालेल्या दिसतील.

'मदनदहना'सारख्या अशाच प्रकारच्या त्यांच्या कांहीं लेखांत मात्र त्यांची ही कट्टर प्रचारकाची भूमिका आढळत नाहीं. त्यामुळें त्यांतला कल्पना विलास अधिक कलात्मक व हृदयंगम झाला आहे. उलट 'आम्रवृक्ष' या गोष्टींत पोट भरण्याकरितां गिरणींत गेलेल्या एका शेतकऱ्याचें आपल्या खेडे-गांवांतल्या शेताच्या बांधावरील आंब्याच्या झाडावरलें प्रेम वर्णन करतां करतां ते आपण एका शेतकऱ्याच्या भावना चित्रित करीत आहेत, हें विसरून जातात आणि स्वतःच्या मनांत उसळणाऱ्या स्वातंत्र्याच्या ऊर्मी त्याच्या तोंडून व्यक्त करूं लागतात. तो शेतकरी प्रथमतः हिंवाळ्यांत आपल्या गांवीं येतो त्या वेळीं त्याचा आवडता आम्रवृक्ष अगदीं निष्पर्ण झालेला असतो. त्याच्या संवगड्याला त्याची दुर्दशा पहावत सुद्धां नाहीं. पुन्हां तीन महिन्यांनीं तो शेतकरी जेव्हां गांवीं परत येतो तेव्हां वसंतऋतूच्या आगमनामुळें तें आंब्याचें झाड मोहरून गेलेलें असतें. लगेच तो शेतकरी त्या आम्रवृक्षाला उद्देशून म्हणतो, 'हे आम्रवृक्षा, तुझा वसंतऋतु इतक्या लवकर आला, पण माझ्या देशाचा वसंतऋतु कधीं येणार? माझा देश जो चोहोंकडून करपला जात आहे त्याला तुझ्याप्रमाणें नवीन पालवी केव्हां फुटणार? माझ्या देशाच्या इतरांनीं तोडून नेलेल्या फांद्या नवीन पालवीनें केव्हां झांकून जातील? तुझ्याप्रमाणें माझ्या या हतभाग्य देशाला मोहर आणि फळें केव्हां येतील? तुझ्या या मोहराचा सुगंध जसा चोहोंकडे पसरला आहे,

तशी माझ्या देशाची कीर्ति कधीं पसरेल ? तुझ्या अंगावर खेळणारीं विषारी जनावरें आणि घुबडें गेलीं तशीं तीं माझ्या देशांतून जाऊन येथें आम्हांला पक्ष्यांचे सुस्वर ध्वनि ऐकण्याचे सुखाचे दिवस कधींतरी येतील काय ? हिंवाळ्याच्या मागून वसंतऋतु येतो हा नियम फक्त अरण्यांतील झाडांकरितांच आहे किंवा माझ्या सारख्यांच्या हतभाग्य देशांनाही तो लागू पडतो, हें तूं सांगूं शकशील काय ? सूर्य मावळला तर तो फिरून उगवतो. समुद्राला ओहोटी लागली तर त्याला फिरून भरती येते. चंद्राच्या कलांचा कृष्णपक्षांत क्षय झाला तरी फिरून शुक्लपक्षांत त्याची वृद्धि होते; पण माझ्या देशाचा सूर्योदय कधीं येईल ? त्याच्या वैभवाला ओहोटी रोजच लागलेली आहे. पण त्याला भरती कधीं येणार ? माझ्या देशांतील कलांचा कृष्णपक्ष आज कित्येक वर्षें चालला आहे, तो संपून त्याच्या शुक्लपक्षाला सुरवात कधीं होणार ? हे आम्रवृक्षा, तो आणि तूं समदुःखी होतां, त्या वेळेला तुम्ही एकाला दोघेजण असल्यामुळें माझें मन फारसें कष्टी झालेलें नव्हतें. पण आतां तूं टवटवीत झालेला पाहून तो असाच केव्हां होईल, ह्याबद्दल माझें मन फारच, फारच उतावीळ झालें आहे. पण माझ्या उतावीळपणापासून काय व्हायचें आहे ? परमेश्वराच्या मनांत जेव्हां येईल तेव्हांच या गोष्टी घडून येणार आहेत. तुझ्या पदरचें पाप संपलें, म्हणून तुझा हिंवाळा संपला व देवानें तुला वसंतऋतु दिला. आतां तूं ह्याचें नीट जतन कर व यापुढें तो हाडें पिळणारा, पानांतील रस शोषून नेणारा, आणि तुझ्या डोळ्यांतून टिपें पाडविणारा क्रूर हिंवाळा फिरून तुझ्यावर आपला अम्मल कधींही न बसवो ! '

या उद्गारांत काव्य निःसंशय आहे. देशाविषयीं तळमळणाऱ्या मनाचेंही त्यांत सुंदर प्रतिबिंब पडलें आहे. पण हें तळमळणारें मन १९०० सालच्या महाराष्ट्रीय शेतकऱ्याचें नसून शिवरामपंतांसारख्या ज्वलज्जहाल देशभक्ताचें आहे याची जाणीव वाचकाला पदोपदीं झाल्यावांचून रहात नाहीं. 'एका खडी फोडणाऱ्याच्या' गोष्टींतही शिवरामपंत असेच स्पष्ट दिसतात. त्यांच्या गोष्टींना गोष्टीवजा लेख म्हणायचे ते याच कारणासाठीं! कलात्मक कथेंत लेखकाचें अस्तित्व असें कधींच जाणवत नाहीं. मात्र कलेच्या निकषावर त्यांच्या अशा गोष्टी जरी विशेष उठून दिसत नसल्या, तरी त्या किती परिणामकारक होऊं शकतात हें प्रस्तुत गोष्टीवरून सहज दिसून येईल.

उत्तर हिंदुस्थानांत कांहीं दिवसांपूर्वीं कोणी एक गरीब शेतकरी राहात होता. त्याचा मूळचा धंदा शेतकीचाच. त्याचे आईबाप शेतकरी होते, व आपल्या मुलानें शेतकीचा धंदा करूनच आपला चरितार्थ चालवावा अशी आईबापांची इच्छा होती. परंतु त्यांच्या मुलाची भवितव्यता निराळीच असल्यामुळें तदनुसार त्याला लहानपणापासून बुद्धि होत गेली. तारुण्याच्या मदांत आल्याबरोबर त्यानें आपले वृद्ध आईबाप आणि सुपीक शेतवाडी सोडून दिली. आणि जवळच्या एका मोठ्या शहरांत जाऊन तेथें चाकरी धरली. ती एका मोठ्या कचेरींतील चाकरी असल्यामुळें तेथें त्याला बरीच व्यसनें जडलीं. मोठमोठे लोकसुद्धां लांच खातात, असें पाहून तोहि आपल्या पगाराशिवाय महिन्याच्या कांठीं अवांतर पांच पन्नास रुपये मिळवूं लागला. शिवाय त्याला एक खाजगी क्लबांतील शिपायाचें काम करावें लागत असल्यामुळें येथें राहून त्यानें थोडक्याच दिवसांत मद्यप्राशनाची कला संपादन केली. तो शहरांत राहात असल्यामुळें शहरांतील सर्व लोकांचीं मतें व विचार त्याला माहीत झालेले होते. परंतु ही त्याची स्थिति फार दिवस टिकली नाहीं. एका वेश्येच्या घरच्या मारामारीच्या खटल्यांत सांपडून त्याची चाकरी निघाली. रोगग्रस्त शरीर झाल्यामुळें त्याला दुसरीकडील दगदगीची चाकरी होईना. जवळचे पैसे सरून गेले. ज्यांच्यापासून कर्ज काढलें होतें त्यांचे तगादे दारापाशीं येऊन बसूं लागले. फौजदारी आणि दिवाणी या दोन्ही तुरुंगांच्या आंतील भिंतींचा रंग पाहून झाल्यावर त्याला शहरांत पहाण्यासारखें दुसरें कांहीं उरलें नाहीं. मोठ्या शहरांच्या दुराचारांनीं मनुष्याला जितकें नागवावयाचें तितका तो नागवला गेला. पोलीस, कलाल, वेश्या, वकील, सावकार आणि कोर्ट यांच्यापैकीं एकाच्याहि दृष्टीला आकर्षण करून घेण्यासारखा कांहीं एक गुण त्याच्यामध्यें उरला नाहीं. तो खेडेगांवाकरितां मात्र लायक झाला व नंतर तो तें शहर सोडून आपल्या गांवीं राहण्याकरितां आला. तो गांवीं येण्यापूर्वींच त्याच्या घराची बहुतेक वाताहात झालेली होती. त्याचे आईबाप म्हणजे शुद्ध पिकलेलीं पानें झालीं

होतीं, तीं केव्हांच गळून पडलीं. त्याच्या शहरांतील व्यसनांना शहरांतील पैसा पुरेनासा झाल्यानंतर त्याच्या खेडेगांवच्या इस्टेटीनें त्याला पुष्कळ वेळां मदत केली होती, त्यामुळें खेडेगांवांत त्याची जी कांहीं जमीन आणि गुरेंढोरें होतीं तींहि बहुतेक नाहींशीं झालीं होतीं व एका दुष्काळांत त्याचें घरहि गहाण पडलें. अशा स्थितींत तो आपल्या खेडेगांवीं परत आला. तो परत आला त्या वर्षीं चोहोंकडे अवर्षणामुळें भयंकर दुष्काळ पडला होता. त्याच्या पदरीं त्याची बायको आणि दोन मुलें होतीं. इतक्या माणसांच्या उदरनिर्वाहाला पंचाईत पडूं लागली. एवढा दुष्काळ होता तरी तो बाकीच्यांच्या मानानें कांहीं अंशीं सुखी होता. कारण, या दुष्काळाच्या सालांत शेतसारा कोठून द्यावा ही काळजी त्याला बिलकूल नव्हती; कारण त्याच्यापाशीं शेतेंच नव्हतीं. तसेंच राखलेल्या जंगलांत गुरें चरावयाला गेलीं म्हणजे दंड घेतात, अशी जी एक सरकारी जुलमाबद्दलची कंडी पिकविण्यांत आलेली असते ती खोटी असली पाहिजे, असें त्याच्या अलीकडे प्रत्येक दिवशीं अनुभवास येऊं लागलें होतें. कारण, त्याच्यापाशीं कांहीं गुरेंच उरलीं नव्हतीं. अशा दृष्टीनें तो जरी सुखी होता व हीं दुष्काळांतील दुःखें जरी त्याच्या कधीं प्रत्ययाला येत नव्हतीं, तरी बायकामुलांचें व स्वतःचें पोषण करण्याची मात्र दिवसेंदिवस त्याला अडचण पडूं लागली. परंतु एके दिवशीं सकाळीं त्याला कळलें कीं जे कोणी लोक दुष्काळांत उपाशी मरत असतील, त्यांच्याकरितां दयाळू सरकारनें जवळच एक अन्नछत्र उघडलें आहे. पाहिजे त्यानें तेथें जाऊन खडी फोडावी आणि आपला यथेच्छ उदरनिर्वाह करावा. ही आनंदाची बातमी ऐकिल्याबरोबर जेथें रिलीफ काम निघालें होतें, त्याच्या जवळच त्यानें एका झाडाखालीं आपलें घर उभारलें व आपल्या बायकामुलांसह तो तेथें आनंदानें सार्वजनिक रस्त्यावरील सतरंज्या तयार करण्याच्या परोपकाराच्या कामासाठीं एखाद्या संताप्रमाणें आपला देह झिजवूं लागला. या त्याच्या परोपकाराबद्दल त्याला जें वेतन मिळे तें अगदीं थोडें होतें.

त्यांत या माणसांचा गुजारा होईना. तेव्हां पोटचीं मुलें, पण तींसुद्धां जड झालीं. त्यांना अन्न मिळेनासें झालें. झाडाच्या पाल्यानें त्यांचें पोट भरेना. पण अखेरीस एकदां ताप येऊन दोहोंपैकीं एका मुलानें परलोकची वाट धरली, व त्या योगानें आपल्या खर्चाचा बोजा कमी करून त्यानें आपल्या बापावरचें ओझें थोडेंसें कमी केलें. परंतु दुसरा मुलगा अशाहि रीतीनें मरेना. त्याला झाडांचा पाला पचूं लागला. तेव्हां तर त्याच्या आईबापांना जास्तच काळजी वाटूं लागली. परंतु इतक्यांत त्याच्या सुदैवानें एके दिवशीं एक मिशनरी बाई त्या अन्नछत्रांत आली. व मी या मुलाला पोट-भर खावयाला घालीन असें म्हणून त्याचे मुके घेत घेत ती त्याला घेऊन गेली. अशा रीतीनें या दोन मुलांच्या तावडींतून जरी तो सुटला तरी तिसरें एक नवीन संकट त्याच्यावर डोकावूं पाहात होतें. त्याच्या बायकोला नऊ महिने बहुतेक पुरे होऊन गेलेले होते. मिशनरी बाईनें मूल नेलें त्याच दिवशीं रात्रीं त्याची बायको बाळंत झाली. कसें करावें अशा चिंतेंत तो बसला असतां दुसरे दिवशीं सकाळीं एक पट्टेवाला त्या अन्नछत्राकडे कांहीं चौकशी करीत आला. त्याचा साहेब जवळच राहात होता. त्या साहेबाची मडमहि थोडे दिवसांपूर्वींच प्रसूत झालेली होती. तिचें तारुण्य कायम राहण्याकरितां साहेबांना कोणी तरी जिचें मूल जिवंत नाहीं अशी एक ओली दाई ठेवा-वयाची होती. तिच्या शोधासाठीं तो पट्टेवाला फिरत होता. आमच्या कथा-नायकाला ही बातमी कळली आणि तो विचार करूं लागला. त्यानें या पट्टेवाल्याला आठचार दिवसांनीं येण्याला सांगितलें. मध्यंतरीं त्यानें ही श्रीमंत होण्याची आलेली संधी आपल्या बायकोला कळविली. असल्या मार्गांनीं ज्या राज्यांत लोकांना पोटाला मिळवावें लागतें, त्या राज्यावर त्या माऊलीनें ही नवऱ्याची कल्पना ऐकतांक्षणींच आपल्या शापांची लाखोली वाहिली. व त्या बिचाऱ्यांची पहिली रात्र यांतच निघून गेली. अन्नछत्रांतून थोडेंसें दूध मिळालें होतें, पण त्यापैकीं कांहीं मांजरानें सांडलें व बाकीचें नासून गेलें. बायकोच्या औषधपाण्यांत वेळ गेल्यामुळें नवऱ्याच्या हातून

फुटावी तितकी खडी न फुटल्याकारणानें त्या दिवशीं त्याला गैरहजर मांडण्यांत आलें. संध्याकाळ झाली. सूर्य अस्तास गेला. काळोख पडला. पण तान्ह्या मुलाच्या आणि त्याच्या आईबापांच्या पोटांत मात्र त्या दिवशीं अन्नाचा एक थेंबही पडला नाहीं. तेव्हां त्या आईचे डोळे उघडले. आणि ज्या राज्यावर तिनें आदल्या दिवशीं शिव्यांची लाखोली वाहिली होती; तें राज्य किती चांगलें आहे, याची तिला थोडी थोडी कल्पना येऊं लागली. साहेब लोक जर दाया न ठेवते, तर आज मला मरणाशिवाय दुसरी वाटच नव्हती, हें तिला खरें वाटूं लागलें, व आतां पुढें मुलाची वाट कशी काय करावी, याच्याबद्दल तीं दोघें त्या रात्रीं विचार करूं लागलीं. एकंदर उपाय किती आहेत आणि त्यांपैकीं आपल्याला सोईचा कोणता, याबद्दल बरीच वाटाघाट झाली. परंतु नवऱ्यानें सुचविलेल्या उपायांपैकीं आईच्या प्रेमाला कोणताच उपाय पसंत पडेना. तेव्हां हे चांगल्या चांगल्या सुधारलेल्या लोकांनीं उपयोगांत आणलेले उपाय असून आम्हांलाच ते सोईवार कां वाटत नाहींत, याबद्दल नवऱ्यानें आपल्या मनाशीं विचार केला. विचारा-अंतीं त्याची अशी खात्री झाली कीं, आणखी दोन उपासांनीं हेच उपाय आपल्या बायकोला पसंत पडण्याला लायक होतील. जिचें मूल जिवंत आहे अशा दाईला जागा मिळेल किंवा नाहीं, याबद्दल नवऱ्यानें दुसऱ्या दिवशीं चौकशी करून यावें, अशी एक तोड निघाली. त्याप्रमाणें नवऱ्यानें तपास केला. तेव्हां मागच्या एका दाईचें मूल रात्रीचें रडत असे आणि त्यामुळें साहेबांची झोपमोड होई. तेव्हांपासून मूल असलेली दाई ठेवावयाची नाहीं, असा साहेबांनीं निश्चय केला असल्याचें त्याला कळलें; तेव्हां तिकडूनहि निराशा झाली, आणि शिवाय ही चौकशी करण्यांत दिवस मोडला तो निराळाच. अशा रीतीनें त्या दिवशींही फिरून उपास पडला. आणि त्या दिवशींची रात्र भुकेच्या व्याकुळपणांत आणि पुढें कसें करावें या चिंतनांत गेली. अखेरीस कवींना आणि राजाच्या मंत्र्यांना नवीन कल्पना सुचत असतात अशा पहांटेच्या प्रहरीं त्या बायकोच्या डोक्यांत एक विचार आला;

आणि तुमच्यापाशीं एखादा पैसा आहे काय, असें तिनें आपल्या नवऱ्याला विचारिलें. नवऱ्यानें सगळया चिंध्यांच्या गांठी सोडून पाहिल्या तों त्यांतून दोन पैसे निघाले. व त्यानें शेजारच्या झाडाच्या बुंधापाशीं दोन पैसे पुरून ठेविले होते ते त्यानें उकरून काढले. ही संपत्ति पाहून बायकोला समाधान वाटलें व एवढ्या पैशांत, वाटेल तितक्या मुलांना दुःखमुक्त करतां येईल, असें पाहून तिला आनंद झाला. यांतल्या एका पैशाची तुम्ही अफू घेऊन या, असें तिनें आपल्या नवऱ्याला सांगितलें. एक पैशाची काय, मी पाहिजे असल्यास या सगळया पैशाची अफू घेऊन येतों, असें म्हणून कांहीं वेळानें ते चार पैसे हातांत खुळखुळवीत तो निघाला. इतक्यांत साहेबाचा पट्टेवाला त्याच्याकडे मोठ्या सचिंत मुद्रेनें येऊन त्याला व त्याच्या बायकोला उद्देशून बोलूं लागला कीं, " तुम्ही कमनशिबी आहां ! बाई, तुला दाईची जागा मिळत नाहीं ! दुसरी एक अशीच बाई नुकतीच बाळंतीण झालेली आहे, तिला या जागेची कुणकुण कळल्यामुळें ती आज रात्रीं आपल्या मुलाची कांहीं तरी वाट लावून उद्यां आमच्या येथील दाईची जागा पटकावणार आहे ! मला तुमची दया आल्यामुळें मी ही बातमी तुम्हांला सांगण्याकरितां गुप्तपणें येथें आलों आहें. जिचें मूल आधीं मरेल तिला ती जागा मिळणार आहे. जागेचा पगार आठ रुपये आहे. शिवाय कपडालत्ता, खाना निराळा. जी आपल्या मुलाचा निकाल आधीं लावील तिला हें सुख मिळणार आहे. ही वर्दी तुम्हांला आधीं देऊन मी तुमचा किती फायदा केला आहे हें सांगण्याची सोय नाहीं. याबद्दल मला तुमच्याकडून कांहीं तरी बक्षीस मिळालें पाहिजे. " असें म्हणून नवऱ्याच्या हातांत जे पैसे खुळखुळत होते ते बरेचसे आहेत असें समजून त बक्षीस त्याच्या हातांतून हिसकावून घेऊन पट्टेवाला घाईघाईनें निघून गेला. पट्टेवाल्याचें वर दिलेलें बोलणें ऐकून ती बाई म्हणाली : " काय, माझ्या आधीं ती आपल्या मुलाला मारते ! थांबा, ती आज रात्रीं आपल्या मुलाला मारणार आहे काय ! तर मग मी आपल्या मुलाला आतां दिवसाच मारून

टाकतें ! जा ! घेऊन या हो अफू ! " यावर दुःखाश्रू डोळ्यांत आणून नवरा म्हणाला, " वेडे ! अफू कशाची आणूं ? माझ्यापाशीं चार पैसे होते ते सुद्धां तो पट्टेवाला बक्षीस म्हणून घेऊन गेला. आतां विष खावयालासुद्धां पैसा जवळ नाहीं. पण तूं निराश होऊं नको. परमेश्वरासारखे कल्पक सृष्टिकर्ते आणि इंग्रजासारखे कनवाळू राज्यकर्ते असतांना आपल्याला कांहीं एक कमी नाहीं. देवानें नखें कशाकरितां दिलेलीं आहेत, हें तुला माहीत आहे काय ? तसेंच इंग्रजांनीं सर्व प्रकारचीं शस्त्रें लोकांच्या हातून काढून घेतली असतां त्यांनीं लोकांच्या हातांत नखें कायम ठेविलीं आहेत. यांत त्यांचा किती ममताळुपणा आणि दूरदर्शीपणा आहे, याची तुला कल्पना तरी आहे काय?" या सूचक भाषणानें पुढें काय करावयाचें तें त्या बाईच्या ध्यानांत आलें. बाळंत झाल्यापासून उपाशी असलेल्या आईचें मूल फार शहाणें आणि मातृवत्सल होतें. आपल्या आईच्या नखालाही धक्का लागावा हें त्याला इष्ट नव्हतें. म्हणून साहेबाच्या घरचा दाईपणा पत्करण्याकरितां आपल्या आईला पाठविण्याच्या तयारीला तें मूल आधींपासूनच लागलें होतें. त्या त्याच्या प्रयत्नांनीं आणि कांहीं आईबापाच्या प्रयत्नांनीं तें देवानें बनविलेलें भांडें एकदांचें फुटलें. एकदां लहानसा रडण्याचा आवाज झाला. मानेखालीं थोडेंसें रक्त वाहिलें. डोळे मिटले. आणि श्वास बंद झाला.

दुष्ट लोक जेथें नाहींत असा जगाचा एकहि भाग सांपडावयाचा नाहीं. पोलिसांना बालहत्येचें पातक झाल्याचा वास आला. व ते हळूहळू इकडे तिकडे धामधूम करूं लागले. दुसरी जी बाई आपलें मूल मारणार होती तिचा हिरमोड झाल्यामुळें तिनें चहाडी केली. इकडे मेलेल्या मुलाचा बाप त्याच्या पुढील व्यवस्थेला लागला. तो पूर्वीं शहरांत राहात होता. व बड्या लोकांत वागलेला होता. त्याला इंग्रजी मोठेंसें येत होतें किंवा समजत होतें असें नाहीं; तरी पण लोकांच्या नेहमींच्या सहवासानें " God save the Queen. " "Long live the Queen." ( देव राणीचें रक्षण करो, राणी चिरायु होवो ) इत्यादि वाक्यें त्याच्या अगदीं तोंडीं बसल्यासारखीं

झालीं होतीं व त्यांचा अर्थ समजून तो बहुतेक प्रसंगीं हीं वाक्यें मोठ्यानें ओरडून म्हणत असे. हल्लींच्या प्रसंगीं झालेल्या खेदकारक गोष्टीचा फारसा बभ्रा होऊं नये म्हणून प्राण वजा जाऊन बाकी राहिलेली रक्कम आपल्या जवळच्या सर्व चिंध्यांमध्यें जितकी झांकतां येईल तितकी झांकून बाकीची घोंघावणाऱ्या माश्यांकरितां मोकळी ठेवून तो एकंदर ऐवज आपल्या खांद्यावर टाकून " God save the Queen, " " Long live the Queen. " असें म्हणत तो निघाला. इतक्यांत पोलिस पाटील व आणखी कांहीं मंडळींनीं तेथें त्याला थांबविलें व पंचनामा केल्याखेरीज प्रेत नेऊं नको, असें त्यांनीं त्याला सांगितलें. तेव्हां " Long live the Queen " असें म्हणून त्यानें आपल्या खांद्यावरील ओझें खालीं टाकलें. चौकशी सुरू झाली, तेव्हां आईनें व बापानें दोघांनींहि सांगितलें कीं, दुष्काळामुळें मुलगे मेले. पण यावर पोलिसाकडून असें प्रतिपादन करण्यांत आलें कीं, सरकारनें येथें एवढें मोठें अन्नछत्र घातलें असतां आतां हें मूल दुष्काळामुळें मरावें कसें ? तेव्हां याला तुम्हीं विष घालूनच मारलें असलें पाहिजे. याचें पोट फाडून पाहिलें पाहिजे.असें ठरल्यानंतर लगेच डॉक्टरकडे नेऊन आईबापांच्या समक्ष त्या मुलाचें पोट चिरण्यांत आलें. हें कृत्य चाललें असतां मुलाचा बाप अतिशय आनंदांत होता व 'God save the Queen' 'Long live the Queen!' , या शब्दांचा जयजयकार त्याच्या तोंडून मधून मधून चालला होता. डॉक्टरनें मुलाचें प्रत्येक आंतडें शोधून पाहिलें. परंतु त्यांत अफूचा, अन्नाचा, दुधाचा किंवा रक्ताचा पुराव्याकरितां कोठें थेंबहि सांपडला नाहीं. नंतर सगळीं बाहेर काढलेलीं आंतडीं एकत्र गोळा करून आंत कोंबून फिरून डॉक्टरनें पिशवीचें तोंड शिवून बंद केलें व विष-प्रयोगानें मृत्यु झालेला नाहीं, अशा शेरा देऊन तो मुडदा पोलिसाच्या हवालीं करण्यांत आला. नंतर पंचनामा करण्याकरितां जमलेल्या पंचांत फिरून अशी शंका पोलिसांकडून निघाली कीं, कदाचित् नखानें गळा दाबून मृत्यु आणला असेल. या मुद्यावर चौकशी व्हावयाची, तों इत-

इतक्यांत साहेबाचा पट्टेवाला तेथें आला व त्यानें बाई मोकळी झालेली पाहिल्याबरोबर तिला बंगल्यावर चलण्याविषयीं सांगितलें. पंचनाम्यांतील लोकांना त्या वेळीं कळून आलें कीं, साहेबांना दाईची फार जरूरी आहे. आणि पंचनाम्यांत स्वाभाविक मृत्यु आला असें ठरलें नाहीं, तर ही बाई या गुन्ह्यांत अडकली जाऊन साहेबांची खोटी होईल आणि साहेब युरोपियन असल्यामुळें कदाचित् सरकारी कामाला आपण अडथळा केल्यासारखें होईल. ही गोष्ट लक्षांत आणून मुलगा आपोआप मेला असें पंचक्रियासांत ठरलें. पोलिसांनीं जमविलेले पंच आपल्या घरोघर गेले. मुलाची आई पट्टेवाल्याबरोबर त्या दुसऱ्या बाईच्या आधीं साहेबाच्या बंगल्यावर दाई होण्यासाठीं गेली आणि बापानें Long live the Queen असें म्हणून आपल्या मुलाचें प्रेत दोन्ही हातांत उचलून घेतलें. इतक्यांत एक तिऱ्हाईत इसम त्याच्यापुढें येऊन म्हणाला, "अरे भल्या गृहस्था! मुलाचा खून केल्याबद्दल फांशीं गेला असतास; त्या तुला ज्या पोलिसांनीं वांचवलें, त्यांची तुला कांहींच दया येत नाहीं? त्यांना कांहीं बक्षीस दिल्यावांचून चाललास!" तेव्हां त्या पोलिस शिपायांच्या मेहनतीबद्दल त्याचें अंतःकरण गहिंवरून जाऊन तो म्हणाला : "त्यांना माझ्यासाठीं फार श्रम पडले खरे. पण त्यांच्या श्रमाइतकें देण्याला माझ्यापाशीं कांहीं नाहीं. फक्त तो एक भाकरी भाजण्याचा तवा त्या झाडाखालीं पडला आहे, तो त्यांना घेऊं द्या." त्यांनीं तो तवा नेलेला पाहिल्यानंतर तो आपल्या मुलाचें प्रेत घेऊन थोडासा दूर गेला. परंतु खणण्याला कांहीं साधन नसल्यामुळें तें तसेंच उघडें टाकून तो परत आला व आपली हातोडी घेऊन रुपयांच्याप्रमाणें दगडांच्या राशीवर आनंदानें बसून त्यानें आपलें खडी फोडण्याचें काम सुरू केलें. इकडे त्याची बायको बंगल्यावर गेल्याबरोबर तिला कामावर रुजूं करण्यांत आलें. तिला साबणानें आंघोळ घालून नवीन कपडे देण्यांत आले व थोडेंसें खाल्ल्यानंतर मेमसाहेबांपासून मूल पाजावयाकरितां घेऊन ती एकीकडे बसली. दुसऱ्याचें मूल मांडीवर

घेतल्याबरोबर तिला आपल्या मुलाची आठवण झाली. तिचे डोळे अश्रूंनीं भरून आले आणि ती एका बाजूला पाळींत असतां तिच्या दुसऱ्या स्तनांतून प्रेमाचा पान्हा फुटून दुधाच्या धारा वाहूं लागल्या. तिचें मूल तिच्या डोळयासमोर दिसूं लागलें. " तें असें प्यालें असतें, त्यानें माझ्याकडे असें पाहिलें असतें, मीं त्याचा असा मुका घेतला असता, तें मोठें झालें असतें, तें रांगूं लागलें असतें, तें बोबडें बोललें असतें, आणि त्यानें मला ' आई ' म्हणून हांक मारली असती; आतां मला ' आई ' म्हणून कोण म्हणेल? मी आपलें मूल आपल्या हातांनीं मारून टाकलें आणि त्या मुलासाठीं देवानें मला जें दूध दिलें होतें त्यावर मी दुसऱ्यांचीं मुलें पोशीत आहें, हा माझा केवढा अधमपणा!" असे अनेक विचार तिच्या मनांत घोळत असतां मध्येंच तिला झोपेची डुकली लागली, आणि स्वप्नाच्या तंद्रींत सकाळीं झालेल्या गोष्टी तिला फिरून दिसूं लागल्या. मुलाच्या मानेला नख लावल्यानंतर तें जें ओरडलें तेंच ओरडणें तिला झोंपेंत ऐकूं आल्यासारखें वाटलें आणि झोंपेंतून ती दचकून जागी झाली व आपल्या बोटाच्या नखाकडे निरखून पाहूं लागली. पण नखाला आतां काय राहिलें होतें? साबणानें उरलें सुरलेलें रक्त सर्व साफ धुऊन गेलेलें होतें. तरी अजून तें नख लालच आहे असें तिला वाटे व त्याला रक्ताची घाण येत आहे असाहि तिला भास होई. अशा तिच्या वेडगळपणाच्या निरनिराळया वृत्ती बदलत असतां कांहीं वेळानें संध्याकाळ झाली व मुलाला फिरावयाला बाहेर नेण्याविषयीं मेमसाहेबांचा दाईला हुकूम झाला. एक हस्तिदंती लहान मुलांची सुंदर गाडी बाहेर आली. एक बॉय गाडीवर छत्री धरण्याकरितां गाडीजवळ येऊन उभा राहिला. गाडीच्या पुढें चालण्याकरितां एक नोकर तयार झाला. आणि दाईनें मुलाला उंची उबेच्या वस्त्रांत गुंडाळून गाडींत आणून ठेवलें. आणि अशा रीतीनें ती मिरवणूक हवा खाण्याकरितां निघाली. एकीकडे दुष्काळांत खावयाला अन्न नाहीं म्हणून नख देऊन मुलें मारावीं लागतात आणि दुसरीकडे

पन्नास अनाथ मुलांचा खर्च एका मुलाच्या तैनातीमध्यें केला जातो, हे विचार दाईच्या मनांत येऊन परमेश्वराच्या आणि इंग्रजांच्या घरच्या न्यायाबद्दल तिला बरेंच आश्चर्य वाटलें, व अशा प्रकारच्या दैवाच्या विचित्र गतीचा विचार करीत त्या मुलाची गाडी ढकलीत ढकलीत बाकीच्या नोकरांबरोबर ती बरीच दूर गेली. तो प्रदेश व त्याच्या आसपासचा प्रदेश बहुतेक सगळें जंगलच होतें. आणि अशा जंगलांतून कोल्ह्यांचा फार उपद्रव असतो. तिच्या नवऱ्याजवळ पावडें, कुदळ, वगैरे कांहीं एक नसल्यामुळें आपल्या मुलाचें प्रेत जमिनीवर उघडेच टाकून तो आला होता. कोल्ह्यांनीं तें फाडून आणि छिन्नविच्छिन्न करून ज्या सडकेवरून ही वरील मिरवणूक चालली होती, त्या सडकेवर ओढीत आणून टाकलें होतें. दाई वर सांगितलेल्या विचारांत निमग्न होऊन गाडी ढकलीत असतां गाडीला हिसका बसून गाडी पलीकडे गेली, आणि तिच्या पायाला कांहीं गार लागलें. तेव्हां शुद्धीवर येऊन तिची दृष्टि पायाकडे गेली. डॉक्टरांनीं व कोल्ह्यांनीं फाडून छिन्नविछिन्न केल्यामुळें जरी त्याचा वरचा भाग ओळखतां येण्यासारखा उरला नव्हता, तरी तिनें 'या पायाच्या पोटऱ्या आपल्या मुलाच्याच आहेत' असें ओळखलें. आपल्या पोटच्या गोळ्यांना कोल्हे फाडून खातात आणि आपण दुसऱ्यांच्या गोळ्यांना डोक्यावर घेऊन नाचतों, या दुःखदायक स्थितीबद्दल तिला अतिशय खेद झाला. परंतु तिला जास्त कांहीं करतां येत नसल्यामुळें ती तशीच पुढें चालती झाली. अखेरीस संध्याकाळीं बंगल्यावरचें काम आटोपल्यानंतर मुलाच्या प्रेताची व्यवस्था लावण्याकरितां तें झांकून घेऊन आपल्या नवऱ्याजवळ आली व त्याला झालेली सर्व हकीकत सांगून व त्या प्रेताची नीट व्यवस्था लावण्याविषयीं बजावून ती माघारीं बंगल्यावर गेली. नवऱ्यापाशीं प्रेत पुरण्याला दुसरें साधन नसल्यामुळें व कोल्ह्याचा त्रास फार असल्यामुळें खडीच्या राशीखालीं त्यानें प्रेत दाबून टाकलें आणि 'God save the Queen' असें म्हणत तो त्याच राशीवर बसला.

इतक्यांत आकाशांतून शंकर–पार्वतींची स्वारी आपल्या गणांसह विमानांत बसून रामेश्वरावरून कैलास पर्वतावर चालली होती. त्या वेळीं पार्वतीची दृष्टि अकस्मात् तें मुलाचें प्रेत, त्यावरील खडीचा ढीग, आणि त्यावरील तो उपाशी मनुष्य यांच्याकडे गेली व तिनें हा काय चमत्कार आहे, म्हणून शंकराला विचारलें. तेव्हां तिला सगळी हकीकत सांगणें शंकराला भाग पडलें. तेव्हां पार्वती क्रोधायमान होऊन शंकराला म्हणाली: रामेश्वरापासून कैलासापर्यंत सदोदित तुमचा संचार असून असल्या दुःखी मनुष्याची तुम्हांला कांहींच करुणा येत नाहीं हें काय? आधीं हें विमान थांबवा, आणि कोणीतरी एक गण पाठवून त्या खडीच्या ढिगावर बसलेल्या मनुष्याला आपल्याबरोबर स्वर्गलोकांत घेऊन चला. शंकर म्हणाले: पार्वती, तूं चुकते आहेस, तुझी कृपा अस्थानीं आहे. तरी पण तुझा आग्रहच आहे म्हणून मी एक दूत पाठवितों. भगवान् गिरिजापति असें बोलत आहेत तों आकाशांत विमान थांबलें, आणि त्या खडीवर बसलेल्या मनुष्याच्यापुढें एक दिव्य तेजाचा, जटाधारी व व्याघ्रांबर पांघरलेला बैरागी येऊन उभा राहिला. त्याला पाहतांच या खडी फोडणाऱ्या मजुराला वाटलें कीं, हा कोणी तरी भीक मागण्याकरितां आलेला आहे; असें वाटून तो त्या बैराग्याला म्हणूं लागला, " कांहीं एक काम न करतां भीक मागत सुटण्यानें हिंदुस्थान देश बुडाला आहे. माझ्यापाशीं असतीं तरीसुद्धां मीं तुला भिक्षा घातली नसती. तुला पोटाला पाहिजे असेल, तर चल ते दगड घेऊन फोडीत बैस. इंग्रजी राज्यांत काम करणाऱ्या पोटाला अन्नाचा तोटा नाहीं. " हे त्याचे मूर्खपणाचे उद्गार ऐकून त्या बैराग्याला हंसूं आलें व आपण कोण आहों, याबद्दल त्यानें त्याला थोडीशी माहिती सांगितली. तेव्हां तर या खडी फोडणाराला फारच राग आला. हा इसम पूर्वीचा फार बहुश्रुत होता व मोठ्या लोकांच्या तोंडून सर्व नास्तिकपणाचे विचार त्याच्या कानांवरून गेलेले होते. त्यांची आठवण होऊन तो म्हणाला,

" अरे ढोंग्या, तूं मला फसवतोस काय ! देव, धर्म कुच नाहीं, हें सब झूट आहे, असें मोठमोठ्या लोकांचें म्हणणें मला माहीत नाहीं असें तूं समजतोस कीं काय ? पोटाला पाहिजे असेल तर खडी फोडावयाला बैस, नाहीं तर चालता हो. देव म्हणजे दगड, आणि दगड म्हणजे खडी ! तेव्हां अर्थातच या इंग्रजी युगांत खडी हाच देव आहे ! याचें सकाळपासून संध्याकाळपर्यंत सेवन केलें म्हणजे थोडेंबहुत खावयाला मिळतें. हा घे हातोडा आणि कर या देवाची उपासना ! " हें ऐकून त्या देवदूताला फारच खेद झाला. मनुष्याचे गुलामगिरींतील विचार किती अधोगतीला जातील, याची त्याला कल्पना नव्हती. तरी पण कांहीं चमत्कार दाखवून आपण खरोखरच देवदूत आहों अशी त्यानें त्या खडी फोडणाराची खात्री केली व तूं येत असशील तर तुला मी स्वर्गांत घेऊन जातों असें त्यानें त्याला सांगितलें. तेव्हां बराच वेळ विचार करून तो खडी फोडणारा म्हणाला: " आधीं स्वर्ग तरी आहे काय ? इंग्रजी पंडितांनीं असें ठरविलें आहे कीं, स्वर्ग म्हणून कांहीं नाहीं. पण जरी स्वर्ग असला, तरी तो मला काय करावयाचा आहे ? आमच्यांतील सगळ्या शहाण्या लोकांनीं आम्हांला असें शिकविलें आहे कीं हिंदुस्थानासारखा सुखी देश दुसरा कोणताहि नाहीं, आणि इंग्रजांसारखे उत्कृष्ट राजे दुसऱ्या कोठेंहि मिळावयाचे नाहींत. तेव्हां नको रे बाबा, मला तुझा तो स्वर्ग ! तेथें न्यायमनसबा कांहीं नसेल. अशा ठिकाणचा जुलूम कोणीं सहन करावा ! तेथें स्वतंत्रतेचा तर, मला वाटतें, गंधहि नसेल. आणि हिंदुस्थानांत पाहा, आम्हांला किती तरी प्रकारचीं स्वातंत्र्यें आहेत ! व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, स्त्रीस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, मरणस्वातंत्र्य, अशा नाना-प्रकारच्या स्वातंत्र्यांची येथें गर्दी उसळून गेली आहे ! स्वर्गांत काय, सगळे देवाचे गुलाम ! आणि मला तर गुलामगिरीचा इतका तिटकारा आला आहे कीं मी ती स्वर्गांतसुद्धां पत्करणार नाहीं. स्वर्गांतले राजे वाटेल तसे वागत असतील. त्यांच्याशीं भांडण्याकरितां लोकांचे प्रतिनिधि त्यांच्या कौन्सिल-

मध्यें नसतील. राजांचें औदार्य दाखविण्याचे प्रसंग येण्याकरितां तेथें दुष्काळ नसतील. अशा कंगाल स्वर्गलोकांत येऊन मी काय करूं ? त्या स्वर्गलोकांत आहे काय ? दुष्काळ आहे, कीं प्लेग आहे, कीं साहेब आहेत, कीं कर आहेत, का अन्नाची टंचाई आहे, कीं प्लेग टोंचण्याची लस आहे, कीं पोलीस आहे, कीं चाहडी सांगून मोठें होण्याची संधि आहे, कीं आईला नमस्कार करण्याची बंदी आहे, कीं सुखकर इंग्रजी साम्राज्य आहे, कीं दुष्काळ पडला तर रिलीफ कामें आहेत, कीं मी खडी फोडीन म्हटलें तर दगडाचे तरी ढीग आहेत ? ह्यांपैकीं जर तेथें कांहीं एक नाहीं, तर मी तेथें येऊन काय करणार ? मला तें कांहीं नको. तूं येथून चालता हो. " असें म्हणून त्यानें त्या देवदूताला खडीच्या राशींतील दगड मारून आपल्या जवळून घालवून लाविलें. देवदूत गुप्त झाला. शंकरांना वाईट वाटलें. गुलामगिरीची चटक किती भयंकर आहे, याबद्दल पार्वतीची खात्री झाली. घंटा घणघण वाजूं लागल्या. विमान आकाशमंडळामध्यें अदृश्य झालें. आणि संध्याकाळच्या शांततेमध्यें या खडी फोडणाराच्या हातोड्याचे आवाज फिरून ऐकूं येऊं लागले. याच्यासारखा प्रामाणिक खडी फोडणारा कोणीहि नसेल. यानें पुढें पंचवीस दुष्काळ पाहिले व हा ज्या प्रांतांत राहात होता, त्या प्रांतांतील निदान चार पांच हजार मैल तरी रस्ते याच्या हातच्या खडीनें तयार झालेले आहेत ! आपल्याला परमेश्वर दीर्घ आयुष्य देईल तर सगळ्या हिंदुस्थानचे रस्ते आपल्या स्वतःच्या हातच्या खडीनें आपण सुशोभित करून देऊं अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती ! परंतु विचारा चार पांच वर्षांपूर्वीं एकाएकीं गोळी लागल्याचें निमित्त होऊन मरण पावला !

**अभ्यास**

*( १ ) ' आपल्याला परमेश्वर दीर्घ आयुष्य देईल तर सगळ्या हिंदुस्थानचे रस्ते आपल्या स्वतःच्या हातच्या खडीनें आपण सुशोभित करून देऊं अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. परंतु बिचारा चार पांच वर्षांपूर्वी एकाएकीं गोळी लागल्याचें निमित्त होऊन मरण पावला ! ' या दोन वाक्यांत इंग्रजी राज्यांत झालेल्या हिंदी जनतेच्या दुर्दशेचें संपूर्ण वर्णन शिवरामपंतांनीं केलें आहे.' या विधानाचें स्पष्टीकरण करा.*

*( २ ) ' काळ तर मोठा कठिण आला ! ' ही हरिभाऊ आपटयांची गोष्ट वाचून तिची या गोष्टीशीं तुलना करा.*

*( ३ ) या कथेंतली तुमचीं पांच आवडतीं वाक्यें लिहा. तीं तुम्हांला कां आवडतात तें सांगा.*

## लायकर्गसचे कायदे ७

## परिचय

शिवरामपंतांच्या निबंधाचा हा थोडा निराळा असा नमुना आहे. प्राचीनकाळीं ग्रीस देशांत स्पार्टा नांवाचें एक संस्थान होतें. त्या संस्थानाकरितां तिथला एक श्रेष्ठ पुरुष लायकर्गस यानें जे कायदे केले त्याची माहिती पंतांनीं या लेखांत दिली आहे. तथापि लेखकाचें स्वदेश-प्रेम आणि स्वदेशाकरितां मृत्यूला कवटाळायला सदैव सिद्ध असणं हाच प्रत्येकाचा धर्म आहे या तत्त्वावरील त्याची श्रद्धा हीं दोन्हीही माहिती देतांना व्यक्त झाली आहेत. हिंदुस्थानांतल्या माणसांचीं मनें निश्चेष्ट झालीं आहेत, परक्या सरकारनें धूर्तपणानें असे कायदे केले आहेत कीं त्यांत स्वातंत्र्यप्रेमाचा विकास व्हायला अवसरच उरूं नये, ही शिवरामपंतांना सतत टोंचणारी जाणीव लेखांत मोठ्या परिणामकारक रीतीनें प्रगट झाली आहे, ते म्हणतात, 'मनुष्य हा एक प्रकारचा मातीचा गोळा आहे. मातीच्या गोळ्याला ज्या साच्यांत घालावें त्याप्रमाणें त्याला आकार येतो. तीच गोष्ट कायद्यांची आहे. लायकर्गसनें स्पार्टन लोकांना चांगल्या साच्यांत घातलें म्हणून ते शूर लोक बनले. एखाद्या स्वार्थसाधू कायदेवाल्यानें त्यांना आपमतलबी साच्यामध्यें घातलें असतें तर तेच स्पार्टन लोक भित्रे, नेभळे, भेषपात्र, कमकुवत, कुचकामाचे, टाकाऊ, नादान, पाजी, चहाडखोर, धनलोभी, कृतघ्न, नास्तिक, दास्यप्रिय, आणि देशद्रोही झाले नसते काय ! शेणांतल्या किड्याप्रमाणें गुलामगिरींत रमणाऱ्या आणि आपल्या क्षुद्र स्वार्थी जीवनाबाहेर

ढुंकूनसुद्धां न पाहणाऱ्या लोकांविषयी शिवरामपंतांना किती चीड वाटत होती हें अशा मनुष्यांचें वर्णन करतांना त्यांनीं जीं चोंदा विशेषणें वापरलीं आहेत यावरून सहज दिसून येईल.

लायकर्गसच्या कायद्यांत आजही आपल्याला उपयोगी पडूं शकतील अशा अनेक गोष्टी आहेत. पण चांगले लोक तयार करण्याकरितां त्यानें ज्या अनेक कल्पना काढल्या होत्या त्यांपैकीं कांहीं आजच्या काळाच्या दृष्टीनें अत्यंत अनुचित आणि अमानुष आहेत. उदाहरणार्थ, जन्मलेलें प्रत्येक मूल सशक्त आहे की अशक्त आहे हें जाणत्या लोकांनीं पहायचें आणि मूल अशक्त असल्यास तें फेंकून द्यायचें ही स्पार्टन लोकांची चाल आजच्या समाजाला राक्षसी वाटल्या-शिवाय रहाणार नाहीं. आपल्याकडे कांहीं रानटी जातींत मुलगी झाली कीं तिचा जीव घेऊन टाकायचा अशी फार पूर्वी एक रूढि होती. या अघोर रूढीशींच लायकर्गसच्या या कायद्याची तुलना करावी लागेल. मनुष्य हा विचार करणारा आणि विकास पावणारा प्राणी आहे, या दृष्टीनें लायकर्गसनें त्याच्याकडे कधींच पाहिलें नाहीं असें दिसतें. जगांत जन्माला आलेल्या मुलाला निसर्गत: कांहीं मूल्य आहे ही कल्पनाच त्याच्या मनाला शिवली नसावी. जन्माला आलेलीं मुलें म्हणजे कच्चा माल! तो कायद्याच्या चरकांत घालून त्याचा पक्का माल तयार करायचा हेंच सरकारचें कर्तव्य आहे, अशी या पंडिताची प्रामाणिक समजूत असली पाहिजे. आज लायकर्गस पृथ्वीवर आला तर मानवी समाजांत व्यक्तिस्वातंत्र्याची जी वाढ झाली आहे ती पाहून त्याला अचंबा वाटेल. आजच्या काळांतही समाजाचें व्यक्तीवर नियंत्रण असणें आवश्यक आहे यांत संशय नाहीं; पण त्या नियंत्रणामुळें खांबाला सांखळीनें बांधून ठेवलेल्या माकडासारखी माणसाची स्थिति होतां कामा नये. मात्र लायकर्गसचे कायदे आपल्याला कितीहि कठोर वाटले तरी चांगले लोक आयत्या वेळीं तयार होत नसतात. लहान मुलांमधून चांगले लोक निर्माण करून घ्यावे लागतात, हें त्याच्या कायद्यांतून सूचित होणारें तत्त्व अबाधित आहे याबद्दल दुमत होणार नाहीं.

युरोपखंडांतील प्राचीन इतिहासामध्यें अतिशय भरभराटीस आलेलीं, अतिशय संपन्न झालेलीं, पराक्रमासाठीं अतिशय नांवाजलेलीं, आणि

विद्या, कलाकौशल्य, तत्त्वज्ञान, पांडित्य, शास्त्राभ्यास, वगैरे गोष्टींनीं अतिशय सुधारलेलीं अशीं दोन राज्यें होतीं; एक ग्रीसचें आणि दुसरें रोमचें. हीं दोन राज्यें अभ्युदयाला येण्याला जीं अनेक कारणें झालेलीं आहेत, त्यांत ग्रीसमध्यें लायकर्गसच्या कायद्यांना आणि रोममध्यें स्टोइक पंथाच्या मतांना बऱ्याच वरच्या प्रतीचें स्थान दिलें पाहिजे. या दोहोंपैकीं स्टोइक पंथाच्या मतांचा अथवा स्टोइसिझमचा इतिहास फिरून केव्हां तरी वाचकांपुढें सादर करण्याचें आश्वासन देऊन आज आम्ही लायकर्गसच्या कायद्यांकडे वळतों.

ग्रीस देशांत अनेक लहान लहान संस्थानें होतीं. त्यांतीलच स्पार्टा हें एक होतें. लायकर्गस हा मूळचा स्पार्टामधील; व ह्यानें कायदे केले ते मुख्यत्वेंकरून आपल्या स्पार्टाकरितांच केले. परंतु क्रमाक्रमानें आणि परंपरेनें त्या कायद्यांचा परिणाम सर्व ग्रीस देशावरही झाला. व अशा दृष्टीनेंच लायकर्गसचे कायदे ग्रीसच्या अभ्युदयाला कारणीभूत झाले असें वर म्हटलेंच आहे. परंतु वास्तविक दृष्ट्या लायकर्गसच्या कायद्यांचा पहिला परिणाम स्पार्टन लोकांवरच झाला. ज्या कायद्यांचा स्पार्टन लोकांवर असा अद्भुत परिणाम झाला, ते लायकर्गसचे कायदे जसे विलक्षण होते, तसें लायकर्गसचें चरित्रही थोडेंसें विलक्षणच आहे. स्पार्टा देशावर यूनोमस या नांवाचा कोणी एक राजा राज्य करीत असे. त्याच्या मरणानंतर पॉलिडेक्टस हा त्याचा मुलगा राज्यावर बसला. लायकर्गस हा पॉलिडेक्टसचा भाऊ होता. पॉलिडेक्टस मरण पावला तेव्हां त्याला पुत्रसंतान नव्हतें. परंतु त्याची बायको त्या वेळीं गरोदर होती. तिला जरी पुत्र होण्याची आशा होती तरी ती उदार अंतःकरणाची असल्यामुळें तिनें लायकर्गसला राज्यावर बसण्याविषयीं फार आग्रह केला. परंतु लायकर्गसचें अंतःकरण तिच्यापेक्षांही अधिक उदार होतें. त्यामुळें ह्या दोघांच्या उदारपणाच्या लढाईमध्यें लायकर्गसच्या उदारपणालाच अखेरीस जय मिळाला. लायकर्गसनें राज्यावर बसण्याचें नाकारिलें व

आपल्या भावाच्या बायकोला होणारा मुलगा वयांत येईपर्यंत त्याचें लालनपालन करून त्याचा राज्यकारभार आपण स्वतः लक्षपूर्वक पाहण्याचें पतकरिलें. ह्या उदारपणाच्या बाबतींत लायकर्गसला आपल्या इकडील भीष्माचार्यांचीच उपमा योग्य आहे. स्वतः राज्यावर न बसतां आपला भाऊ विचित्रवीर्य ह्याच्याकडून राज्य चालविणाऱ्या भीष्माचार्याप्रमाणें असली दुर्घट कृति या लोभी जगामध्यें लायकर्गसशिवाय दुसऱ्या कोणाच्या हातून झाली असती ? लायकर्गस फार बुद्धिमान् पुरुष होता व त्यानें प्रवासही पुष्कळ केलेला होता. इजिप्त आणि हिंदुस्थान हे जे त्या वेळच्या सुधारणेच्या दृष्टीनें अग्रगण्य देश तेही त्यानें पाहिले होते असें म्हणतात. अशा रीतीनें बऱ्याच देशांतून प्रवास करून परत आल्यानंतर त्याला असें आढळून आलें कीं, आपल्या पुतण्याचा अंमल बरोबर बसलेला नाहीं व स्पार्टन लोक अतिशय स्वैराचारी झालेले आहेत. अशी स्थिति पाहून आपल्या देशांतील लोकांना ताळ्यावर आणण्याकरितां व त्यांना इतर सर्व देशांतील लोकांपेक्षां अधिक योग्यतेला नेऊन पोचविण्याकरितां लायकर्गसनें आपले प्रसिद्ध कायदे रचविले व ते स्पार्टामध्यें चालू केले. ह्या कायद्यांसंबंधानें अशी एक आख्यायिका आहे कीं, हे कायदे सुरू झाल्यानंतर कांहीं वर्षांनीं लायकर्गस परदेशीं प्रवासाला जाण्याकरितां निघाला तेव्हां त्यानें आपल्या स्पार्टन लोकांना असें सांगितलें कीं, मी परत येईपर्यंत ह्या कायद्यांत कांहीं एक फेरबदल न करितां ते आहेत तसे तुम्हीं पाळा. असें सांगून लायकर्गस जो गेला तो फिरून कधींही परत आला नाहीं. सूर्याच्या गतीचाही निरोध करण्यासाठीं प्रवृत्त झालेल्या विंध्य पर्वताला ' मी दक्षिण दिशेकडे जाऊन परत येईपर्यंत तूं असाच ठेंगणा होऊन रहा. ' असें सांगून दक्षिणेकडे गेलेले अगस्ति ऋषि ज्याप्रमाणें दक्षिणेकडून उत्तरेकडे कधींच परत गेले नाहींत, त्याचप्रमाणें स्पार्टामधून गेलेला लायकर्गस स्पार्टामध्यें परत कधींही आला नाहीं. परंतु त्याच्या आज्ञेप्रमाणें स्पार्टन लोक त्याचे कायदे मात्र काळजीपूर्वक रीतीनें

पाळीत होते. व त्यापासून त्यांचा फायदाही झाला व अशा रीतीनें लायकर्गसचा हेतु पूर्णपणें सफळ झाला. डेलफाय येथील देवतेनें असा शकून दिला होता कीं, स्पार्टन लोक जोंपर्यंत लायकर्गसचे कायदे पाळतील, तोंपर्यंत त्यांची भरभराटच झाली पाहिजे. व हें भविष्य अगदीं खरें ठरलें लायकर्गसचे कायदे सुरू होण्याचे पूर्वी ग्रीस देशामध्यें आरगॉस वगैरे संस्थानें प्रमुख होतीं व स्पार्टाचा नंबर बराच खालती होता. परंतु लायकर्गसचे कायदे सुरू झाल्यापासून सर्व संस्थानांमध्यें स्पार्टा हें प्रमुख झालें. स्पार्टानें मेसीनीचें संस्थान जिंकून पादाक्रांत केलें, शौर्याबद्दलची आपली कीर्ति दिगंतरीं पसरविली, आणि ग्रीस देशांतील बराच भाग आपल्या हस्तगत करून घेतला व स्पार्टाचें एकंदर इतकें महत्त्व वाढलें कीं, इराणच्या बादशहानें ग्रीस देशावर स्वारी करण्याचें जेव्हां मनांत आणिलें तेव्हां अथेन्सनेंही स्पार्टाजवळ मदत मागितली. इतकें सर्व महत्त्व लायकर्गसच्या कायद्यांमुळें स्पार्टाला मिळालें. ह्या कायद्यानें स्पार्टामध्यें कोणी मोठमोठे तत्त्ववेत्ते किंवा कारागिर उत्पन्न झाले नाहींत हें खरें; जे झाले ते सर्व ब्रॉसिडास आणि लिओनिडास यांच्यासारखे शूर लढवय्येच उत्पन्न झाले. परंतु यांनींच स्पार्टाचें नांव जगामध्यें अजरामर करून ठेविलें आहे. ज्या कायद्यांमध्यें असा विलक्षण प्रभाव होता आणि ज्या कायद्यांचा असा अद्भुत परिणाम झाला, हे कायदे काय होते व ते कसे पाळले जात असत, याबद्दलची कांहीं माहिती आपल्या लोकांना असल्यास ती केवळ वायाच जाईल असें नाहीं.

लायकर्गसनें कायदे करण्याच्या पूर्वी स्पार्टामधील लोक बरेच स्वच्छंदचारी आणि दुर्वर्तनी झाले होते व श्रीमंत लोक गरिबांवर फार जुलूम करीत होते. ही सर्व अव्यवस्था 'लोभमूलानि पापानि' ह्या न्यायानें लोभापासून होत आहे असें जाणून लायकर्गसनें प्रथमतः जमिनीसंबंधानें एक कायदा केला. त्यानें सर्व जमिनीचे ३९,००० सारखे विभाग केले व ते सगळ्यांना सारखे वांटून दिले. पूर्वी कांहीं श्रीमंत लोकांपाशीं मात्र सर्व

जमिनी येऊन राहिल्या होत्या, व गरिबांपाशीं एक वीतभरसुद्धां जमीन उरली नव्हती. त्यामुळें एकाच देशांत अतिशय संपत्ति आणि अतिशय दारिद्र्य अशीं जमल्यामुळें जे कांहीं दुष्परिणाम व्हावयाचे ते सर्व स्पार्टी-तील श्रीमंत आणि गरीब लोकांना भोगावे लागत होते व उर्मटपणा, मत्सर, लुच्चेगिऱ्या, चैनबाजी, वगैरे दुर्गुणांचें स्पार्टामध्यें अतिशय प्राबल्य झालें होतें. त्या सर्वांचा लय ह्या जमिनीच्या सारख्या वांटणीनें झाला. श्रीमंत आणि गरीब हा भेद बुडाला. श्रीमंतीला सन्मान आणि गरिबीला अपमान ही चाल बंद झाली. सर्व सारखे झाले. आणि एकापेक्षां दुसऱ्याला श्रेष्ठत्व मिळावयाचें झालें तर तें संपत्तीनें मिळेनासें होऊन त्याला केवळ सद्गुणाचाच मार्ग उघडा राहिला. स्थावर मिळकतीसंबंधानें अशा रीतीनें सर्वांमध्यें सारखेपणा उत्पन्न झाला. तरी पण जंगम मिळकती-संबंधानें भेद उरलेलाच होता. तो हळू हळू नष्ट करण्यासाठीं लायकर्गसनें सोन्यारुप्याचें नाणें बंद करून लोखंडाचें नाणें सुरू केलें. व तें लोखंडी नाणें वजनानें अतिशय जड आणि किंमतीनें अतिशय हलकें असें त्यानें केलें. त्यामुळें थोडेंसें द्रव्यही इकडून तिकडे नेण्यासाठीं लोकांना गाडी-चाच उपयोग करणें जरूर पडत असे ह्या उपायानें आणि त्रासानें लोकांची अभिरुचि द्रव्यावरून हळूहळू उडाली. व तिचा कल शौर्याच्या कामाकडे वळविण्याविषयीं लायकर्गस दुसरीकडून प्रयत्न करीतच होता. कांहीं केलें तरी, किती खोटीं खतें केलीं तरी, किती जबर व्याज घेतलें तरी, आपल्या कुळाची जमीन कमी व्हावयाची नाहीं, आणि आपली जमीन वाढावयाची नाहीं, अशी सर्वांची खात्री झाल्यामुळें स्पार्टन लोकांचें लक्ष स्वाभाविकपणेंच धनसंपन्न होण्यावरून उडून जगांतील शौर्य, वीर्य, इत्यादि उदात्त गोष्टींकडे वळलें. संपत्तीमुळें चैनबाजी वाढते आणि चैनबाजीच्या संवयीपासून पुरुषाच्या अंगामध्यें नाजुकपणा आणि बायकीपणा उत्पन्न होतो, ही कारणपरंपरा लक्षांत आणून आपल्या देशबांधवांना शौर्यसंपन्न करूं इच्छिणाऱ्या लायकर्गसनें संपत्तिमूलक अनर्थांचा नाश केल्यानंतर

चैनबाजी आणि ऐषआराम ह्यांच्यापासून होणाऱ्या वाईट परिणामांकडे आपलें लक्ष वळविलें. श्रीमंत लोक अतोनात खर्चाचीं पंचपक्वान्नें सेवन करूनही नाजूक आणि कमकुवत बनलेले होते. व गरीब लोक पोटभर अन्न न मिळाल्यामुळें उपाशी मरत होते. ही स्थिति बदलण्याकरितां प्रत्येकानें आपापल्या घरीं पंचपक्वान्नी किंवा अर्धपोटीं जेवणाची चाल मोडून टाकून सर्व स्पार्टन लोकांनीं एकत्र जमून एकच प्रकारचें अन्न खावें, अशी पद्धत लायकर्गसनें सुरू केली. सार्वजनिक भोजनाच्या वेळीं जें मिळेल तें सर्वांनीं खावें, त्याशिवाय आपल्या घरीं कोणी कांहीं जास्त खातां कामा नये, असें कायद्यानें ठरलें असल्यामुळें नाजुकपणा लवकरच नाहींसा झाला. व संपत्ति आणि भोजन ह्यांची सार्वजनिक रीतीनें व्यवस्था लागल्यामुळें स्पार्टन लोकांमधील चोरी, लबाडी, वगैरे सर्व क्षुद्र मनोवृत्तींचे अन्याय एकदम नाहींसे झाले. कां कीं, ते अन्याय करण्याचें कोणाला कारणच उरलें नाहीं. व अशा रीतीनें स्पार्टन लोक अनायासानेंच सद्गुणाच्या आणि उदात्त मनोवृत्तीच्या मार्गाला लागले. सार्वजनिक भोजनाच्या पद्धतीपासून दुसरेही अनेक फायदे उत्पन्न झाले. जेवणांत कोणाचा नाजुकपणा आहे, हें ह्या पद्धतीनें ताबडतोब उघडकीस येई; व अशा मनुष्याचा बाकी सर्वजण उपहास करीत. यामुळें सगळ्यांच्या बरोबर मिळालेलें अन्न खाऊन नाजूक लोकही दणगट बनूं लागले. एकेका ठिकाणीं फक्त पंधराच लोकांनीं जेवावयाला बसावें व त्यांच्या संमतीशिवाय तेथें दुसऱ्या कोणी येऊन जेवूं नये, असा निर्बंध असे. सार्वजनिक भोजनांतील अन्न तयार करण्याची सामग्री प्रत्येकाला द्यावी लागत असे. परंतु सर्वांनीं सारख्याच प्रतीचें अन्न खावयाचें हा मात्र त्यांत विशेष होता. व कोणी राजा असो किंवा रंक असो, सर्वांनीं सार्वजनिक जेवणच जेवलें पाहिजे, असा नियम असे. एकदां ॲजीस ह्या नांवाचा राजा बाहेर मोठे पराक्रम करून आणि कीर्ति संपादन करून परत आल्यानंतर आपल्या घरींच आपल्या राणीबरोबर जेवूं लागला. व सार्वजनिक जेवणाला येईनासा झाला. त्याबद्दल त्यालाही

स्पार्टन लोकांकडून शिक्षा करण्यांत आली. इतके हे कायदे कडक होते. लहान मुलेंही या ठिकाणीं जेवणाकरितां आणलीं जात असत. त्यांना ही एक प्रकारची शाळाच होती. या ठिकाणीं वयोवृद्ध लोक राजकीय गोष्टींबद्दल वादविवाद करीत असत. तो ऐकून लहान मुलांच्या मनाला आयतेंच एक प्रकारचें शिक्षण मिळत असे. परंतु तेथें ऐकिलेल्या गोष्टी गुप्त ठेवण्याविषयीं मात्र त्या मुलांना ताकीद असे. त्यामुळें त्यांच्यामध्यें गुप्त बातम्या सांगणारे चहाडखोर लोक मोठेपणीं निपजत नसत. सार्वजनिक जेवण हें अर्थात्च जाडें भरडें असे. एकदां डायोनिशिअस हा राजा तेथें जेवावयाला आला होता. त्याला तें जेवण बिलकुल आवडलें नाहीं. तेव्हां तेथील आचारी म्हणाला: 'आपल्याला हें जेवण आवडलें नाहीं, ह्यांत आश्चर्य नाहीं; कारण ह्याला मसाला घातलेला नाहीं.' त्यावर डायोनिशिअसनें विचारलें: 'मसाला कसला?' तेव्हां तो आचारी म्हणाला: 'धांवणें, घाम काढणें, मेहनत करणें, व भूक आणि तहान ह्यांचा मसाला ह्याला लागत असतो. हा मसाला असला म्हणजे पाहिजे तें अन्न गोड लागतें.'

चांगले लोक आयत्या वेळीं तयार होत नसतात. लहान मुलांमधून चांगले लोक निर्माण करून घ्यावे लागतात. ही गोष्ट लक्षांत आणून लायकर्गस ह्यानें लहान मुलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पोहोंचविलें होतें. लायकर्गसच्या कायद्यांमध्यें स्वदेशालाच काय तें प्राधान्य होतें. सर्व कांहीं जें करावयाचें तें स्वदेशासाठीं, अशी एकंदर विचारांची दिशा असल्यामुळें आपल्या देशांतील मुलें हींसुद्धां फक्त स्वदेशाकरितां आहेत असें लायकर्गस मानीत असे. प्रत्येक मूल उत्पन्न झालें म्हणजे त्याच्या ज्ञातींतील वयोवृद्ध लोक त्याला पाहण्याकरितां येत असत. आणि त्यांना जर तो मुलगा चांगल्या बांध्याचा, सशक्त आणि मजबूत आहे, असें आढळून आलें, तर त्याचें नीट रीतीनें संगोपन करण्याविषयीं ते आज्ञा करीत. परंतु तें मूल जर नाजूक आणि अशक्त

आहे असें त्यांना वाटलें, व त्या मुलाचा पुढें सशक्त आणि निरोगी पुरुष बनणार नाहीं असें त्यांचें मत झालें, तर तें मूल फेंकून देण्याविषयीं ते हुकूम करीत. अशा रीतीनें पहिली निवड करून त्यांतून निवडून काढलेलीं मुलें मोठीं झाल्यावर त्यांना खाण्यापिण्याची वगैरे कोणत्याही तऱ्हेची खोड राहूं नये, अशी व्यवस्था करण्यांत येत असे. लहान मुलांनीं चिरचिर करतां कामा नये, व कांहीं झालें तरी चिरडीस जातां कामा नये, किंवा रडतां कामा नये, अशाच तऱ्हेचें त्यांना वळण लावण्यांत येत असे. एकटें असतांना किंवा काळोखामध्यें भीति वाटूं नये अशासाठीं लहान मुलांना त्या त्या गोष्टींची संवय करविण्यांत येत असे. लहान मुलांच्या पायांत घालण्याला जोडे वगैरे कांहीं एक मिळत नसत. अंगांत राकटपणा येण्यासाठीं तीं नेहमीं अनवाणीच चालत असत. रात्रीं निजण्याला त्यांना मऊ अंथरुणें नव्हतीं. त्यांना उघड्यावर कोठें तरी निजण्याचा अभ्यास करावा लागत असे. उन्हाळ्याकरितां मलमल आणि हिंवाळ्याकरितां बनाती, असला ऐषआरामाचा प्रकार त्या स्पार्टा-तील लहान मुलांना कधींही माहीत नव्हता. सर्व ऋतूंमध्यें त्यांच्या अंगावर एकसारखाच कपडा असे. त्यामुळें तीं स्पार्टा देशांतील मुलें उन्हाळा आणि हिंवाळा ह्यांची सारखीच पर्वा बाळगीत असत. अशा रीतीनें वाढून मुलें सुमारें सात वर्षांचीं झालीं म्हणजे त्यांना शाळेंत घालण्यांत येत असे व त्या ठिकाणीं सर्वांना एकसारखें शिक्षण देण्यांत येत असे. सर्व मुलें हीं स्वदेशाकरितां आहेत अशी कल्पना असल्यामुळें आपल्या मुलांना निरनिराळ्या रीतीनें निरनिराळ्या प्रकारचें शिक्षण देण्याचा अधिकार त्यांच्या आईबापांकडे न ठेवितां सर्व मुलांना एकच तऱ्हेचें शिक्षण देण्याविषयीं लायकर्गसनें योजना केली होती. त्याच्या सर्व शिक्षणांतील मुख्य भाग म्हटला म्हणजे मुलांना हुकूम पाळण्याला शिकवणें हा होता. त्यांचा वेळ निष्कारण भराभर पुस्तकें वाचण्यामध्यें कधींही फुकट जात नसे. अवश्य तेवढाच काय तो विद्याभ्यास ते करीत

असत. त्यांच्या सर्व शिक्षणाचा कल हुकूम पाळणें, येतील तीं संकटें सहन करणें, आणि लढाईमध्यें जय मिळविणें, ह्या गोष्टींकडे असे अशा रीतीनें स्पार्टामधील लहान मुलांमध्यें राकटपणा, दणगटपणा, आणि सोशिकपणा उत्पन्न करण्याचा क्रम नेहमीं चालू असे.

स्पार्टन लोकांमध्यें या लहान मुलांच्यासंबंधानें एक विलक्षण प्रकारची चाल असे. स्पार्टन लोकांप्रमाणें सद्गुणाची योग्यता दुसरे कोणीही मानीत नसतील. सद्गुण हा त्यांना परमपूज्य होता. हें जरी खरें आहे, तरी त्यांनीं आपल्या मुलांना लहान लहान चोऱ्या करण्याला परवानगी दिलेली होती. सद्गुणाची प्रशंसा आणि चोरीची परवानगी ह्या दोन गोष्टी सकृ-द्दर्शनीं अगदीं परस्परविरुद्ध दिसतात. परंतु स्पार्टन मुलांना चोऱ्या करण्या-ची परवानगी चोर बनविण्यासाठीं दिलेली नव्हती. लढाईच्या प्रसंगीं लागणारा चपळपणा, धीटपणा, वगैरे गुण त्या मुलांचे अंगांत येण्यासाठीं त्यांना ही गोष्ट करण्याची परवानगी असे; इतकेंच नव्हे, तर तसें त्यांनीं केलेंच पाहिजे, असेही हुकूम करण्यांत येत असत. ही चोरी नांवाची मात्र असे. ती द्रव्य चोरण्यासाठीं नव्हती, तर गुण संपादण्यासाठीं होती. कोणाच्या नकळत एकाद्याच्या बागेमध्यें जावें आणि तेथील फळें तोडून आणावीं, अशा प्रकारच्या निरुपद्रवीपणाच्या त्या चोऱ्या असत. परंतु अशा चोऱ्या करितांना जर कोणी मुलगा पकडला गेला, तर मात्र दुसऱ्याच्या हातून निसटून जाण्याइतका चपळपणा त्याच्या अंगीं अजून आला नाहीं म्हणून—चोरी केली म्हणून नव्हे—त्याला शिक्षा देण्यांत येत असे. अशी एक गोष्ट सांगतात कीं एकानें एक कोल्ह्याचें पिलूं चोरलें आणि तें त्यानें आपल्या डगल्याच्या आंतमध्यें दडविलें. तेव्हां तो कोल्हा त्याचें पोट फाडून आंतील आंतडींही खाऊं लागला, व अखेरीस त्या योगानें तो इसम मेलाही; परंतु आपण कोल्हा चोरला आहे, असें त्यानें उघडकीस येऊं दिलें नाहीं. सहनशीलपणाची स्पार्टन लोकांच्या अंगची शक्ति अशा प्रकारच्या पराकाष्ठेला जाऊन पोहोंचली होती. असल्या

चोऱ्या करण्याबद्दल लोकांची सम्मति आणि कायद्याची परवानगी पूर्णपणें होती. व त्यांतील हेतु स्पार्टन मुलांना धारिष्ट, साहस, चपळपणा, चाणाक्षपणा, वगैरे गुण अंगगत व्हावे, हा होता. अशा प्रकारची चोरी म्हणजे चोरी नव्हे, ही कल्पना आपल्या इकडील अशाच प्रकारच्या कृत्यांशीं तिकडील चोऱ्यांची तुलना केली असतां चांगल्या रीतीनें मनांत बिंबेल. आपल्यामध्येंही शिमग्याच्या महिन्यांत अशा प्रकारच्या गोष्टी करण्याची पूर्वीच्या पद्धतीप्रमाणें मोकळीक आहे. परंतु शिमग्यांतील चोरी करणाराला चोर म्हणून आपण कोणीही समजत नाहीं, ही गोष्ट आपल्या सर्वांच्या अनुभवाची आहे. तसाच प्रकार स्पार्टन लोकांच्या ह्या चालीसंबंधानें असला पाहिजे. आपल्यांतील शिमग्यामधील ही चाल वाईट आहे, म्हणून अलीकडे कित्येकांची ओरड चाललेली आहे. व त्या चाली-कडे केवळ चोरी या दृष्टीनें आपण जोंपर्यंत पाहतों आहों, तोंपर्यंत ती चाल वाईट असेंच आपण म्हणूं. परंतु अशाच प्रकारच्या स्पार्टन लोकांच्या एका चालीमध्यें त्यांचा कांहीं विशेष हेतु होता, असें जर आज आपल्याला स्पष्ट दिसून येत आहे, तर तसलाच कांहीं तरी हेतु आपल्याही ह्या चालीमध्यें आपल्या पूर्वजांनीं ठेविला असला पाहिजे, व आपल्याला केवळ चोर बनविण्यासाठींच त्यांनीं ही चाल प्रचारांत आणिली नसावी, असें अनुमान केलें असतां तें कोणालाही मान्य होईल, यांत शंका नाहीं. स्पार्टन मुलांच्या अंगांतील सहनशक्ति कसोटीला लावण्याचा एक विशेष प्रसंग असे. डायना ह्या नांवाच्या देवीची जत्रा भरत असे. त्या वेळीं आपले आईबाप आणि नगरांतील इतर लोक एकत्र जमले असतां त्यांच्या समक्ष स्पार्टन मुलांच्या अंगावर चाबकाचे फटकारे ओढण्यांत येत असत. व त्या योगानें त्यांच्या अंगांतून कधीं कधीं रक्तही वाहूं लागत असे. तरी पण त्या मुलांचा रडण्याचा स्वर किंवा नुसता सुस्काराही कोणाला कधीं ऐकूं येत नसे व एकादे प्रसंगीं आपलीं मुलें डगमगूं लागलीं तर प्रत्यक्ष त्यांचे आईबाप त्यांना धीर न सोडण्याविषयीं

उत्तेजन देत असत. अशा रीतीनें तयार झालेल्या मुलांचेच पुढें अत्यंत शूर शिपाई बनण्याला काय अडचण आहे?

अशा बाल्यावस्थेच्या शिक्षणांतून तयार झालेल्या स्पार्टन लोकांना स्वदेशभक्ति आणि सार्वजनिक हित ह्यांतच आपलें सर्व कांहीं आहे, असें वाटणें स्वाभाविक होतें. आपण आपल्या स्वतःकरितां नाहीं, तर मग आपल्या देशाकरितां आहों, ही कल्पना त्यांच्या हाडामांसांमध्यें अगदीं खिळून गेली होती. त्यामुळें जेथें आपल्या देशाचें कल्याण, तेथें आपलें स्वतःचें कितीही अकल्याण झालें, तरी त्याचा त्यांना बिलकुल खेद वाटत नसे. आपल्या इकडे शुष्काशुष्कीच्या, म्युनिसिपालिटीच्या, कौन्सिलच्या, वगैरे निवडणुकीसाठीं स्वार्थपरायण लोकांची किती धडपड चाललेली असते, हें आपण पाहतों. पिडॅरेटस ह्या नांवाचा एक स्पार्टन अशाच प्रकारच्या एका निवडणुकीसाठीं उमेदवार म्हणून उभा राहिला होता. तीनशें लोकांची स्पार्टामध्यें एक मोठी सभा असे. त्यांतील एका जागेसाठीं पिडॅरेटस हा उमेदवार होता. परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. तेव्हां आपण निवडून आलों नाहीं ह्याबद्दल यत्किंचितही दुःख न करितां तो मोठ्या आनंदानें असें म्हणाला कीं, 'माझ्यापेक्षां अधिक योग्यतेचे तीनशें लोक स्पार्टामध्यें आज आहेत, ह्याबद्दल मला अत्यंत अभिमान वाटत आहे.' अशा रीतीची सर्व लोकांच्या मनाची प्रवृत्ति झालेली असल्यामुळें तेथें कोणत्याही प्रकारच्या दुर्गुणांना जागाच उरली नव्हती व जिकडे तिकडे सद्गुणीच लोक पसरलेले असल्यामुळें त्यांचें उदाहरण पाहून पुढील लोकही सद्गुणी निपजतात. हा आपल्या लोकांचा सद्गुणीपणा इतर देशांतील दुर्गुणी लोकांच्या संसर्गापासून दूर राखण्याकरितां स्पार्टन लोकांनीं परदेशामध्यें प्रवासाला जाऊं नये, असा लायकर्गसनें प्रतिबंध करून ठेविला होता. त्याचप्रमाणें परकीय देशांतील वाईट चालीच्या आणि निरुद्योगी लोकांना तो स्पार्टामध्येंही कधीं येऊं देत नसे. कारण, हल्लींच्या कित्येक मतांपेक्षां त्याचें मत भिन्न असल्यामुळें तो असें म्हणे कीं, आपल्या

शहरामध्यें प्लेग वगैरेसारखे स्पर्शजन्य रोग येऊं न देण्याला जितके प्रयत्न केले जातात, त्याच्यापेक्षां बदमाषपणाच्या आणि हलकटपणाच्या चालीरीती आपल्या शहरामध्यें येऊं न देण्याविषयीं जास्त प्रयत्न करणें, हें फार जरूरीचें आहे. अशा रीतीनें दुसऱ्याच्या दुर्गुणांचा वारा न लागण्याविषयीं पूर्ण काळजी घेऊन स्पार्टामध्यें सद्गुणाची वाढ केली जात होती. आणि अशा रीतीनें हे सर्व सद्गुण संपादन करून त्यांचा उपयोग स्पार्टन लोक शत्रूंना जिंकण्याचे कामीं करीत असत. लढाई हाच त्यांचा जन्माचा व्यवसाय होता. आणि शस्त्रास्त्रांवांचून त्यांचा एकही क्षण जात नसे. आणि ते आपल्या शहरामध्यें रहात असोत, किंवा एकादा शत्रु पादाक्रांत करण्याच्या मोहिमेवर गेलेले असोत, त्यांच्या आयुष्यक्रमांतील नियमांचा कडकपणा दोन्ही ठिकाणीं सारखाच असे. त्यांचे लढाईचे मख्य नियम म्हटले म्हणजे हे होते कीं, शत्रूचें सैन्य आपल्यापेक्षां कितीही मोठें असलें तरी रणभूमीवरून पळून यावयाचें नाहीं; शत्रूला आपली पाठ दाखवावयाची नाहीं; आपल्या सेनापतीनें ज्या ठिकाणचें संरक्षण करण्याला सांगितलें असेल तेथून एक पाऊलभरही मागें सरावयाचें नाहीं; आणि आपली शस्त्रें कधींही शत्रूंच्या स्वाधीन करावयाचीं नाहींत. सारांश, लढाईमध्यें मरावयाचें किंवा मारावयाचें ह्याच्याशिवाय तिसरी गोष्ट त्यांना माहिती नव्हती. अशी एक गोष्ट सांगतात कीं, एकदां आर्किलोकस नांवाचा एक कवि स्पार्टामध्यें आला होता. त्यानें 'आपण लढाईमध्यें मरण्यापेक्षां आपलें हत्यार खालीं ठेवून शत्रूला शरण जाणें फार चांगलें,' असें मत आपल्या एका कवितेमध्यें प्रतिपादन केल्याची बातमी स्पार्टन लोकांना लागतांच त्यांनीं त्याला आपल्या शहरांतून ताबडतोब हाकलून लाविलें. हा वीरश्रीचा बाणेदारपणा फक्त स्पार्टन पुरुषांमध्येंच होता असें नाहीं तर तो बायकांमध्येंही पूर्णपणें बिंबला होता. स्पार्टन मुलगा लढाईला जावयाला निघाला म्हणजे त्याची आई त्याला असा उपदेश करीत असे कीं, 'तूं जय मिळवून घरीं ये, किंवा मरून तरी घरीं ये; परंतु लढाईतून पळून

घरीं येऊं नकोस.’ एका आईचा मुलगा लढाईंत पडलेला ऐकल्यानंतर ती दुःख वगैरे कांहीं एक न करितां शांतपणानें म्हणाली कीं, ‘मी आपल्या मुलाला ह्याचकरतां जन्म दिला होता. दुसरा त्याचा काय उपयोग आहे ?’ एका लढाईमध्यें स्पार्टन लोकांकडचे पुष्कळ लोक मेले, तेव्हां त्या मेलेल्या शिपायांच्या आईबापांना इतका आनंद झाला कीं, आपल्या मुलांनीं आपलें कर्तव्यकर्म केलें, ह्याबद्दल त्यांनीं एकमेकांचें अभिनंदन केलें व परमेश्वराची प्रार्थना केली. असले लोक, असले शिपाई, असले मुलगे, आणि असल्या आया ज्या शहरामध्यें आहेत, त्या शहराला तटबंदीच्या भिंती असण्याचें काय कारण आहे ? स्पार्टा-शहराचा हाच कोट होता. ह्याच्याशिवाय दुसरा कोट ख्रिस्तीशकापूर्वींच्या चवथ्या शतकापर्यंत स्पार्टा शहराला माहीत नव्हता. अशा प्रकारचे लायकर्गसचे कायदे होते. आणि त्या कायद्यांनीं स्पार्टन लोकांसारखे लोक जगापुढें बनवून दाखविलेले आहेत.

कोणी एका तत्त्ववेत्त्यानें असें म्हटलें आहे कीं, ‘मला एकाद्या मनुष्याचे स्नेही कोण कोण आहेत हें सांगा, म्हणजे मी त्या मनुष्याचा स्वभाव कसा आहे हें बरोबर सांगतों.’ जसे लोकांचे स्नेही त्यांच्या अंगच्या गुणावगुणांचे दर्शक आहेत, त्याचप्रमाणें कायदेही लोकांच्या अंगच्या गुणावगुणांचे दर्शक आहेत. जसे कायदे असतील तसे लोक बनतात. कायदे हे एक प्रकारचे सांचे आहेत, आणि मनुष्य हा एक प्रकारचा मातीचा गोळा आहे. मातीच्या गोळ्याला ज्या सांच्यांत घालावें, त्याचप्रमाणें त्याला आकार येतो. तीच गोष्ट कायद्यांची आहे. लायकर्गसनें स्पार्टन लोकांना चांगल्या सांच्यांत घातलें म्हणून ते शूर लोक बनले. एकाद्या स्वार्थसाधु कायदेवाल्यानें त्यांना आपमतलबी सांच्यांमध्यें घातलें असतें तर तेच स्पार्टन लोक भित्रे, नेभळे, मेषपात्र, कमकुवत, कुचकामाचे, टाकाऊ, नादान, पाजी, चहाडखोर, धनलोभी, कृतघ्न, नास्तिक, दास्यप्रिय आणि देशद्रोहीही झाले नसते काय ?

**अभ्यास** —

( १ ) या लेखांतली डायोनिशिअसची गोष्ट संवादरूपानें लिहा.

( २ ) श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचा ' शिमगा ' ( सुदाम्याचे पोहे ) हा लेख वाचा आणि शिवरामपंतांनीं या सणाचें केलेलें मंडन तुम्हांला कितपत योग्य वाटतें तें सांगा.

( ३ ) ' एकेका ठिकाणीं फक्त पंधराच लोकांनीं जेवायला बसावें. ' असा स्पार्टन लोकांमध्यें नियम होता. धान्यनियंत्रणामुळें सध्यां आपल्याकडे पंचवीसपेक्षां अधिक लोकांनीं मेजवानीच्या निमित्तानें एकत्र येऊन जेवतां कामा नये असा निर्बंध आहे. पण आपलें सामाजिक मन अजून विकसित झालें नसल्यामुळें या नियमाचा भंग करणाऱ्या सभ्य गृहस्थांच्या हकिगती आपल्याला दररोज वर्तमानपत्रांतून वाचायला मिळतात. अशीच एक मेजवानी चालली आहे अशी कल्पना करून तिथें पोलिस प्राप्त झाल्याबरोबर जो गोंधळ उडेल त्याचें वर्णन करा.

## रॉबर्ट एमेट याचा शतसांवत्सरिक उत्सव

८

**परिचय** —

देशभक्ति हीच मनुष्याच्या अंतःकरणांतली श्रेष्ठ देवता होय अशी शिवरामपंतांची निष्ठा होती. या निष्ठेमुळें त्यांना जगांत जिथें जिथें आपल्या प्राणांची पर्वा न करितां पारतंत्र्याविरुद्ध झगडा करणारे देशभक्त आढळले, तिथें तिथें त्यांनीं मोठ्या आदरानें आपलें मस्तक विनम्र केलें आहे. या निबंधांत फांशीं जाण्यापूर्वीचें ज्या देशभक्ताचें तेजस्वी भाषण त्यांनीं अनुवादित केलें आहे त्याचें नांवसुद्धां आपल्याला ठाऊक असण्याचा संभव नाहीं. पण भोंवतालीं पसरलेल्या विशाल जीवनांतून कवि जसा सौंदर्य निवडून घेतो, त्याप्रमाणें शिवरामपंतांनीं निरनिराळ्या देशांतल्या लहान थोर देशभक्तांचीं चरित्रें मोठ्या मार्मिकतेनें मराठींत आणलीं आहेत. ' गावीं संतचरित्रें ' हा जुन्या काळांतल्या कवींचा बाणा होता. शिवरामपंतांचें ध्येय ' गावीं वीरचरित्रें ' हें आहे. काळांतल्या निवडक निबंधांच्या सातव्या भागांत ' वुल्फटोन ' या देशभक्ताचें चरित्र त्यांनीं तन्मयतेनें वर्णन केलें आहे. या लेखाचा आरंभ हा शिवरामपंतांच्या विशिष्ट शैलीचा एक उत्कृष्ट नमुना आहे. या लेखाचा पहिला परिच्छेदच कसा आहे तो पहा—' देशद्रोही लोकांनों, तुम्ही हें वुल्फटोनचें चरित्र वाचूं नका; कारण ह्यापासून स्वदेशद्रोह कसा करावा हें तुम्हांला यत्किंचितही समजणार नाहीं. सरकारी सेवक-

जनहो, तुम्ही हें वाचूं नका; कारण, सरकारची खुषामत कशी करावी याबद्दल यांत एक अक्षरही नाहीं. आपसांत भांडणाऱ्या लोकांनों, तुम्ही हें वाचूं नका; कारण, तुमच्या धंद्याला उपयोगी पडण्यासारखें ज्ञानभांडार यांत नाहीं. हे कूपमंडूकहो, तुमच्याकरितां हें चरित्र नव्हे; कारण, ह्यामध्यें कल्पनांचा संकुचितपणा नाही. त्याप्रमाणें हे अज्ञानांतच गोडी मानणाऱ्या लोकांनों, धर्माच्या आणि समाजरूढीच्या खोट्या कल्पनांनी बद्ध झालेल्या लोकांनों, म्युनिसिपालिट्या, कायदे कौन्सिलें व पार्लमेंट, यांमधून सभासद पाठवून आपलें डोकें वर काढूं पाहणाऱ्या श्रमिष्ट लोकांनों, स्वदेश अत्यंत निकृष्टावस्थेला जाऊन पोंचला तरी आपला पिढीजात मूर्खपणा न सोडतां अत्यंत निंद्य व्यसनांमध्यें निमग्न होणाऱ्या लोकांनो, तापलेल्या तव्यावर उभें केलें असतांही बर्फाप्रमाणें थंडगार असणाऱ्या लोकांनों, आणि अतिशय खोल तुटलेल्या कड्याच्या कांठावरही नाना प्रकारची चैन करणाऱ्या लोकांनों, हें चरित्र तुमच्याकरितां नव्हे; कारण, तुमच्या चरितार्थाच्या ज्या विद्या आहेत त्या वुल्फटोनला कांहींच अवगत नव्हत्या.'

या चरित्रलेखाचा शेवटही तितकाच परिणामकारक आहे. चरित्रनायक म्हणतो, 'तुम्ही कशाही रीतीनें वागविलें तरी मला स्वतःला त्याचें सुखदुःख कांहींच नाहीं. तुम्ही मला काय शिक्षा देणार हें मी जाणून आहें; परंतु त्याच्याविरुद्ध कुरकुर करणें किंवा त्याच्यासाठीं तुमच्या हातींपायीं पडणें, ही गोष्ट मी तुच्छ मानतों. अशी गोष्ट मी कधींही करणार नाही. ग्रेट ब्रिटन आणि माझा देश यांच्यामध्यें जो घातक संबंध जडलेला आहे, तो तोडून टाकण्याच्या उद्देशानें मीं जें कांहीं बोललों असेन, लिहिलें असेल, किंवा केलें असेल, तें सर्व मी जाणून बुजून केलें आहे. तें मी पूर्ण विचारानें केलें आहे. आणि तसेंच केलें पाहिजे असें माझें मत आहे. आणि तसें केल्याबद्दल आपल्या कोर्टाचें जें कांहीं शासन असेल, तें भोगण्याला मी तयार आहें. तुमचें जें कर्तव्यकर्म असेल तें तुम्ही करा, आणि माझें जें कर्तव्यकर्म आहे तें करण्याला मीही कधीं मागें सरणार नाहीं!'

इतकें भाषण केल्यानंतर वुल्फटोननें कोर्टाला अशी विनंति केली कीं, 'मी शिपाई आहें. याकरितां शिपायाप्रमाणें मला गोळी घालून तुम्ही मारा, एखाद्या गुन्हेगाराप्रमाणें मला फांशी देऊन माझा जीव घेऊं नका.' परंतु ब्रिटिश न्यायाच्या नियमाप्रमाणें तसें करण्यांत आलें नाहीं. व अखेरीस शिक्षा सांगितल्यापासून अट्ठे-

चाळीस तासांच्या आंत वुल्फटोनला फांशी देण्याचा हुकूम झाला. गोळी घालून मारण्याची आपली विनंति कोर्ट मान्य करीत नाहीं, असें ठरल्यावर रात्रीं वुल्फ-टोननें आपल्याकडे कोणी पहात नाहीं अशी संधी साधून चाकूनें आपल्या गळ्याची एक शीर कापून घेतली. नोव्हेंबरच्या दहा तारखेला वुल्फटोनची चौकशी झाली व अकराव्या तारखेच्या रात्रीं वर दिलेली गोष्ट घडून आली. तारीख बारा रोजीं ॲडव्होकेट क्यूरन यांनीं किंग्स बेंच कोर्टांत अशी तक्रार केली कीं, लष्करी कोर्टा-मध्यें वुल्फटोनची चौकशी झाली हा अन्याय होय. सबब त्या कोर्टाचा हुकूम रद्द करून व तो खटला सिव्हिल कोर्टांत मागवून येथें त्याची चौकशी व्हावी; या कामीं हुकूम देण्याला कोर्टानें उशीर केला तर तें कोर्ट आरोपीला फांशीं देऊन टाकील. असा अर्ज झाल्याबरोबर वुल्फटोनला सोडवून आणण्याकरितां लष्करी बराकी-मध्यें ताबडतोब जासूद पाठविण्यांत आला. परंतु आमच्या लष्करी खात्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा हुकूम आल्यावांचून आम्ही त्याला सोडीत नाहीं, असा परत निरोप आला. नंतर चीफ जस्टिस यांनीं वुल्फटोनला असेल तेथून घेऊन येण्याविषयीं शेरीफला अतिशय जरूरीचा हुकूम पाठविला. शेरीफनें जाऊन शोध केला व अशी बातमी आणली कीं, वुल्फटोन यानें आपल्या गळ्याची शीर कापून घेतली आहे, त्यामुळें त्याला आणतां येणें शक्य नाहीं. यानंतर त्याला फांशीं देऊं नये, असा चीफ जस्टिसनें हुकूम पाठविला. पुढें सात दिवसपर्यंत वुल्फटोन अंथरुणावर पडून होता. व एकोणिसाव्या तारखेला त्याचें प्राणोत्क्रमण झालें. तो तुरुंगांत असतांना त्याच्याजवळ जाण्याची कोणालाही परवानगी नव्हती. त्याचे आप्त किंवा इष्टमित्र यांपैकीं कोणीही अंतकाळीं त्याच्याजवळ नव्हते. त्या तुरुंगांतील जेलर आणि त्यांचे नोकर हेच काय ते त्याच्याजवळ होते. आणि त्याच्या दारापुढें पहारा करण्याकरितां फिरणाऱ्या संत्री शिपायाच्या पावलांशिवाय त्याला अंतकाळीं दुसरा कशाचाही आवाज ऐकूं येत नव्हता. अशी जरी स्थिति होती, तरी आपण आपल्या देशासाठीं मरत आहों हें ज्ञान कायम होतें. आणि त्यामुळें शेवटपर्यंत त्याचें धैर्य न खचतां सत्कृत्य केल्याच्या समाधानानें तो शांतपणानें हा लोक सोडून परलोकीं गेला.

प्रस्तुत निबंधांतलें एमेटचें भाषण प्रत्येकानें मुखोद्गत करावें असेंच आहे. आपल्याकडेही लोकमान्य टिळक, महात्मा गांधी आणि इतर अनेक देशभक्त यांनीं शिक्षेपूर्वीं केलेलीं भाषणें अशींच तेजस्वी आणि अमर आहेत.

आयरिश लोकांच्या राष्ट्रीय इतिहासामध्यें तारीख २० सप्टेंबर हा दिवस महत्त्वाचा आहे. देशभक्त आयरिश लोक त्या दिवसाला अतिशय पवित्र मानतात. हा दिवस आयर्लंडवर प्रत्येक वर्षांतून एकदां उगवतो व त्या प्रत्येक वर्षी आयरिश लोक हा दिवस उत्सवांत घालवितातच; परंतु यंदा हा सप्टेंबरचा विसावा दिवस हा आयरिश लोकांना अत्यंत महत्त्वाचा होता. १९०३ सालच्या सप्टेंबर महिन्याच्या विसाव्या तारखेला आयरिश लोकांनीं फारच मोठा उत्सव केला. हा दिवस आयरिश लोकांना इतका पूज्य आणि प्रिय होण्याचें कारण असें कीं त्यांच्यापैकीं प्रसिद्ध देशभक्त रॉबर्ट एमेट हा त्या दिवशीं आपली जन्मभूमि सोडून परलोकवासी झाला. ही शोकजनक गोष्ट इ. स. १८०३ सालच्या सप्टेंबर महिन्याच्या विसाव्या तारखेला घडून आली असल्यामुळें यंदा या गोष्टीला बरोबर शंभर वर्षे झालीं. म्हणजे यंदाचा उत्सव हा शतसांवत्सरिक असल्यामुळें तो आयर्लंड-मधील लोकांकडून फारच आनंदानें साजरा करण्यांत आला. हे उत्सव अनेक ठिकाणीं करण्यांत आले. स्कॉटलंडमध्येंसुद्धां हे उत्सव झाले. त्यांपैकीं एका ग्लासगो शहरामध्येंच या उत्सवाकरतां वीस हजार लोक जमले होते असें तिकडील हकीकतीवरून कळतें. या उत्सवामध्यें एक जंगी मिरवणूक काढण्यांत आली होती. या मिरवणुकींत रॉबर्ट एमेट जसा पोशाख करीत असे, तसा पोशाख करून दोन प्रमुख पुढारी घोड्यावर बसून अग्रभागीं चालले होते. मिरवणुकीचा कार्यभाग संपल्यानंतर भरलेल्या सभेपुढें कित्येक ठराव पास झाले. पैकीं एका ठरावामध्यें असा स्पष्ट उल्लेख करण्यांत आला होता कीं, आयर्लंडची स्वतंत्रता आणि आयरिश लोकांचा उत्कर्ष ह्या ज्या दोन पवित्र गोष्टी, त्या घडवून आणण्यासाठींच जो एमेट जन्मास आला होता व ज्यासाठींच तो मरणही पावला, त्या एमेटचे जे हेतु होते तेच आमचे आयरिश लोकांचे हल्लींचे हेतु आहेत व त्यासाठीं आपण प्रयत्न करणें जरूर आहे. सदर प्रसंगीं मि. ओडोनेल ह्या प्रसिद्ध आयरिश वक्त्याचें एक सुरस भाषण झालें. त्यांतही त्यांनीं हेंच तत्त्व

प्रतिपादन केलें कीं, शंभर वर्षांच्या पूर्वी रॉबर्ट एमेट यानें जें कृत्य हातीं धरलें होतें तेंच कृत्य आपल्याला तडीस न्यावयाचें आहे. त्यानें हातीं धरलेल्या कामांत अपयश आलें असें कित्येकांचें म्हणणें आहे; पण त्याला अगदींच अपयश आलें असें नाहीं. त्याच्या कृत्यांनीं आज आपल्याला स्फूर्ति होत आहे, हें कांहीं थोडें यश आहे असें नाहीं. अशा प्रकारांनीं ज्या पुरुषाचे आयरिश लोक उत्सव करीत आहेत, ज्याच्या-बद्दल आयरिश लोक अभिमान बाळगीत आहेत आणि शंभर वर्षांच्या अवधीनेंही त्याच्याविषयींची पूज्यबुद्धि आयरिश लोकांच्या मनामध्यें यत्किंचितही कमी न होतां उलटीं जास्तच वाढत चालली आहे, असा तो राबर्ट एमेट कोण होता, आणि त्यानें आपल्या देशासाठीं काय केलें, त्यानें जिवंत असतां स्वदेशाच्या स्वतंत्रतेसाठीं काय काय खटपटी केल्या, आणि मरतेवेळीं आपल्या देशाच्या कळकळीनें त्याचें अंतःकरण खवळून जाऊन अंतकालीं त्यानें काय काय उद्गार काढले, हें जाणण्या-ची इच्छा वाचकांच्या मनामध्यें उत्पन्न होणें अपरिहार्य आहे. यासाठीं रॉबर्ट एमेट याचें संक्षिप्त चरित्र आणि त्यानें सरतेशेवटीं कोर्टामध्यें ज्यूरीपुढें केलेलें अत्युत्तम भाषण यांचा थोडक्यांत गोषवारा खालीं दिला आहे.

रॉबर्ट एमेट हा एक अतिशय प्रख्यात आयरिश देशभक्त होता. ह्याचा जन्म इ. स. १७७८ मध्यें झाला. याच्या बापाचा धंदा वैद्यकीचा असून तो फार प्रख्यात आणि सन्मान्य होता. आयर्लंडमध्यें ' युनायटेड आय-रिशमेन ' या नांवाची जी संस्था स्थापन झालेली होती, तिचे आयर्लंड-मध्यें राज्यक्रांति घडवून आणण्याविषयींचे गुप्त बेत ज्या वेळीं चाललें होते, त्या सुमारास रॉबर्ट एमेट याचा ट्रिनिटी कॉलेजमध्यें नुकताच प्रवेश झाला होता. त्या कॉलेजमध्यें इतिहास विषयाचा वादविवाद करण्या-करतां म्हणून कांहीं विद्यार्थ्यांनीं एक सभा काढली होती. तीमध्यें एमेट हा फारच प्रख्यातीस आला. अमेरिकेंत स्वातंत्र्याकरतां नुकतीच झालेली

लढाई आणि फ्रान्समध्यें त्या सुमारासच लोकांच्या स्वातंत्र्याकरतां चालू असलेल्या राज्यक्रांतीच्या चळवळी ह्यामुळें तेथील विद्यार्थ्यांचीं मनें फारच क्षुब्ध होऊन गेलेलीं होतीं. व एमेटचे विचार तर इतक्या पराकाष्ठेला जाऊन पोहाचले होते कीं त्याच्या कित्येक मित्रांसह एमेटला त्या वेळीं कॉलेजमधून बाहेर घालवून देण्यांत आलें होतें. त्याची वक्तृत्वशक्ति फारच विलक्षण होती. इसवी सन १७९८ सालीं आयर्लंडमध्यें जी राज्यक्रांतीची चळवळ झाली, त्यांत एमेटचें कांहीं तरी अंग असलें पाहिजे असा संशय सरकारला आलेला होता. त्यामुळें तो फ्रान्समध्यें कांहीं दिवस जाऊन राहिला. आयर्लंडमध्यें त्रस्त झालेले लोक व तेथून पळून गेलेले पुष्कळ लोक फ्रान्समध्यें जाऊन राहिलेले होते. त्यांची व एमेटची गांठ पडली व तेथून एमेट आपल्या देशाच्या पुनरुज्जीवनासाठीं इ. स. १८०२ मध्यें प्रयत्न करूं लागला. आयर्लंडमधील लोकांचीं मनें फारच खवळलीं होतीं. त्यांतून आयर्लंड हें इंग्लंडशीं सामील केल्यामुळें तर तेथील लोकांचा संताप अगदीं पराकाष्ठेलाच जाऊन पोहोंचला होता. ही संधि नवीन राजकीय खटपटींना फारच चांगली होती. आणि त्याच सुमारास इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें लढाई सुरू होणार अशी चोहोंकडे दाट बातमी पसरल्यामुळें तर फ्रान्समध्यें येऊन राहिलेल्या आयरिश देशभक्तांचा आनंद गगनांतही मावेनासा झाला. त्या वेळीं नेपोलियन बोनापार्ट हा फ्रान्स देशाचा फर्स्ट कॉन्सल होता. त्याची रॉबर्ट एमेट यानें जाऊन समक्ष गांठ घेतली. तेव्हां थोडक्याच दिवसांत इंग्लंडवर स्वारी करण्याचा आपला निश्चय कायम झाला आहे असें नेपोलियननें त्याला सांगितलें. नेपोलियनपासून असें आश्वासन मिळाल्यानंतर एमेट हा इ. स १८०२ च्या ऑक्टोबर महिन्यांत आयर्लंडमध्यें परत आला व डब्लिन शहरामध्यें गुप्तपणानें राहून तो नवीन राज्यक्रांतीची खटपट करूं लागला. तो निरनिराळ्या ठिकाणीं आपलीं निरनिराळीं नांवें सांगत असे. आणि जेणेंकरून आपले प्रयत्न गुप्त राहतील असे सर्व उपाय तो योजीत.

असे. पूर्वीच्या राज्यक्रांतीच्या खटपटीच्या वेळचे लोक शिल्लक होते ते त्यानें एकत्र जमविले; व पुष्कळ पैसा जमा करून आपल्या अनुयायां-करितां हत्यारें आणि दारूगोळा तयार करविण्याची त्यानें सुरुवात केली. पूर्वसंकेताप्रमाणें इ. स. १८०३ च्या मे महिन्यांत इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यामध्यें लढाई सुरू झाली, तेव्हां तर एमेटला मुळींच स्वस्थ राहवेना. डब्लिन शहरामध्यें ठिकठिकाणीं हत्यारें तयार करण्याचे जे गुप्त कारखाने त्यानें सुरू केले होते तेथें तो वरच्यावर जाई, तेथील कामगारांना उत्तेजन देई, आणि कधीं कधीं त्यांच्याबरोबर स्वतः काम करण्यालाही लागे. अशा रीतीची जारीनें तयारी चालली असतां जुलई महिन्यांतील एके दिवशीं एमेटनें सुरू केलेल्या कारखान्यांपैकीं एके ठिकाणीं एकाएकीं दारूचा भडका होऊन मोठा आवाज झाला. त्यावरून सरकारला संशय येऊन चौकशी सुरू झाली. तेव्हां आतां आपण जास्त दिवस स्वस्थ बसलों तर आपले प्रयोग फुकट जातील असें वाटून आपला बेत लवकरच सिद्धीस नेण्याचा एमेटनें निश्चय केला व जुलई महिन्याची तेविसावी तारीख हा बंडाचा दिवस ठरवून तो त्यानें आपल्या सर्व अनुयायांना कळविला. ह्या वेळीं एमेट एका हत्यारांच्या कारखान्यांतच एखाद्या चटईवर पडून थोडा वेळ झोंप घेत असे व त्यानें तयार करविलेलीं हत्यारें त्याच्या सभोंवतीं जागृत असत. अशा स्थितींत तेविसावी तारीख आली; परंतु त्या तारखेस यश आलें नाहीं! एमेटनें जे लोक बोलाविले होते त्यांपैकीं फारच थोडे हजर झाले होते. आणि त्या लोकांच्या हातून विशेष कांहीं झालें नाहीं. व सुमारें एक तासाच्या आंतमध्येंच ते सर्व पळून गेले. अशा रीतीनें सर्व आशा निष्फळ झाल्या. तेव्हांपासून रॉबर्ट कोठें तरी दडून राहून दिवस काढीत होता. परंतु त्याला पकडण्याकरितां गुप्त हेर चोहोंकडे फिरत होते. अखेरीस ऑगस्ट महिन्याच्या २५ व्या तारखेला रॉबर्ट एमेट हा पकडला गेला. सप्टेंबरच्या १९ व्या तारखेला त्याची चौकशी सुरू झाली. त्या वेळीं त्यानें आपल्या बाजूनें कांहीं एक पुरावा दिला नाहीं. ज्यूरींतील

लोकांना बसल्या जागेवरून उठून विचार करण्याकरितां आंत जाण्याचीही गरज पडली नाहीं. त्यांनीं हा अपराधी आहे असा आपला अभिप्राय तेथल्या तेथेंच दिला. 'नंतर तुला मरणाची शिक्षा कां देऊं नये, ह्याच्याविषयीं तुझें कांहीं म्हणणें असेल तर सांग.' असें विचारल्यावरून रॉबर्ट एमेट यानें पुढील भाषण केलें:—

मला जी मरणाची शिक्षा झालेली आहे ती मला कां होऊं नये याच्याबद्दल माझें कांहीं म्हणणें असेल तर तें मीं तुमच्यापुढें मांडावें म्हणून तुम्हीं मला सांगितलें आहे; परंतु तुमचा जो आधींच निश्चय झालेला आहे तो ज्याच्या योगानें बदलतां येईल, असें माझ्यापाशीं बोलण्यासारखें कांहींच नाहीं. परंतु माझ्या प्राणापेक्षांही जास्त प्रियकर असें जें माझें नांव, त्या नांवाला डाग न लागावा यासाठीं मला कांहीं बोलावयाचें आहे. तुम्ही ज्या न्यायासनावर बसलां आहां त्या न्यायासनावर असतांना माझ्या बोलण्यापासून तुमच्या मनावर कांहीं परिणाम होईल अशी मला बिलकुल आशा नाहीं. परंतु माझें बोलणें माझ्या योग्य देशबांधवांच्या कानापर्यंत जाऊन पोहोंचावें यासाठींच मी येथें तें बोलून दाखवीत आहें. महाराज, मनुष्य मरून जातो. पण त्याची आठवण मागें राहते ! माझी ती आठवण माझ्या देशबांधवांच्या आदराला पात्र होऊन मागें रहावी, यासाठींच माझें वर्तन निर्दोष कसें आहे हें मी या प्रसंगीं सिद्ध करून देण्याचा प्रयत्न करीत आहें. जेव्हां माझा आत्मा येथल्यापेक्षां अत्यंत जास्त सुखकर अशा ठिकाणीं जाईल, आणि ज्यांनीं आपल्या देशाच्या आणि सद्गुणाच्या संरक्षणाकरितां सुळावर किंवा समरांगणामध्यें आपलें रक्त खर्चीं घातलें आहे अशा प्रकारच्या वीर पुरुषांच्या आत्म्यांच्या समुदायामध्यें जेव्हां माझा आत्मा जाऊन बसेल तेव्हां माझी स्मृति आणि माझें नांव यांच्या योगानें माझ्यामागें जे कोणी जिवंत राहिले असतील त्यांना स्फुरण यावें ही माझी इच्छा आहे.

आयर्लंडवर हल्लीं जे राजे राज्य करीत आहेत, ते अत्यंत श्रेष्ठ असा जो

परमेश्वर, त्याच्या निंदेनें आपलें तोंड प्रत्यहीं विटाळून घेऊन येथील लोकांवर आपलें राज्य चालवीत आहेत. अरण्यांतील पशूंना जसें वागवावें त्याप्रमाणें ते येथील माणसांना वागवीत आहेत, भावाभावांमध्यें कलह उत्पन्न करून देत आहेत आणि एका इसमास आपल्याच देशांतील दुसऱ्याचा गळा कापण्याला प्रवृत्त करीत आहेत. त्यांनीं केलेल्या विधवांचे आणि पोरक्या पोरांचे आक्रोश प्रत्यहीं एकसारखे चालले असतांही त्यांच्या मनाला द्रव येत नाहीं इतके ते क्रूर झाले आहेत. अशा रीतीनें नीतिभ्रष्ट झालेल्या राजांचें आयर्लंडवरील राज्य लयाला जावें अशी माझी इच्छा आहे. माझ्यापूर्वीं जे देशभक्त मारले गेले त्यांच्या रक्ताची शपथ घेऊन, तसेंच ज्या परमेश्वराच्या सिंहासनासमोर मला आतां लवकरच जाऊन उभें राहावयाचें आहे त्याची शपथ घेऊन, त्या सर्वशक्तिमान् परमेश्वराला स्मरून मी असें सांगतों कीं माझ्या देशावर जो हा राक्षसी जुलूम आज कित्येक वर्षेपर्यंत चालला आहे, त्या जुलमापासून आपल्या देशाला मुक्त करावें ह्याच्यापेक्षां दुसरा कोणताही हेतु माझ्या मनामध्यें नाहीं आणि या प्रसंगीं जरी माझा प्रयत्न फसला, तरी हें अत्यंत उदात्त साहसाचें कार्य करण्याला आयरिश लोकांमध्यें अजून पुष्कळ सामर्थ्य आहे हें सर्वांना खात्रीनें सांगतों. सरकारला एक क्षणभर भीति दाखविण्यासाठीं मी असें म्हणतों असें आपण समजूं नका. जिवंत असतांना ज्याच्या तोंडून एकही खोटें अक्षर बाहेर पडलें नाहीं, तो मी अशा माझ्या अंतकाळच्या प्रसंगीं आणि माझ्या देशाच्या स्वतंत्रतेसारख्या विषयासंबंधानें आपल्या भावी पिढीला कांहीं तरी अन्यथा सांगून आपल्या सत्यपणाच्या ब्रीदाला कलंक लावून घेईन असें आपण कधींही समजूं नका. माझा देश स्वतंत्र झाल्यावांचून माझ्या थडग्यावर कोणीही माझा मृत्युलेख लिहूं नये अशी ज्या माझी इच्छा आहे, तो मी माझ्या शत्रूच्या हातांत असत्यतेबद्दल मला नांवें ठेवण्याचें साधन देईन असें कधींही व्हावयाचें नाहीं. ( या ठिकाणीं कोर्टानें बोलण्याला प्रतिबंध केल्यावरून एमेट जज्जांना उद्देशून पुढीलप्रमाणें

म्हणाला:— ) महाराज, आपण अधिकारावर आरूढ झालेले आहां म्हणून कोणाला आपलें कौतुक वाटत असेल तर वाटो. परंतु मला तर आपण असल्या दुःस्थितीमध्यें सांपडल्याबद्दल अतिशय खेदच वाटत आहे. मी जें येथें बोलत आहे तें आपल्याकरितां नव्हेच. माझे शब्द माझ्या देशबांधवांकरितां आहेत. येथें जर कोणी खरा आयरिशमन हजर असेल तर जेव्हां जेव्हां त्याच्यावर कांहीं संकटें येतील तेव्हां तेव्हां हे माझे शेवटले शब्द त्याचें अंतःकरण उल्हासानें परिपूरित करोत. ( येथें फिरून प्रतिबंध करण्यांत आला, व जज्ज लॉर्ड नॉरबरी यांनीं ‘ मी येथें राजद्रोह ऐकण्याकरितां बसलों नाहीं ’ असें सांगितलें. त्यावर एमेट म्हणाला :– ) कायद्याची शिक्षा सांगणें हें जसें न्यायाधीशाचें काम आहे तसेंच आरोपीचें म्हणणें शांतपणानें ऐकून घेणें आणि त्याच्याशीं ममताळूपणानें बोलणें हेंही त्यांचें एक काम आहे असें मी समजतों. तसेंच, ज्याला आरोपी म्हणून म्हणण्यांत येत आहे तो कोणत्या हेतूनें आपलें कृत्य करण्याला प्रवृत्त झाला होता हें समजून घेणें हें सुद्धां न्यायाधीशाचें एक काम आहे. पण तसें येथें कांहींच दिसत नाहीं. तुमच्या संस्थानच्या स्वतंत्रपणाविषयीं तुम्ही ज्या एवढ्या फुशारक्या मारीत आहांत ती स्वतंत्रता आहे कोठें ? तुमच्या न्यायाच्या कोर्टांतून निःपक्षपात, दया आणि ममताळूपणा, वगैरे गोष्टी असतात म्हणून तुम्ही बढाई मारतां त्या कोठें आहेत ? तुम्ही मला न्यायानें शिक्षा देत नसून राजकीय धोरण मला शिक्षा देत आहे. तरी पण तें कांहीं असलें तरी फांशी देण्यासाठीं ज्याला तुम्ही आपल्या मारेकऱ्यांच्या हवालीं करीत आहां त्यानें ज्याला तुम्ही गुन्हा म्हणत आहां ती गोष्ट कोणत्या हेतूनें केली याच्याविषयीं खुलासा करण्याला जर तुम्हीं त्याला संधि दिली नाहीं तर मग तुमची फुशारकी व्यर्थ नव्हे काय ? सुळावर चढविण्याच्या अपमानाला मला पात्र केल्यानें आपली क्षुब्ध झालेली न्यायदेवता संतुष्ट होईल असें कदाचित् तुम्हांला वाटत असेल, पण तुम्ही ज्याला अपमान म्हणतां तो मला अपमान म्हणून मुळींच वाटत नाहीं. फांशी जाणें हा मी अपमान

समजत नाहीं, परंतु ह्या कोर्टामध्यें माझ्याविरुद्ध जे कित्येक खोटे आरोप करण्यांत आले आहेत ते मात्र मला अपमानकारक वाटत आहेत. महाराज, सांप्रत तुम्ही न्यायाधीश आहां आणि मी तुमच्या समजुतीप्रमाणें गुन्हेगार आहें. पण वास्तविक पाहिलें असतां मी एक मनुष्य आहें आणि तसलेच, तुम्हीही एक मनुष्य आहां. पण जर कालचक्र फिरलें असतें, तर कदाचित् तुम्ही आहांत तेथें मी आलों असतों आणि मी आहें तेथें तुम्ही आलां असतां, अशा आपण जागा बदलल्या असत्या. पण जागा बदलल्या तरी मनुष्य आपले स्वभाव बदलूं शकत नाहीं. जर ह्या कोर्टांत उभा राहून मी खरोखर निष्कलंक आहें असें सिद्ध करून देण्याची तुम्हीं मला संधि दिली नाहीं, तर मग तुम्ही न्याय कसला करतां ? ही न्यायाची थट्टा आहे. तुम्हीं मला मरणाची शिक्षा दिली आहे, माझ्या जिभेला गप्प बसवण्याची शिक्षा दिली नाहीं, किंवा माझ्या कीर्तीला डागळून जाण्याची शिक्षा दिलेली नाहीं. मला परमेश्वरानें जें आयुष्य दिलेलें आहे त्याचा तुमचा मारेकरी मध्येंच तुकडा पाडो, परंतु जोंपर्यंत मी जिवंत आहें, तोंपर्यंत माझी कीर्ति निष्कलंक राहण्याविषयीं प्रयत्न केल्यावांचून मी कधींही राहणार नाहीं. मला आयुष्यापेक्षां निर्मळ कीर्तिच प्रियकर आहे आणि मी मेल्यानंतर ती कीर्तिच माझ्यापाठीमागें उरणार आहे. त्या कीर्तीला तुम्ही जे डाग पाडूं पाहात आहां ते धुऊन काढण्याला मी आपल्या उरलेल्या आयुष्याचा उपयोग केल्यावांचून कधींही राहणार नाहीं. महाराज, आपण सगळीं माणसें आहों. म्हणून केव्हां तरी एके दिवशीं परमेश्वराच्या न्यायाच्या कोर्टांत आपण सगळेजण एकत्र जमूं आणि त्या वेळीं कोणाचें अंतःकरण शुद्ध होतें, आणि कोणाचीं कृत्यें अत्यंत सद्गुणाचीं होतीं—माझीं होतीं किंवा माझ्या देशावर जुलूम करणारांचीं होतीं—याबद्दल निर्णय तो सर्वसाक्षी परमेश्वर करील. (येथें फिरून प्रतिबंध करण्यांत आला. त्या वेळीं एमेटनें याप्रमाणें उत्तर केलें:—) कांहीं क्षुद्र नफ्याचा हेतु मनामध्यें धरून मी आपल्या देशाची स्वतंत्रता नष्ट करून टाकीत

होतों, अशा प्रकारचा आरोप मजवर ठेवून तुम्ही माझा अपमान केला आहे, त्याचें क्षालन करण्याची मला तुम्ही संधि दिली पाहिजे. मृत्यूची शिक्षा कां देऊं नये याच्याबद्दल तुम्ही मला कारण विचारलें. असा प्रश्न विचारावा असें कायद्यानें सांगितलें आहे, म्हणून तुम्ही हा प्रश्न मला विचारला हें मी जाणतों. पण असा प्रश्न विचारल्यानंतर त्याचा जबाब देण्याचा हक्क कायद्यानें मला दिलेला आहे आणि त्या कायद्यानें दिलेल्या माझ्या हक्काला जर फांटा द्यावयाचा, तर मग माझ्या चौकशीचा हा जो सगळा तमाशा करण्यांत आला त्याची तरी काय गरज? कारण ज्यूरी एकत्र जमण्यापूर्वीच मला काय शिक्षा द्यावयाची हें दुसरीकडे ठरलेलें होतें. (ह्यानंतर कोर्टानें बोलण्याची परवानगी दिल्यावरून एमेट पुढें म्हणाला :—)

मी फ्रान्सचा गुप्त हेर आहें, असा तुम्हीं मजवर आरोप ठेवला आहे. फ्रान्सचा गुप्त हेर, आणि तो कशाकारितां? मी आपल्या देशाचें स्वातंत्र्य विकणार होतों असें म्हणतां पण मी असें कां करीन? माझी ही महत्त्वाकांक्षा आहे काय? नाहीं. मी फ्रान्सचा गुप्त हेर नाहीं. माझ्या देशाला गुलामगिरीच्या बंधनांतून सोडवणारे जे कोणी असतील त्यांच्या वर्गामध्यें माझी गणना व्हावी ही माझी महत्त्वाकांक्षा होती. त्या कृत्यापासून मिळणारा फायदा किंवा हातीं येणारी सत्ता हीं मला नको होतीं, परंतु तें कृत्य मीं केलें एवढें माझें नांव झालें म्हणजे मला बस होतें. मी आपल्या देशाचें स्वातंत्र्य फ्रान्सला विकणार! आणि त्यापासून काय फायदा? आमच्या छातीवर नाचणारे एक जाऊन दुसरे यावे अशी माझी महत्त्वाकांक्षा होती? आणि माझा खाजगी फायदा व्हावा एवढीच जर माझी इच्छा असती, तर माझी विद्वत्ता, माझी संपत्ति, आणि माझें उच्च कुल यांच्या योगानें तुमच्यापैकीं आज जो आयर्लंडवर अतिशय जुलूम करीत आहे, त्याच्या इतक्या मोठ्या योग्यतेची जागा मलाही मिळवितां आली असती. पण माझी ती इच्छाच नव्हती. माझा देश हेंच काय तें माझें

सर्वस्व. माझें व्यक्तिशः जें कांहीं होतें किंवा जें कांहीं मला प्रिय होतें, तें सर्व मीं त्यापायीं खर्ची घातलें आणि तें सगळें संपल्यावर आतां मी आपला देहसुद्धां, हे परमेश्वरा, खर्ची घालीत आहें. महाराज, परकीय लोकांच्या जुलमाच्या जोखडापासून, आणि कुऱ्हाडीच्या दांड्याप्रमाणें जे आपल्याच गोताला काळ झालेले आहेत अशा प्रकारच्या कित्येक आयरिश लोकांच्यापासून आपल्या देशाला स्वतंत्र करावें या हेतूनेंच मी हा प्रयत्न करीत होतों. हा जो आपल्या देशाला दुहेरी फांस बसला आहे, त्या भयंकर फांसापासून त्याचा गळा मोकळा करावा, हीच माझ्या अंतःकरणाची इच्छा होती. सगळ्या जगामध्यें अतिशय उच्च आणि स्पृहणीय अशा स्वतंत्रतेच्या सिंहासनावर आपल्या देशाला नेऊन बसवावें, ही माझी महत्त्वाकांक्षा होती. मीं या कामीं फ्रान्सशीं संबंध ठेवला होता हें खरें; पण तो कशासाठीं? आमच्या स्वतंत्रतेसाठीं. ती मिळविण्याच्या कामीं फ्रान्स आम्हांला मदत करणार होतें. आयरिश लोकांच्या इच्छेविरुद्ध आणि त्यांनीं न बोलवतां फ्रेंच लोक आयर्लंडवर स्वारी करण्याकरितां शत्रु म्हणून आले असते तर माझ्या अंगांत जितकी म्हणून शक्ति आहे तितकी सगळी खर्च करून मींच त्यांना प्रतिबंध केला असता. माझ्या देशबांधवांनो, एका हातांत तलवारी आणि दुसऱ्या हातांत मशाली घेऊन फ्रेंच लोक आपल्या किनाऱ्यावर उतरत असतां तुम्ही त्यांस जाळा, पोळा, मारा, असा मीच तुम्हाला उपदेश केला असता. त्यांनीं माझ्या देशाची जमीन आपल्या पायांनीं विटाळण्याच्या पूर्वींच त्यांच्या बोटीमध्येंच त्यांना जाळून टाकण्याविषयीं मीं देशबांधवांना चेव आणला असता, व इतकेंही करून जर ते किनाऱ्यावर उतरलेच असते, तर आयर्लंडच्या जमिनीच्या प्रत्येक इंचावर मीं त्यांना अडथळा केला असता, तेथील प्रत्येक गवताची काडी मी जाळून टाकली असती, आणि माझा प्राण जाईपर्यंत मीं आपल्या देशाची स्वतंत्रता त्यांच्या हातीं जाऊं दिली नसती. आणि शिवाय मी मरतांना माझ्या देशाची स्वतंत्रता फ्रेंचांपासून

कायम राखण्याची गोष्ट माझ्या हातून शेवटास गेली नसती तर ती शेवटास नेण्याबद्दल मी आपल्या बाकीच्या देशबांधवांना माझी शेवटची विनंति म्हणून सांगितली असती. कारण, परकीय लोकांनीं आपला देश जिंकून ताब्यांत ठेवला असतां त्या ठिकाणीं जिवंत राहणें ह्यांत कांहीं अर्थ नाहीं, अशी माझी मनोदेवता मला सांगते. फ्रान्स हा शत्रु म्हणून मी त्याला आपल्या घरांत घेत नव्हतों. आयरिश लोकांना गुलामगिरीचा तिटकारा आला आहे आणि आपल्या देशाचें स्वातंत्र्य स्थापित करण्याला ते उद्युक्त झाले आहेत असें जगाला दाखवून, वाशिंग्टननें अमेरिकेकरतां जें केलें तें आपण आपल्या देशाकरतां फ्रान्सच्या मदतीनें करावें, अशी माझी इच्छा होती. आयर्लंडचे जुने जुलमी राजे घालवून देण्यासाठीं हा माझा प्रयत्न होता, नवीन बोलावण्यासाठीं नव्हता. दुसरें एक माझ्याविरुद्ध असें म्हणणें आहे कीं तुम्ही जुलूम करणारे आणि आम्ही, जुलमानें गांजलेले; तुमच्या ह्यांच्या दरम्यान हें जें भयंकर असें युद्ध माजलें आहे त्यामध्यें जो कांहीं रक्तपात होईल त्या सगळ्या रक्ताची जबाबदारी देवाच्या घरीं माझ्या डोक्यावर राहील. पण हें म्हणणें खोटें आहे. मी आपल्या आयुष्यामध्यें जें जें कांहीं केलेलें आहे, त्याबद्दल जाब देण्याकरतां त्या सर्वसाक्षी न्यायाधीशा-पुढें जाण्याला मला बिलकूल भीति वाटत नाहीं. आणि त्या भीतीचा बाऊ मला तुम्ही दाखविणार ? या तुमच्या न्यायाधीशाच्या कामांत तुमच्याकडून अनेक निरपराधी लोकांचें जें रक्त सांडलें आहे, तें जर सगळें एकत्र गोळा करतां आलें असतें, तर, महाराज, तुम्हांला ज्यामध्यें स्वैर रीतीनें पोहतां येईल इतकें मोठें तळें त्या रक्तानें भरलें असतें, याचा आपण विचार करा. सबब माझ्यावर अपमानकारक आरोप घालून मी मेल्यानंतर माझ्या नांवाला कोणीही कलंक लावण्याचा प्रयत्न करूं नये. हल्लीं आमच्यावर जे राजे जुलूम करीत आहेत, त्यांच्या जुलुमाचा मी ज्या कारणासाठीं प्रतिकार करीत आहें त्याच कारणासाठीं मी नवीन परकीय राजांसही आपल्यावर जुलूम करण्याकरतां आपल्या घरांत घेणार नाहीं, हें लक्षांत बाळगून कोणीही

माझ्यावर भलभलते आरोप करूं नयेत. कोणी परकीय जुलमी राजा जर माझ्या देशावर चाल करून येत असता तर स्वदेशाच्या स्वतंत्रतेचें संरक्षण करण्याकरतां मी आपल्या देशाच्या उंबरठ्यावर उभा राहून त्याच्याशीं लढलों असतों आणि माझ्या प्रेतावर पाय दिल्यावांचून त्या शत्रूला माझ्या देशामध्यें प्रवेशच करतां आला नसता. जो मी आजपर्यंत आपल्या देशासाठींच जिवंत राहिलों होतों, आपल्या देशासाठींच हा देह थडग्यामध्यें पुरून घेण्याला जो मी आज तयार झालों आहें आणि माझ्या देशबंधूंना त्यांचे राजकीय हक्क मिळवून देण्याकरतां जुलमी आणि मत्सरी राज्यकर्त्यांच्या द्वेषाला ज्या मी आपल्या स्वतःला पात्र करून घेतलें तो मी असलें स्वदेशद्रोहाचें काम करीन काय ? नाहीं. परमेश्वरा, माझ्या हातून अशी गोष्ट कधींही घडूं देऊं नकोस ! ( या ठिकाणीं लॉर्ड नॉरबरी हे असें म्हणाले कीं, तुझें उच्च कुल आणि तुझी विद्वत्ता ह्यांना असले विचार आणि असले शब्द फार लाजिरवाणे आहेत आणि तुझा बाप जर आज जिवंत असता तर त्याला हीं तुझीं असलीं मतें कधींही पसंत पडलीं नसतीं. ह्यावर एमेटनें पुढें लिहिल्याप्रमाणें उत्तर दिलें:—) मेलेल्या माणसांच्या आत्म्याचा या जगाशीं मेल्यावर काय संबंध उरत असेल आणि मरणाच्या पूर्वीं त्यांना या क्षणभंगुर संसारामध्यें जीं माणसें प्रियकर वाटत होतीं त्यांच्या सुखदुःखाची काळजी परलोकामध्येंही जर त्यांना वाटत असेल तर, हे माझ्या मृत झालेल्या बापाच्या प्रियकर आणि पूज्य आत्म्या ! तूं ह्या आपल्या मृत्युलोकाच्या कांठावर उभ्या राहिलेल्या मुलाच्या वर्तनाकडे नीट न्याहाळून पाहा, आणि मी लहान होतों त्या वेळीं, बाबा, तुम्ही मला सद्गुण आणि स्वदेशाभिमान यांचीं जीं तत्त्वें शिकविलीं त्यांच्यापासून मी कधीं एक क्षणभर तरी ढळलों आहें कीं काय, तें मला सांगा. असो. महाराज, माझा जीव घेण्याविषयीं तुम्ही फार उतावीळ झालेले आहां व त्यासाठीं तुम्ही माझ्यासभोंवतीं हीं अनेक कृत्रिम साधनें निर्माण केलीं आहेत. परंतु ह्यांच्या भीतीनें

माझें रक्त गोठून गेलेलें नाहीं. तें अजून कढत असून माझ्या शरीरांतील शिरांमधून तें स्वैरपणें सचार करीत आहे. परमेश्वरानें जें रक्त माझ्या अंगामध्यें फार मोठमोठीं कृत्यें करण्याकरितां घातलें होतें, परंतु तुम्हीं तें अत्यंत नीच हेतूनें व्यर्थ दवडून टाकीत आहां, व या तुमच्या कृत्याबद्दल तें माझें रक्त परमेश्वरापाशीं नेहमीं आक्रोश करीत राहील. तुम्हांला घाई झाली अहे खरी; पण तुम्ही थोडा वेळ थांबा. मला आणखी चार शब्द सांगावयाचे आहेत. माझें आयुष्य संपलें. माझा प्राणरूपी दिवा अगदीं जाण्याच्या बेतांत आला आहे. मी आतां आपल्या थडग्याच्या कांठावर उभा आहे. थडगें मला गिळण्याकरितां आ पसरील आणि मी त्याच्या तोंडामध्यें उडी टाकीन, अशा वेळीं मला. एकच विनंती करावयाची आहे आणि ती ही कीं, कोणीही मनुष्यानें माझ्या थडग्यावरील मृत्युलेख लिहूं नये. कारण ज्यांना माझे खरे हेतु माहीत आहेत त्यांना ते जगापुढें व्यक्त करून दाखविण्याची ही योग्य वेळ वाटत नाहीं. आणि माझ्याबद्दल उगीच भलत्याचं लोकांनीं भलतंच कांहीं तरी लिहून ठेवण्यांत कांहीं हंशील नाहीं. त्यापेक्षां त्यांनीं आणि मी दोघांनींही योग्य वेळ येईपर्यंत अज्ञातवासामध्यें स्वस्थ पडून राहणें हेंच उत्तम होय. माझे खरे हेतु व्यक्त करण्याचे दिवस आणि करणारीं माणसें हीं येईपर्यंत माझी स्मृति तुम्ही सर्वजण विसरून जा; आणि माझ्या थडग्याच्या दगडावर तुम्ही कोणी कांहींही लिहूं नका. पृथ्वीच्या पाठीवरील स्वतंत्र राष्ट्रांच्या वर्गामध्यें माझा देश ज्या दिवशीं जाऊन बसेल, त्या दिवशीं माझ्या थडग्याच्या दगडावरील लेख लिहा; तोंपर्यंत लिहूं नका.

इतकें बोलून एमेटनें आपलें भाषण संपविलें. या भाषणाची आयरिश लोकांमध्यें फारच ख्याति झालेली आहे व सर्व आयरिश लोक एमेटला आपल्यापैकीं अतिशय श्रेष्ठ देशभक्त म्हणून मानतात. एमेटला फांशीं देऊन त्याचें शिर धडापासून निराळें कापून सरकारचे शिपाई घेऊन गेले. हें कृत्य पाहण्याकरितां पुष्कळ आयरिश लोक जमले होते व तें पाहत असतां

हा आपल्यासाठीं मरण पावला असें मनांत आणून सर्व लोक एकसारखे रडत होते, व ज्या ठिकाणीं एमेटचें रक्त सांडलें होतें त्या ठिकाणीं येऊन सर्व आबालवृद्धांनीं ह्या उत्कृष्ट देशभक्ताचें स्मरण राहण्याकरितां त्याच्या रक्तामध्यें आपलें हातरुमाल भिजवून घेतले. हल्लीं पृथ्वीच्या पाठीवर जेथें जेथें म्हणून आयरिश लोक आहेत तेथें तेथें त्यांच्या अंतःकरणांतून एमेटचें नांव आहेच. मात्र त्याच्या थडग्याच्या दगडावरील मृत्युलेख अजून लिहिला जाण्याची वेळ येत नाहीं म्हणून सर्वांच्या डोळ्यांतून या गोष्टीची आठवण झाली म्हणजे खळखळ पाणी येतें. हा एमेटचा मृत्युलेख म्हणजे चाणक्याची शेंडीच होय. असले क्रांतिकारी आणि देशभक्त पुरुष कोणत्याहि देशाला भूषणास्पद होत.

६८३३

## अभ्यास

*( १ ) एकोणिसशें आठ सालीं लोकमान्य टिळकांना हद्दपारीची शिक्षा होण्यापूर्वीं त्यांनीं न्यायमंदिरांतील पंचांना उद्देशून केलेलें भाषण वाचा.*

*( २ ) ' हा एमेटचा मृत्युलेख म्हणजे चाणक्याची शेंडीच होय. ' असें शिवरामपंत म्हणतात. या वाक्याचें सविस्तर स्पष्टीकरण करा.*

*( ३ ) ' डी व्हॅलेरा ' हें प्रो. फडके यांनीं लिहिलेलें चरित्र वाचून त्याचा सारांश काढा.*

REFBK-0006833